UNIVERSAL LIBRARY
OU_192674
UNIVERSAL LIBRARY

# शककर्ता शालिवाहन

लेखक

श्री. नारायण केशव बेहेरे M. A. B. Sc. L. T.

नागपूर.

शके १८६५ किंमत अडीच रुपये

संपादक

१. प्रो. यादव मुकुंद पाठक
एम्. ए., एल्एल्. बी.

२. कल्याण

सल्लागार

ग. त्र्यं. माडखोलक

प्रकाशक व मालक

दि. मा. धुमाळ

नागपूर प्रकाशन, नागपू

नागपूर प्रकाशन–४

मुद्रकः—
लक्ष्मणराव मणाजी पटले,
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सिताबर्डी, नागपूर.

# अर्पण-पत्र

पंडित श्री. रामचंद्र विनायक उर्फ बाबासाहेब पटवर्धन

B. A. LL. B. पुणे, यांसी:-

श्रुतिस्मृतिपुराणेतिहासाचा तुमचा जबर व्यासंग व त्यामुळे तत्संबंधीं तुम्हांस प्राप्त झालेला अधिकार व आयुर्वेद आणि ज्योतिष या शास्त्रांची आजवर तुम्ही केलेली भरीव सेवा, या तुमच्या महनीयतेची मला पूर्ण जाणीव आहे.

पन्नास वर्षें टिकलेली तुमची, श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर व कै. अच्यूतराव कोल्हटकर या तिघां श्रुतिबोध-संदेश-उषा-संस्थापकांची मैत्री मराठी साहित्य क्षेत्रांत खात्रीने चिरंजीव ठरेल. साधी राहणी, उच्च विचारसरणी व निरपेक्ष स्वदेशसेवा या अमोलिक गुणांचें प्रतीक म्हणून तुमच्या त्रिकुटाकडे कोणालाहि अभिमानाने बोट दाखवितां येईल.

युद्धजन्य कागदाच्या महर्गतेमुळे आकुंचन पावलेली 'शककर्ता शालिवाहन' ही प्राचीन ऐतिहासिक कथा तुम्हांस आज मी सादर व सप्रेम अर्पण करीत आहे. ती चालूं शक-वर्षांत प्रसिद्ध होणें औचित्यास धरून आहे. कारण या शक वर्षांतच जयनाम १९९९ व मन्मथनाम विक्रम संवत २००० यांचा खंडशः अंतर्भाव होतो.

चैत्र शुद्ध प्रतिपदा
सुभानु नाम शालिवाहन
शक १८६५, नागपूर.

नारायण केशव बेहेरे.

" यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥
त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वाऽपि न निबध्यते ॥ "

घर नं. ७१५, बुधवार पेठ, पुणे
चैत्र शुद्ध ५ शके १८६५

## विद्याभूषण प्रो. नानासाहेब बेहेरे मु. नागपूर यांसी

कृ. सा. न. वि. विशेष

तुमचें गुढीपाडव्याचें अनपेक्षित पत्र वाचून मी आश्चर्यचकित झालो. तुमचें पुस्तक एखाद्या विद्वान प्राध्यापकाला तुम्ही अर्पण कराल तर बरें होईल. मला तें अर्पण करण्यांत तुमचा कोणताच फायदा नाही व माझी तेवढी योग्यताहि पण नाही. तेव्हां कृपा करून तो विचार रहित करावा.

तुमच्या कथेचें झालेलें आकुंचन हा माझ्या मतें दोष नसून गुणच आहे. कारण त्यामुळे कथेचें ऐतिहासिक मूल्य वाढलें. श्रुतिद्वारा आलेला परंपरागत इतिहास, पुराणें, बृहत्कथा व शिलालेख यांचा सुंदर समन्वय करून विक्रमादित्य व शालिवाहन या दोघां हिंदु शककर्त्यांचें सुसंगत चरित्र कोणीहि पौर्वात्य वा पाश्चात्य विद्वानाने आजवर लिहिलेलें माझ्या पाहण्यांत नाही. तुम्ही ही कथा इंग्रजींत प्रसिद्ध कराल तर फार छान होईल. इतिहासाच्या एका अनिश्चित दालनावर तुमच्या कथेने चांगला प्रकाश पडला आहे.

या सुभानु नाम शकवर्षातच कार्तिक शुद्ध प्रतिपदेस मन्मथनाम विक्रम संवत्सर २००० लागेल. तेव्हां तुमचें पुस्तक योग्य काळीं प्रकाशित झालें यांत संशय नाही. सध्या जयनाम विक्रम संवत १९९९ आहे; तेव्हां तुमच्या चरित्रास जय लाभेल. कारण तुम्ही या कथा–लेखनांत सत्य व पावित्र्य या दोहोंचाहि सारखा मान राखला आहे.

तुमचें कथालेखन मनोरंजक झालें आहे हें सांगणें, ऊंस गोड लागला असें सांगण्यासारखे आहे. प्राचीन ऐतिहासिक कथालेखनाचें पुरुष–प्रकृति या

द्विपर्वात्मक आणि प्रारब्ध व पराक्रम आणि भूत व भविष्य असें चतुष्कांडात्मक तुम्ही निर्माण केलेलें नवें तंत्र विचारप्रवर्तक व काव्यात्मक आहे. मंत्रविद्ये-बरोबर तंत्रविद्याहि तुम्ही आपलीशी केली असें दिसतें. शालिवाहन कालांत, नाही तरी आर्यांची मंत्रविद्या व अनार्यांची तंत्रविद्या यांचें मीलन होऊन हिंदु धर्माला नवें आकर्षक स्वरूप प्राप्त झालें.

संशोधकांकडून तुमच्या प्रेमाच्या आहेराचा खात्रीने सुविचार व साभार स्वीकार होईल. हिंदु धर्म व संस्कृति यांची वाङ्मयात्मक सेवा अखंड भारताच्या स्वातंत्र्यास केव्हांहि पोषकच ठरेल.

तुम्ही गौरवाने उल्लेखलेली आमची त्रिकुटात्मक मैत्री साहित्यक्षेत्रा-प्रमाणेच व्यवहार क्षेत्रांतहि आजपर्यंत तशीच गाढ आणि अभंग राहिली आहे व पुढेहि ती आमरण टिकेल. आमच्या साध्या सरळ आयुष्यांत ती बाब अत्यंत अभिमानाची आहे यांत शंका नाही. बाकीचे उद्योगहि केवळ रिकामपणाची परंतु आवडीची कामगिरी आहे. आंब्याची कोय वाजली तर पिपाणी, नाहीपेक्षा भाजून खाऊन व वर पाणी पिवून गोड तोंड करण्याचें समाधान तिच्यामुळे लाभतें, एवढेंच तिचें महत्व. कळावे ही विनंति.

आपला

**रामचंद्र विनायक पटवर्धन**

# शककर्ता शालिवाहन

*      *      *

" यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ "

*      *      *

## पुरुष-पर्व

### ( प्रारब्ध कांड )

# अनुक्रमणिका

## पुरुषपर्व


| (१) प्रारब्ध कांड:– | पृष्ठांक |
|---|---|
| १ नागाची जात | ९ |
| २ कुंभारवाडा | १४ |
| ३ गुरु व शिष्य | १९ |
| ४ प्रतिष्ठानची गुजरी | २५ |
| ५ श्रीमुखाची शक्ति | ३१ |
| ६ सतीची समाधी | ३८ |

| (२) पराक्रम कांड:– | पृष्ठांक |
|---|---|
| ११ संपूर्ण जीवन | ७७ |
| १२ मातृसावर्ण्य | ७९ |
| १३ महायात्रा | ८१ |
| १४ कंटकेनैव कंटकम् | ८५ |
| १५ संत तमसाचार्यांची भेट | ९० |
| १६ विवाहाची मागणी | ९६ |
| १७ दोघां मित्रांच्या दोन वाटा | १०१ |
| १८ संस्कृत–प्राकृत विनोद | १०८ |
| १९ पुरुषपूरची क्रांति | ११२ |
| २० शकांचें उच्चाटण | ११६ |
| २१ पुण्याहवाचन | १२० |


## प्रकृतिपर्व


| (१) भूतकाळ | |
|---|---|
| ७ मौर्यांचें साम्राज्य मोडलें | ४७ |
| ८ आपला महाराष्ट्र देश | ५३ |
| ९ कुमारीपुत्र कर्ण | ६२ |
| १० दक्षिणेचा पराक्रम | ६८ |

| (२) भविष्यकाळ | |
|---|---|
| २२ अनाद्यंत काळ | १२५ |
| २३ शकारंभानंतर | १२७ |
| २४ संशोधकांना अहेर | १३० |

# शककर्ता शालिवाहन

## १

### नागाची जात–

गोदावरीच्या वाळवंटांत मुलांचा खेळ चालला होता. हुतुतूचा मस्तीचा खेळ! खाली मऊ मखमली वाळू सर्वत्र पसरली होती. तिचा रंग नवीन फुललेल्या कापसासारखा चमकदार पांढरा होता. मावळतीच्या सूर्याचे मंद लालसर किरण नदींतील तरंगलहरीवर नाचून परावृत्त होत असतांना त्यांची लाल खुलावटी झाक मधूनमधून वाळूच्या उंचसखल ढिगारावर पडलेली दिसत होती! त्यामुळे तें वाळवंट फुललेल्या पऱ्हाटीच्या

लांबलचक शेतासारखे शोभत होते. बोंडाचा लालिया रंग व कपाशीची पांढरी जरतार यांचें मनोहर मिश्रण चित्रकाराने जणूं त्या नैसर्गिक फलकावर चितारलें होतें. आणि तीं खेळणारीं चिमणीं पांखरें–त्यांचा तो फिकट श्यामल वर्ण व त्यावर चमकणारी सरबती जातीच्या गव्हाची लालसर झाक ! त्यांचे रेखीव नसले तरी ठसठशीत नाकडोळे, मध्यम उंचीचे परंतु भरदार अवयव आणि त्यांच्या चेहऱ्यावरील निर्भय व निर्भीड भाव पाहून हे जमीनीचे खरे मालक असतील असें कोणीहि उमजला असता. पांढरपेशांच्या नागरी नाजूक नखऱ्यापेक्षा हें ग्रामीण सौंदर्य अधिक भरीव व मस्त दिसतें ! आग्रा येथील ताजमहाल व भेडाघाटच्या नर्मदेला अंगाई करून थापटून थोपटून निजविणाऱ्या संगमरवरी पहाडांच्या कपारी यांच्या सौंदर्यांत जें अंतर, तेंच नागर व ग्रामीण जीवनांत व्यतीत होतें.

त्या दहा बारा मुलांच्या टोळक्यांत एक मुलगा विशेष डौलदार दिसत होता. त्याचा पोषाख इतरासारखाच किंबहुना अधिक साधा होता. त्याचे अवयव भरदार व सुदीर्घ दिसत. परंतु त्याचा डौल न्याराच होता. त्याच्या मोठाल्या डोळ्यांतून प्रकाशलहरी बाहेर पडून त्याच्या गालांवर खेळतांना दिसत. त्याने सहज वर पाहिलें कीं त्याच्या मुद्रेवर करारीपणा दिसून येई. त्याने सहजगत्या आपल्या सोबत्याला हाक मारली तरी ती हुकुमी वाटे. तो जन्मतः पुढारी होता. त्याचा अधिकार त्याचे सोबती मुकाट्याने मान्य करीत असत, परंतु खेळाच्या धकाधकींत एखादा बंडखोर त्याची आज्ञा झुगारून देई आणि मग—

“ शक्ती ! शक्ती ! सोड रे त्याला ! मारूं नकोस ! तो बघ कसा रडतो आणि घाबरला तरी किती ! पुनः नाही तो खोटें खेळणार ! एकदा त्याला क्षमा कर.” अशी त्याचे इतर सोबती त्याची विनवणी करूं लागले !

शक्ती ! हें नांव त्याला चांगलेंच खुलत होतें! त्याचें धाडस त्याच्या मित्रांच्या पूर्ण परिचयाचें होतें. पूर आलेल्या नदींत पोहतांना, झाडावरच्या सर्वांत उंच डगाळीवर चढतांना व तेथून चिंचा बोरे गोळा करतांना, जंगलांतून जनावरांचा माग काढतांना, बिळांतून सापांच्या शेपट्या धरून ते ओढून काढतांना, विचवांना उघड्या पायांनी ठेचून मारतांना त्याच्या मनाला भीति कधीच शिवत नसे. तो आपल्या हुकमी आवाजांत म्हणाला, " पण तो तर कांहीं बोलतच नाही. तुम्ही कशाला त्याची तरफदारी करतां? पुनः खोटे खेळणार नसेल तर मी त्याला सोडून देईन. कायरे पार्था, क्षमा मागतो कीं आणखी धम्मकलाडू देऊं खावयास ? "

पार्थ शक्तीच्या मानानें मोठा दिसे. त्याची व शक्तीची नेहमी चुरस चाले ! पार्थ एका श्रीमंत शेतकऱ्याचा मुलगा होता. त्याचा गावांत मोठा मळा होता व त्याचें घर कौलारू होतें. तीन विसा गाई-म्हशी, बैल अशीं थोराड जनावरें त्याच्या गोठ्यांत बांधलीं असत. खाण्या-पिण्याची चंगळ असल्यामुळे त्याचे गाल गुबगुबीत व गुलाबी दिसत. तो धष्ट-पुष्ट दिसे परंतु शक्तीचा डौल त्याच्या ठिकाणीं नव्हता. शक्तीचें विशेष आकर्षण म्हणजे त्याचें विलक्षण चापल्य ! वाऱ्यासारख्या वेगाने तो धावे ! त्याचें काटक शरीर विजेसारखे लवत असे व नागाप्रमाणे त्याची हालचाल होई. सिंहापुढे जसा रेडा तशीच पार्थाची गति शक्तीच्या तडाक्यांत सापडल्यावर झाली.

भांडणाचें मूळ खोल नव्हतें. पार्थाला शक्तीच्या पाटींतील गड्याचा हात लागून तो बाद झाला होता; पण पार्थ कांही केल्या तें कबूल करीना ! तो खेळांतून गुपचुप बाहेर पडेना, तेव्हां शक्तीने त्याच्यावर चाल केली. पार्थ

शक्तीला कडकडून डसला आणि शक्तीने त्याला वाळूंत लोळवला. मुलें ओरडलीं, "पार्था, तूं शक्तीची क्षमा मागून मोकळा हो कसा! तुला सुघ-न्ध्याचा खराच स्पर्श झाला. आम्ही सर्वांनी तें प्रत्यक्ष पाहिलें. तूं कां नाकबूल करतोस? खोटे खेळण्यांत मौज नाही."

"खरेच पार्था! तूं दुसऱ्या पार्टीचा पार्टीदार ना? तूंच खोटं खेळूं लागलास तर तुझे गडी तुझाच घडा गिरवितील! हें कांही बरें नाही. नाही तर माझ्याशीं गाठ आहे?" शक्तीने त्या मुलांना साथ दिली.

दांत ओठ खाऊन पार्थ ओरडला, "कुंभारड्या, तुझ्या घरच्या गाढवासारखा माजलास होय." यावर शक्तीने त्याला एक ठोसा मारून म्हटलें, 'बोल, पुनः बोल.'

पार्थाचा द्वेषाग्नि भडकला. त्याचा चेहरा संतापाने लालभडक झाला! तो ओरडला, "बोलीन, एकदां नव्हे हजारदां! तुझ्या बापाची काय मला भीति वाटणार?"

"काय, माझा बाप काढतोस?" शक्ती गरजला.

पार्थ कुत्सितपणें उत्तरला, "मी विसरलो होतो कीं तूं निबाप्या कर्ण म्हणून! बापाचा ठावठिकाण नाही, आई कुंभारवाड्यांतील भवानी आणि हा निबाप्या त्या पराक्रमी कर्णाचा आव आणीत आहे! वा राव!"

हे जहरी शब्द कानीं पडतांच शक्तीने त्यास मारण्यासाठी उगार-लेला हात लुला पडून खाली आला, त्याचे डोळे अश्रूंनी भागवले व त्या गंगायमुना त्याच्या गालावरून वाहूं लागल्या! त्याने पार्थाला सोडून दिले, मान खाली घातली व तोंड फिरवून मुकाट्याने खेड्याची वाट तो चालूं लागला!

पार्थ उठून उभा राहिला व मोठमोठ्याने टाळ्या वाजवून व खिद्‌-ळून ओरडूं लागला, "कशी जिरली एकाची! निबाप्याची मस्ती उतरली! कर्णाचे कान कापले गेले!" हे शब्द शक्तीला ऐकूं गेले परंतु तो थांबला नाही किंवा त्याने मागे मान वळवून पाहिलेंहि नाही. तो मुकाट्याने वाट चालत होता.

पार्थाची बडबड आणखी उताला आली. पण सुधन्व्याने त्याची मानगुट पकडून म्हटलें, "गाढवा! तूं शक्तीचा असा पाणउतारा करावयाचा नव्हता. चूक तुझी होती, त्याची नव्हती. तो अस्सल नागवंशी आहे! तुझा चावा घेतल्याशिवाय तो सोडणार नाही. दसफणी नागाचा दंश म्हणजे मृत्यु!"

इतर मुलांनीहि सुधन्व्याचा पाठपुरावा केला. ते म्हणाले, "कोणीहि शाहणा इसम जातिवंत नागाशीं वैर करीत नाही."

पार्थ वरमला; तो म्हणाला, "काय तो कर्ण नाग आहे?"

सुधन्वा गंभीर स्वराने म्हणाला, "शक्ती हा नागच काय पण नागराज शेष आहे. विष्णूची त्याच्यावर पूर्ण कृपा आहे."

# २

## कुंभारवाडा—

प्रतीष्ठान नगरीच्या पंचक्रोशीच्या बाहेर असणारें तें एक गोदावरीच्या तीरावरील चिमुकलें खेडेगांव होतें. खेड्यांत आढळणारे ठराविक मिरासदार व बलुतेदार तेथेहि राहत असत. परंतु त्या खेड्याला अर्धचंद्राकार वळसा घालून त्या खेड्याच्या सीमेजवळच एक लहानसा ओढा आपलें नम्र जीवन गोदामातेच्या चरणावर अर्पण करीत असल्यामुळे त्या वळणांत पावसाळी भरतीचा गाळ बराच सांचला होता. तेथील लोण्यासारखी माती इतरांना चिखलासारखी भासली तरी कुंभारांना ती सोन्याची खाणच वाटे! त्यामुळे त्या खेड्यांत कुंभारांची वसती विशेष प्रमाणांत होती. कारण राजधानी जवळ असल्यामुळे त्यांच्या तयार मालाचा उठाव सहज होई! जवळ

मोठी बाजारपेठ असल्याशिवाय असे धंदे वाढत नाहीत. त्या ओढ्याच्या वाकणांत विटा व कवलारूंचे आणि मडक्या गाडग्यांचे ढीगच्याढीग इतस्ततः पसरले होते. कांही कच्चे काळुंद्रे तर कांही पक्के लालाजी !

कांही भट्टया शिलगलेल्या असत तर कांही विझलेल्या दिसत आणि इतरांतून चिलमींतून निघतो तसा मंद जाळ व दाट धूर निघतांना दृष्टीस पडे ! संध्याकाळीं तर असा भास होई कीं, जणूं पांच-पन्नास मित्रमंडळी मोकळ्या मैदानांत चिलमी फुंकत संसारांतील सुखदुःखाच्या गोष्टी जीवा-भावाच्या बोलीने एकमेकांना सांगून परस्परांना रिझवीत आहेत. खाली जमीन व वर आकाश असली उघडी मैफल दिवाणखान्यांतील तक्यालोडाच्या बिछा-यतीच्या मानाने किती साधी, परंतु ती तितकीच मनमोकळी असते. तिचें दिखाऊ दारिद्र्य मनाच्या श्रीमंतीने झाकलें जातें. खेड्यांत सुधारणेचा ढंग नाही आणि विद्वत्तेचा दंभ नाही. मनांतले विचार आंतल्याआंत दडून न राहतां भोळेपणाने सहजगत्या बाहेर पडतात ! आंत एक व बाहेर दुसरें ही चालबाजी तिथे कोणाला माहितच नसते. पोटांत जहर व ओठांत अमृत एकसमयावच्छेदेकरून वागविण्याची विद्या खेडवळांना अवगत नसते. ते हसतील, बोलतील, भांडतील, शिव्यागाळी करतील आणि हमरी-तुमरीवरहि येतील, परंतु मैफलींतून घरी परत जातांना सारा कडूपणा त्या मोकळ्या मैदानांत सोडून रिकाम्या परंतु हसऱ्या मनाने ते तेथून बाहेर पडतील. सापाचा डंक धरण्याची दीर्घद्वेषी विद्या त्यांना येत नसते.

जवळच कुंभारवाडा वसला होता. कुंभारांच्या झोपड्यांतील दारिद्र्य निराळें वर्णन करून सांगावयास नको. कुंभारवाड्यांतील सर्वांत मोठी व स्वच्छ झोपडी महाबाहू कुंभाराची होती. महाबाहू उत्तम प्रतीचा कामगार होता. त्याचें वर्तन चोख असे. त्याचा माल मोहक व वाणी मिठास

असे. त्यामुळे गिऱ्हाईक त्याच्यावर खूष असत. त्याची सारखी भरभराट होत होती. पण ती त्याच्या भाऊबंदांच्या डोळ्यांत खुपत नसे. कारण त्याचा स्वभाव दिलदार होता.

इतर कुंभार त्याला थट्टेने विचारत, "महादादा, तुला एखादा मोहरांचा हंडा जमीनींत गाडलेला गवसला कां? तुझी नेहमी चलती असते. आमच्या धंद्याची कधी पुनव तर कधी अवस होते. पण तुझ्या घरीं रोज पुनवेचें चांदणें फुलतें म्हणून विचारतो, रागावूं नको."

महाबाहूने मोकळेपणाने हसून उत्तर दिलें, "राग आपल्या भावा-बंदांचा कोण धरील? राग शत्रूंचा करावयाचा असतो. मोहरांचा हंडा तर मला सापडला नाही, पण समुद्रांतील एक सुंदर शिंपली व तिच्या पोटांतील पाणीदार मोत्याचा दाणा माझ्या हातीं लागला. तेव्हांपासून माझें नशीब उघडलें."

शेजारी उत्सुकतेने विचारपूस करूं लागले. त्यांचें कुतुहल वाढीस लागले.

त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याच्या उद्देशाने महाबाहू म्हणाला, "माझा नातू शक्तिकर्ण हा मोतीच काय पण परीस आहे. त्याचा हात लागला कीं लोखंडाचें सोनें होतें आणि माझी मुलगी शक्तिमती—

"पण महादादा, ती कांही तुझी सग्गी मुलगी नाही. तुला ती कुठे तरी सांपडली असें ऐकतो."

"माझी पोटची मुलगी तरी तिच्यापेक्षा अधिक सेवा थोडीच करणार, माझी! प्रत्यक्ष देवी आहे! केवढी साध्वी! दुसरी सती सावित्री आहे! पूर्वी मला गर्व वाटे कीं मी त्यांना संकटांत आश्रय दिला. पण त्यांचाच आज मला आधार वाटतो. त्यांच्यामुळे माझ्या झोपडीला घराचें

रूप आलें आणि देव कृपा करील तर त्या घराचा यापुढे राजवाडा होईल. ईश्वराने माझ्या नातवाला-शक्तीला भरपूर आयुष्य मात्र द्यावें!" महाबाबूने बोलतां बोलतां ईश्वराला हात जोडले!

" महादादा, संभाळ बरं! हीं चिकटवलेलीं नातीं-गोतीं मातीच्या पेंडाप्रमाणे वाढल्यावर सुटून दूर होतात. शक्तिकर्ण मोठा राजबिंडा दिसतो. तुझ्यासारख्या कुंभाराचा नातू तो शोभत नाही. सुतासारखा सरळ आणि खारीसारखा चपळ आहे तो. त्याच्या आईची तुला कांही पूर्वीची माहिती लागली कां? ती कोणाची कोण?—"

" एखादा आंधळाहि सांगेल कीं ती थोरामोठ्याची असली पाहिजे. ती आमच्या घरीं आल्यापासून देवापुढे निराळें नीरांजन लावण्याची गरजच पडत नाही. किती साधें सौम्य तेज आहे तिचें! कोणत्या राजाची राणी होती देव जाणे. तिला तिची हकीगत विचारण्याचें धैर्यच मला होत नाही. तिच्या सुकुमार मनाला प्रश्न विचारून कोण दुखवील? ती मला तोंड भरून बाबा म्हणून हाक मारते. मीहि तिला बाळ म्हणतो. आम्हाला पोटचं मूलबाळ झालं नाही, तेव्हां देवाजीच्या कृपेने हें रत्न सापडलं. तीच आमची मुलगी व शक्तिकर्ण आमचा नातू. माझ्या घरधनिणीला तर ती डोळ्यांतील बाहुली वाटते आणि शक्तीला तर ती हिराच समजते. बारा वर्षें झालीं त्या गोष्टीला. एखाद्या भ्यालेल्या हरणीप्रमाणे या चार महिन्याच्या पाडसाला घेऊन ती धावपळ करत, धापा टाकीत आली व माझ्या झोपडींत शिरली! मध्यरात्र उलटली असेल. बाहेर वारा घोंघा-वत होता अन् पाऊस धो धो पडत होता. विजा लवत होत्या आणि ढग किंचाळत होते. तेव्हां माझी बाळ मला गवसली. मला वाटलें कीं विजेबरोबर ती आभाळांतून खालीं आली. तिने झोपडीचें दार जोराने

ढकललें. आम्ही दोघे नवरा बायको जागे झालो व तिला हटकूं लागलो. आम्हाला भय वाटलें कीं, रात्रीची हडळ-विडळ तर नाहीना घरांत शिरली. तिने आपलें पाडस माझ्या घरधनिणीच्या हातांत दिलें व आपण स्वतः माझे पाय धरले! तिने माझ्याकडे वर मान करून पाहिलें आणि माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें. केवढी करुणा त्या डोळ्यांत भरली होती; ओसंडून सांडत होती. एकच वाक्य ती बोलली, 'बाबा, आपल्या या अनाथ लेकीला व तिच्या पिलाला आसरा द्या.' चांदीच्या घंटेसारखा गोड आवाज बघा. घरधनीण म्हणाली, 'ऊठ बाळ, देवानेच माझी रिती ओटी आज भरली! मला वांझोटीला मुलगी सापडली व नातू झाला. ईश्वर तुझें कल्याण करो.' मला उद्देशून नंतर घरधनीण म्हणाली, 'घरधनी, या मुलीच्या तोंडांत चिमुटभर साखर घाला. आपल्या वठलेल्या वंशवेलीला नवी पालवी फुटली व कोमल कुसुम लाभलें! आपलें रितें घर आज भरलें! आपला संसार फळाला आला.' मी तिला 'तथास्तु' म्हणालो. माझ्या या नव्या कन्येला मी निरखून पाहिलें. ती माता होती पण तिच्या गळ्यांत मंगळसूत्र दिसत नव्हतें. ती विधवाहि दिसत नव्हती कारण तिच्या कपाळावर कुंकवाची टिकली होती. मी मनांत म्हटलें ही कुमारी माता कुंती दिसते. भगवान श्रीकृष्ण तिचें मंगल करो व तिच्या पुत्राचें संरक्षण करो."

---

# ३

## गुरु व शिष्य-

गांवाबाहेरील महादेवाच्या देवळांत एक जटाधारी तरुण साधु रहात असे. पुण्यमया गोदावरींत सूर्योदयापूर्वी स्नान करावयाचे व प्रहरामप्रहर त्या शीतल जलांत उभे राहून मंत्रपाठ करावयाचा, हा त्याचा नित्यक्रम होता. तो ही खडतर तपस्या कशासाठी करावयाचा, कोण जाणे ? क्षुधाशांती-प्रीत्यर्थ रानावनांतील कंदमुळें गोळा करून तो तीं सेवन करीत असे. अन्नाची गरज त्याला भासत नव्हती व लंगोटीशिवाय दुसऱ्या वस्त्राचा स्पर्श त्याच्या देहाला होत नसे. हाताच्या ओंजळीने तो पात्राचें काम भागवी. ' शय्या भूमितलं दिशोऽपि वसनम् ' या थाटांत त्याची रात्रीची निद्रा व विश्रांती पार पडे. त्याचा वर्ण लालबुंद असे व त्यामुळे त्याच्या

दाढीमिशांचें काळें भोर जंगल त्याच्या मुखमंडलावर खुलून उठे. त्याच्या अंगावर भस्माचे पट्टे ओढलेले दिसत. परंतु तो विस्तव कधीच पेटवितांना कोणाला दिसला नाही. चूल नाही व धुनी नाही, असा विलक्षण बाबा होता तो ! भस्मासाठी लागणारी राख तो स्मशानांतून आणी कीं काय कोण जाणें. परंतु बाबाचा वस्तीशीं कोणताहि संबंध येत नसे. त्याचे डोळे मोठे भेदक व त्याची मुद्रा उग्र दिसे. त्यामुळे गावांतील लोक त्याला भीत असत व दुरूनच त्याला नमस्कार करीत.

परंतु खेड्यांतील लहान मुलांना या माणूसघाण्या बाबाजीचें मुळीच भय वाटत नसे. दोन प्रहर दिवस झाला म्हणजे मुलें त्या देवळांत जात व बाबाजीशी मस्ती करीत असत. तो साधु बाबा त्यांना श्लोक शिकवी, हिशोब समजावून देई व पुस्ती काढावयास सांगे. मुलांचा अभ्यास घेणारा हा बाबाजी त्यांच्या बरोबर विटी-दांडू, हुतूतू, लपाछिपी वगैरे खेळहि खेळत असे. लहान मुलें त्याच्या अंगाखांद्यावर चढत, त्याचा घोडा करत व त्याच्यावर राज्य देत ! पण तो कधीच त्यांच्यावर चिडला नाही. त्या मुलांबरोबर खेळतांना बाबाजी मुलांपेक्षाहि मुल बनत असत. सूर्यास्त झाला म्हणजे मात्र बोवाजी लहान मुलांना निरोप देत व त्यांची घरांकडे रवानगी करीत असत व आपण जंगलांत भटकावयास जात. मोठीं मुलें वेळप्रसंगीं त्यांच्याबरोबर रानावनांत भटकत असत. रात्रीचा पहिला प्रहर उलटला कीं बोवाजी परत आपल्या विश्रामधामांत येत आणि बरोबरच्या मोठ्या सवंगड्यांनाहि निरोप देत. प्रहर रात्र उरली कीं, बोवाजींचें आन्हिक चालू होई. तें मध्यान्ह उलटून गेल्यावर समाप्त होई.

एक दिवस दुपारीं आपलें रोजचें आन्हिक आटोपून साधुबाबा महादेवाच्या पिंडीसमोर ध्यानस्त बसले होते. त्यांनी पद्मासन घातलें होतें व

हात स्वस्तिकाकार छातीवर ठेवले होते. त्यांचे डोळे मिटले होते परंतु त्यांच्या मुद्रेवर प्रसन्नता दिसत होती.

शक्तीने त्यांच्या चरणांना स्पर्श केला व त्यांच्यासमोर हात जोडून तो उभा राहिला.

शक्तीच्या चरणस्पर्शाने बाबाजींच्या विचारसमाधीचा भंग झाला परंतु त्यामुळे त्यांना राग न येतां त्यांच्या मुद्रेवर सौम्य हसूं उमटलें. त्यांच्या मनांत त्यावेळीं कोणते विचार चालूं असतील कोण जाणे?

डोळे उघडून त्यांनी त्या बलिष्ट, तेजःपुंज व निर्भय वृत्तीच्या कुमाराकडे पाहिले. ते हसून म्हणाले, " बाळ, तूं कोण आहेस?"

शक्तीने निर्भय वाणीने उत्तर दिलें, " मी कुंभारवाड्यांतील महाबाहू कुंभाराचा नातू आहे. माझें नांव शक्तिकर्ण! माझे सवंगडी मला प्रेमाने शक्ती असें संबोधतात. परंतु माझें त्यांच्याशीं भांडण झालें म्हणजे मात्र ते माझी कर्ण म्हणून टवाळी करतात!"

बाबाजींनी अत्यंत सहानुभूतिपूर्ण स्वरांत विचारलें, "कां रे, बाळ?" त्यांच्या अत्युग्र दिसणाऱ्या मुद्रेशीं तो सौम्य व प्रेमळ स्वर विसंवादीच होता.

" कारण? कारण एकच! तें उघड आहे. मला आई आहे. महाबाहूची कन्या शक्तिमती ही माझी आई होय. परंतु मला पिता नाही. माझी आई माझ्या पित्याचें नांव सांगत नाही. ती सुवासिनी नाही व विधवाहि नाही. ती कुमारी माता आहे. तेव्हां ज्यांना पिते आहेत त्यांनी या निबाप्या मुलाची कर्ण म्हणून हेटाळणी करणें स्वाभाविक आहे." शक्तीने सरळ उत्तर दिलें.

" वत्सा शाबास ! तूं कुंभार खास नाहीस. एखादा उच्चकुलोत्पन्न ब्राम्हण किंवा क्षत्रियकुमार तूं असला पाहिजे ! ही निर्भय सत्यप्रीति व हें बाणेदार उत्तर त्याशिवाय संभवतच नाही." एवढें बोलून बाबाजी ताड्कन उठून उभे राहिले व त्या कुमाराकडे आपल्या भेदक नजरेने बारकाईने पाहूं लागले. दहापांच क्षण दोघेहि मूक होते. बाबाजींनी त्या कुमाराला दृढ आलिंगन दिलें व त्याच्या डोक्यावर प्रेमाने आपला हात ठेवला ! ते म्हणाले, " वत्सा, आज तूं कोणत्या उद्देशाने मजकडे आलास? सांग, मनमोकळेपणाने सांग. मी तुझी इच्छा परिपूर्ण करीन."

कुमाराने पुनः त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें व तो त्यांना अत्यंत नम्र स्वराने म्हणाला, " गुरुजी, सत्य छपवून छपत नाही. तें प्रगट होणारच. आपण शिष्य म्हणून माझा स्वीकार करा व मला विद्यादान द्या. मला आपली सेवा करण्याची संधी द्या. आपण तपस्वी आचार्य व मी एक गरीब निब्राण्या कुंभार ! "

गुरुजींनी त्याच्या तोंडावर प्रेमाने हात ठेवून म्हटलें, " वत्सा, तुझ्यासारखा शिष्य मिळाल्याने मी आज धन्य झालो ! वसिष्ठाला त्याचा राम मिळाला ! महर्षि वसिष्ठ गुरुदेव खरे, परंतु ते केवळ रामचरित्रपराक्रमाला निमित्तमात्र कारण झालें. वसिष्ठ थोर ऋषी परंतु त्यांचा शिष्य रामचंद्र प्रत्यक्ष देव !"

कुमाराचें मन आनंदाने उचंबळून आलें. तो म्हणाला, " मी अकुलीन व हीन असलो तरी भिल्लपुत्र एकलव्याप्रमाणे मी आपली एक-निष्ठेने सेवा करीन. आपण माझे द्रोणाचार्य व्हा. आपण प्रत्यक्ष मला शिकविलें नाही, तरी आपल्या निर्जीव मूर्तीपासून देखील मी विद्या संपादन करूं शकेन. आपला आशीर्वाद मात्र मला असावा. "

" वत्सा, तूं एकलव्य न होतां माझा युधिष्ठिर शिष्य हो. सामुद्रिक विद्येच्या बळावर मी सांगूं शकतो कीं चक्रवर्ती सम्राटाचीं सर्व लक्षणें तुझ्या ठायीं मला दिसत आहेत. तूं आपल्या कुळाचा व त्याबरोबर विपत्तींत सापडलेल्या आपल्या हिंदु-जातीचा व धर्माचा उद्धार करशील. तुझ्यासारख्या महापुरुषाची देशाला आज अत्यंत गरज आहे. काळ तुझीच वाट पाहत आहे. तूं काळावर विजय संपादन करून आपली नाममुद्रा त्याच्यावर रेखांकित कर. युधिष्ठिराप्रमाणे तूं हिंदुस्थानचा महान कालभर्ता गणला जाशील, असा माझा तुला आशीर्वाद आहे. हें माझें भविष्य कदापि खोटें ठरणार नाहीं. तें अढळ आहे." बोलतां-बोलतां गुरुजींचे नेत्र प्रेमाने स्निग्ध झालें. त्यांनी कुमाराला पुनः आलिंगन दिलें. आपल्या शुभ उत्तेजनपर भविष्य वाणीने शक्ती बाहू स्फुरण पावत आहेत व त्याचें सर्वांग पुलकित झालें आहे, असें गुरुजींना आढळून आलें.

शक्तीचें शिक्षण जोराने चालूं झालें. दोन प्रहर दिवस होईतोंपर्यंत तो कुंभारवाड्यांत काम करी व आपल्या आजोबाला हातभार लावी. गृहकृत्यांत गढलेल्या आईचें काम करूं लागुन तिच्याहि श्रमाचा तो थोडा-बहुत परिहार करी. कामाचा कसा तो कंटाळाच त्याच्या गावीं नव्हता. ' अरे पुरे, आतां, थकशील ' असें सांगतां सांगतां त्याच्या आईचें व महाबाहूचें तोंड दुखूं लागे परंतु शक्तिकर्णाचे चपळ व बलिष्ट अवयव थकत नसत. शेजाऱ्यापाजाऱ्यांची अडीअडचणींचीं कामें देखील तो सांभाळी व त्यांची नड भागवी. त्यामुळे घरीं-दारीं सर्वांचाच तो लाडका झाला होता.

दोन प्रहर दिवस झाला म्हणजे मात्र तो क्षणभरहि गावांत थांबत नसे. तो तडक महादेवाचें देऊळ गाठी. कारण गुरुजींची रोजची

तपस्या त्या सुमारास आटोपते, हें त्याला ठाऊक झालें होतें. तो एकदा दोन प्रहरीं देवळांत गेला म्हणजे प्रहर रात्रीनंतरच घरीं परते. कधीकधी तर वनांत शिकारीसाठी भटकत असतां मध्यरात्र उलटली तरी घरीं परतण्याचें भान त्याला राहत नसे. शक्तिकर्णाला प्राकृत महाराष्ट्री भाषा येत होती. कारण ती त्याची मातृभाषाच होती. तो अतिशय बुद्धिमान असल्यामुळे व्यवहारी हिशोब टिशोब त्याला उत्तम कळत. गुरुजींनी कां कोणास ठाऊक, त्याला संस्कृत भाषा व्याकरणाची, वेद-उपनिषदांची किंवा षड् शास्त्रांची संथा दिली नाही. ते त्याला प्राकृत भाषेंतूनच उपदेशद्वारा शिकवीत. संस्कृतच्या ऐवजी पैशाची भाषा मात्र त्यांनी शक्तिकर्णास शिकविली व त्या भाषेंत असणाऱ्या अनेक राजनीतिपर कथा दृष्टांतांनी विद्यामृताचें सिंचन त्याच्यावर केलें. भविष्यकाळांत संस्कृतपेक्षा पैशाची भाषावाङ्मयाचा शक्तिकर्णास अधिक उपयोग होईल, असें कदाचित त्यांना वाटलें असावें. गुरुजी साधुसंत असले तरी खड्गविद्येंत निपुण होते व मल्लविद्या त्यांच्या रोमरोमीं भिनली होती. मृगया करण्यांतहि ते पटाईत होते. परंतु पूर्ण वाढ झालेल्या गुरुजींपेक्षा त्यांचा वर्धिष्णू शिष्य शारीरविद्यांत अधिक प्रवीण झाला तर त्यांत नवल नाही. भीष्म, द्रोण हे थोर आचार्य खरे, परंतु अर्जुनाला त्या दोघांचाहि युद्धांत पराभव करतां आला. वडीलकी कधी तारक तर कधी मारक होते.

# ४

## प्रतिष्ठानची गुजरी-

प्रतिष्ठान नगरींत व सभोतालच्या प्रदेशांत शक क्षत्रपाची राजवट चालूं होती. आंध्र राजांचा व त्यांच्या मांडलिकांच्या सत्तेचा मागमूसहि उरला नव्हता. लोक हिंदुधर्मी व शिवपूजक होते. परंतु शकांना धर्मच नव्हता. त्यांना कोणतीच समाजबंधनें प्रारंभीं नव्हतीं. परंतु राजसत्ता हातीं आल्यावर प्रजा-पालनाची व प्रजानुरंजनाची जबाबदारीहि त्यांना स्वीकारावी लागली. शिवाय त्यांची जुनी गोत्र-प्रधान कुटुंबरचना नव्या परिस्थितींत त्यांना अडचणीची व अडगळीची वाटूं लागली. त्यांचे स्वैर

वर्तन प्रजेच्या उपहासास पात्र झाल्यामुळे त्यांनी आपल्या स्वैराचारावर कांही बंधनें घातलीं व त्यांना धर्माज्ञांचें रूप दिलें. शकांचा अनाचारी सांप्रदाय शाक्त पंथ या नांवाने हिंदु-धर्मांत मोडूं लागला. हिंदुधर्माच्या विशाल व उदार महासागरांत ज्याप्रमाणे गंगा–सिंधु–ब्रम्हपुत्रा–नर्मदा–गोदावरी या पवित्र नद्या विलीन झाल्या आहेत त्याप्रमाणे अनेक गढूळ व गलिच्छ ओढेनालेहि त्यांत लुप्त झालें आहेत. ओढ्यांच्या घाणीने सागर थोडाच भ्रष्ट होणार? उलट पुष्पसंगतीने मातीस सुवास लागतो त्याप्रमाणे त्या घाण पाण्याच्या ओढ्यांना कालांतराने महासागराचें पावित्र्य पूर्णत्वाने नसलें तरी अल्पांशाने प्राप्त होतें.

क्षत्राप राजे व त्यांचे शक शिपाई शाक्त-पंथी बनले. परलोकांपेक्षा इहलोकाला मोल चढलें. खाणें, पीणें व मौज मारणें हा धर्म ठरला. मद्य, मांस व मायांगना यांचा भाव वाढला. मंगळवार व शुक्रवार या देवीच्या उपासनावारीं शक्तिपूजा राजरोस चालूं झाली. देवीला मद्याने स्नान घालावें व तें तीर्थ सर्वांनी सेवन करावें, मांसाचा नैवेद्य देवीला दाखवून तें मांस सर्वांनी यथेच्छ चापावें आणि घटकंचुकीसारख्या आचरट व निंद्य व्रत-प्रयोगाच्या आधारें सुंदर सुंदर ललनासह सामुदायिक व्यभिचारांत मग्न होऊन मौज मारावी, हें शाक्त सांप्रदायाचें थोडक्यांत स्वरूप होतें. जेत्यांच्या अनुयायांत स्वाभिमानशून्य व स्वत्वहीन जित देखील समाविष्ट होतात. या सर्वसामान्य सिद्धांतानुसार अनेक हिंदुधर्मी प्रजाजन आपल्या भगिनी-कन्या-पत्नीसह शकांच्या शाक्त पंथांत सामील झाले! अस्सलापेक्षा बनावट नाणें अधिक चमकदार दिसतें, अधिक मधुर स्पष्ट नाद करतें. जातींवंतापेक्षा बाटगा अधिक कडवा असतो, निदान तसा तो दिसतो किंवा दिसण्याचा प्रयत्न तरी करतो. हे बाटगे म्हणत, ' आमच्या नव्या राज्यकर्त्यांनी निर्माण केलेलें हें हिंदुधर्माचे नवें स्वरूप किती गोड, मोहक,

मधुर व आनंदमय आहे. शाक्त संप्रदाय हाच मानवी उन्नतीचा व उद्धाराचा राजमार्ग होय.' प्राचीन धर्ममार्गाने चालणारांची जुनाट, प्रतिगामी, बुरसलेले, मागसलेले, गबाळे, गुलामी वृत्तीचे व मेलेल्या मनाचे म्हणून लोकांत टवाळी होई. राज्यकर्त्यांच्या भीतीने सनातनी हिंदूंना आपले धार्मिक विधी व पूजापाठ अंधारांत व खासगी रीतीने उरकावे लागत. शाक्तपंथांत शिरलेले हिंदू स्वतःस पुरोगामी, पुढारलेले, सुधारक, स्वतंत्र वृत्तीचे, व नव्या विचाराचे विद्वान समजत असत. शक राज्यकर्त्यांजवळ अर्थातच अशा बाटग्यांची प्रतिष्टा असे. कारण अशा स्वार्थलंपट, चैनी, खुशालचेंडू, व लुबऱ्या कुड्यांच्या जोरावरच परकीय राज्यकर्ते आपली जुलमी राजवट यशस्वी करून दाखवितात.

आंध्रराजांच्या कारकीर्दींत सोमवारीं व गुरुवारीं गुजरी भरत असे. फार प्राचीन काळापासून व्यापाराची सूत्रें गुजराथ-पुत्रांच्या हातीं असत. ते उत्तम वैश्य शोभत. त्याप्रमाणेच आंध्रांची ब्राम्हणी विद्या व महाराष्ट्रीयांची क्षात्रिय वृत्ती पूर्वीहि सुप्रसिद्ध होती. त्यामुळे बाजाराला गुजरी हें नांव पडलें होतें. परंतु शक क्षत्रपांच्या राजवटींत शक्तिपूजेला महत्त्व आल्यामुळे मंगळवारीं व शुक्रवारीं गुजरी भरूं लागली. कारण हे देवीचे वार समजले जात असत.

प्रतिष्ठान धर्मनगरीचें विलासनगरींत रुपांतर झालें होतें. धान्य-धुन्य, भाजी-पाला, फळफळावळ, यांच्यापेक्षा नानातऱ्हेचीं मद्यें, अनेक पशुपक्षांचें मांस व विलासश्रृंगारसाज यांचींच दुकानें गुजरींत अधिक मोठ्या प्रमाणांत दिसूं लागलीं. यथा राजा तथा प्रजा! प्रतिष्ठानच्या आसमंतांत पसरलेल्या खेड्यांतील माल गुजरींत विकावयास येत असे.

कारण खेड्यापेक्षा राजधानींत मालाचा उठाव अधिक होतो. नागर लोकांच्या कशांत ग्रामीण लोकांपेक्षा अधिक द्रव्य खुळखुळत असतें.

जशी लोकांची आवड तशी मालाची सजावट आपोआप व अनायासे होऊं लागते. आकर्षक वस्त्र-भूषणें, रुचकर व चटकदार खाद्य पदार्थ, उन्मादक पेयें व उठावदार साज यांना तेजी आली. अंतरंगापेक्षा बाह्यांगाला मोल चढलें. सभ्य लोकांपेक्षा छाकट्या गिऱ्हाइकांचीच बाजारांत गर्दी असे. कारण ते जेते असल्यामुळे श्रीमंत अधिकारी म्हणून समाजांत मिरवत होते व त्यामुळे मनमानेल तो जिन्नस खरेदी करण्याचें त्यांना सामर्थ्य असे. विद्वान पंडित ह्या जेत्या शकांना शाक्त म्हणून संबोधीत परंतु प्राकृत भाषा बोलणारे सामान्य अशिक्षित इसम त्यांना छाकटे म्हणून ओळखीत असत.

गुजरीच्या एका कोपऱ्यांत वाकणच्या कुंभारवाड्यांत बनलेला माल विक्रीसाठी ठेवला होता. आकर्षक सजावटीचे चित्रविचित्र मद्यचषक व वस्त्रविहीन सुंदर बाहुल्या यांना बाजारांत मोठी मागणी असे. त्यांपैकी कांहीं बाहुल्यांना उन्मादक शृंगारसाज चढविलेला असे. मदन-रतीच्या विविध विलास-लीलांचे मूर्त प्रतीक असणाऱ्या बीभत्स उत्तानकारी मूर्तिचित्रांना बाजारांत चांगलेंच मोल येत असे.

पोटार्थी महाबाहूहि आपला माल विकण्यासाठी नियमाने गुजरीला येत असे. इतर कुंभारी दुकानदारांच्या मानाने महाबाहूचा माल रुक्ष भासे. देवी कालिकेच्या लहानमोठ्या मूर्ती व लढाऊ वीर शिपाई आणि शिकारी यांचीं चित्रें त्याच्या दुकानांत मांडलीं असत. तलवार किंवा परशू हातांत घेऊन परस्परांत द्वंद्वयुद्ध लढणारे वीर किंवा वाघ व वराहांना एका फटकाऱ्याने लोळवणारे आवेशार्थी शिकारी यांची रांगच्या रांग त्याच्या दुकानांत मांडली असे. हीं चित्रें प्रमाणबद्ध व मनमोहक असत. प्रतिष्ठानच्या मुलांना हे

शिपाई व शिकारी फारच आवडत. इतकेंच काय, पण नगरींतील कन्यकांना देखील आपल्या बाहुलीचें लग्न लावतांना असाच लढाऊ व चढाऊ नवरा भावलीसाठी योजावासा वाटे. त्यामुळे महाबाहूच्या मालाला भलतीशी मागणी असे. त्याच्या दुकानापुढे त्यामुळे नेहमी गर्दी असे.

जेते छाकटे लोक देखील त्याच्या दुकानांत मांडलेल्या देवी कालिकेच्या मूर्ती पूजेसाठी घरीं घेऊन जात असत. कारण कालिका हें शाक्तांचें जागृत दैवत समजलें जात असे. नांवाप्रमाणेच या देवीचें स्वरूप काळें व भयंकर असे. देवीच्या अष्ट हस्तांत विविध आयुधें असत व गळयांत रुंडमाला असे. पायातळीं एखादा सफेदवर्णी दीनवाणा दैत्य पडलेला असे व देवी जणूं हातांतील खड्गाने त्याचा शिरच्छेद करीत आहे, असें ध्यान त्या मूर्तीचित्रांत दाखविलें असे. छाकट्या लोकांना महाबाहूची कालिकामूर्ति आवडे व पूजनासाठी ते ती विकत घेत. परंतु देवीच्या हातून मारला जाणारा दैत्य आपल्यासारखाच गोऱ्या वर्णाचा असावा, ही गोष्ट मात्र त्यांना आवडेना. ते महाबाहूला नेहमी म्हणत, "तुझी कालिका ज्या दैत्यांचा वध करते ते सारे गौरवर्णीच कसे असतात ? जगांत काळे दैत्य नसतात कां ?" यावर महाबाहू गंभीरपणें उत्तर करी, "माझा नातू शक्तिकर्ण ह्या सर्व मूर्ती तयार करतो. तो मोठा कसबी कारागीर आहे, तसा हुषारहि आहे ! राम, कृष्ण हे आमचे देव सारे श्यामल व घननील आहेत. असुर मात्र एकजात गोरे असतात. देव आमच्या देशांतलेच, तेव्हां ते येथील लोकांसारखे काळेच असावयाचे ! दैत्य मात्र सारे परदेशी ! ते गोरे असतात. सुरासुरांचा लढा हा काळया-गोऱ्यांचा लढा आहे. आमची कालिका-माता या सामान्य नियमाला अपवाद कशी होईल बरे ?"

छाकट्या गिऱ्हाइकांना महाबाहूचें हें स्पष्ट व गंभीर उत्तर रुचत नसे. परंतु करणार काय ? त्याच्या उत्तरांत सत्य भरलें आहे हें ते जाणून असत.

छाकल्यांचे पूर्वज ज्या इराण–तुराणादि बॅक्ट्रिया वगैरे देशांतून आले तेथील लोकांचा वर्ण गोरा व हिंदी लोकांचा त्या तुलनेने काळा, ही गोष्ट त्यांना ऐकून माहीत होती व अनुभवाने पटली होती. पण ते म्हणत, "म्हणून काय झालें ? कधी कधी देवी कालिकेच्या मूर्तीचा वर्ण गोरा करावा व दैत्य काळे दाखवावे ! तो तरी काळयागोऱ्या सुरासुरांचा लढा होईल ना ?"

महाबाहू यावर हसून म्हणे, "वा ! छान ! कालिका मातेची मूर्ति मी गौरवर्णी केली तर माझें जगांत हसें होईल. लोक म्हणतील महाबाहूला म्हातारचळ लागला व त्याला भ्रम झाला ! आज म्हणतां कालिकेला गोरी करा; उद्या म्हणाल तिला वेश्येचा शृंगार साज चढवा. तुम्ही शाक्त केव्हां काय म्हणाल याचा भरवंसा नाही. तुम्ही कालिका मातेला समजतां तरी काय ? वेश्या कां देवी ?"

महाबाहूच्या या उत्तराने खजील झालेली शाक्त मंडळी मुकाट्याने किंमत देऊन देवीची मूर्ति घरीं घेऊन जात असत. कारण कालिकेची मूर्ति फारच सुबक साधलेली असे व देवीचें ध्यान क्रूर परंतु दैवी दिसे. जाणून बुजून जगत्संहारिणीचें तें ध्यानचित्र होतें. घरीं परत जातांना मात्र ते मनाशी रुष्ट होऊन पुटपुटत, "महाबाहुचा नातू शक्तिकर्ण हा उत्तम कारागीर असला तरी त्याला एकदा चांगली समज दिली पाहिजे. सत्याची अवास्तव स्तुती करण्यांत अर्थ काय ? सत्य झालें तरी त्याने राज्यकर्त्यांच्या भावनांना लवमात्र दुखवितां कामा नये. त्या शक्तिकर्णाला एखादे वेळी गाठून त्याचा चांगला खरपूस समाचार घेतला पाहिजे. त्याला असा कडक धडा शिकविला पाहिजे कीं जन्मभर त्याचा विसर त्याला पडतां कामा नये."

५

## श्रीमुखाची शक्ति-

मध्यरात्रीची भीषण वेळ. वद्य पक्षाचा अंधार. गावाच्या सीमेबाहेरील महादेवाचें मंदीर व भोंती जंगल पसरलेलें! क्रूर रानटी पशूंच्या आरोळयाच मधूनमधून त्या स्मशानशांततेचा काय त्या भंग करीत असत! बाकी सर्वत्र निःस्तब्धता होती.

देवळांत केवळ गुरुशिष्यांची जोडी नव्हती. शक्तिकर्ण आपल्या मातेसह देवळांत आला होता. गुरुजींनी त्याच्या मातेला मुद्दाम बोलावलें होतें. शक्तिमतीने गुरुजींच्या चरणावर मस्तक ठेवलें व नंतर हात जोडून

त्यांना विचारलें, "गुरूदेव, या दीन अबलेला आपण कां पाचारण केलें ? आपली काय आज्ञा आहे ?"

गुरूदेवांचा कंठ गहिवरून आला. ते म्हणाले, "राजनंदिनी—"

शक्तिमति तो शब्द ऐकतांच चकित झाली व गोंधळली. क्षण-भराने आपलें चित्त सावरून ती म्हणाली, "गुरुदेवांच्या दैवी दृष्टीला कळणार नाही असें गौप्य जगांत कोणतें आहे ? पण आज निदान बारा वर्षे तरी मी महाबाहू कुंभाराची कन्या म्हणून जगांत मिरवीत आहे आणि माझ्या या मानलेल्या पित्याने माझा व माझ्या पाडसाचा इतक्या स्नेहाने व प्रेमाने सांभाळ केला कीं खरा पिता यापेक्षा अधिक काय करणार ? तेव्हां गुरुदेव, तें जुनें स्वप्न विसरून जाणें इष्ट नाही कां ?"

गुरुदेव धीर गंभीर वाणीने बोलले, "राजनंदिनी, त्या स्वप्नाची उलट उजळणी करून तें फुलाप्रमाणे ताजें टवटवीत ठेवलें पाहिजे. स्वत्वाचा एकदा कायमचा विसर पडला कीं अभ्युदयाची आशाच उरत नाही. मनाला जुन्या दुःखाचा चटका जोंपर्यंत पोळत असतो तोंपर्यंत मानवी मनाची महत्वाकांक्षा फुललेल्या निखाऱ्याप्रमाणे तेवत असतें. पूर्वविस्मृती वज्रलेप झाली कीं महत्वाकांक्षेचा विझून कोळसा होतो. तुझा कुमार शक्तिकर्ण हा तुझ्या कुळाचा उद्धार करील. माझें भविष्य कदापि खोटें ठरणार नाहीं. हा सम्राट चक्रवर्ती होईल किंबहुना त्यापेक्षाहि हा मोठा होईल. युधिष्ठिर धर्मराजाप्रमाणे याची कीर्ति दिगंतांत पसरेल व अनंत अशा कालावरहि ती मात करील. सामुद्रिक विद्या मी जाणत असल्यामुळे शक्तिकर्णाच्या भावि आयुष्याचा चित्रपट माझ्या नजरेसमोर स्पष्ट पसरलेला दिसत आहे."

शक्तिमतीचें अंतःकरण आनंदानें भरून आलें. ती सद्गदित होऊन म्हणाली, "देव न्यायाचा पाठीराखा आहे तर म्हणावयाचा ! माझे कान आपलें गोड भाषण श्रवण करून तृप्त झाले. ईश्वर आपल्या मुखांत अमृत

घालो. आपण माझ्या पोरक्या मुलाला पदरांत घेतलें व त्याला अनेक विद्या शिकविल्या व त्याच्या कुलवंत परंतु अभागिनी मातेवर अनंत उपकारांचे ओझें घातलें. मी आपल्या कातड्याच्या वहाणा करून गुरुदेवांच्या चरणीं अर्पण केल्या तरी आपलें ऋण फिटणार नाहीं, हें मी पूर्णपणें जाणतें. शक्ती नेहमी आपल्या वात्सल्यप्रेमाचें मजजवळ वर्णन करत असतो. तो दरिद्री कुंभार होता, परंतु आपण विद्यामृताचें व पराक्रमाचें सिंचन करून त्याला थोर ब्रम्ह व क्षत्रिय बनविलें. तो जन्मत: शूद्र होता परंतु आपण त्याला द्विज केले. आपले हे थोर उपकार ही दीन कुलकलंकिनी कपाळकरंटी–" देवीच्या नेत्रांतून अश्रुधारा सारख्या वाहूं लागल्या.

गुरुदेव अत्यंत शांत व प्रेमळ शब्दांनी तिचें शांतवन करूं लागले. ते म्हणाले, "राजनंदिनी, माझ्या दृष्टीला तूं सम्राट शक्तिकर्णाची माता दिसतेस! तूं अत्यंत थोर अशी कुलभूषणी भाग्यवती आहेस. तूं जगन्माता आहेस. कारण शक्तिकर्णाचे कोट्यावधी प्रजाजन तुझ्याकडे माता म्हणूनच पाहतील व तुझ्या चरणांना वंदन करतील. तुझें थोर चारित्र्य–"

गुरुदेवांचें वाक्य अर्धवटच राहिलें. शक्तिमति रडत रडत म्हणाली, "गुरुदेव, आपण काय बोलला? आपला हेतु नव्हता तसा–नसेल. परंतु माझ्या चारित्र्याच्या उल्लेखाने माझ्या मनाला सहस्त्रश: इंगळ्या डसल्याच्या वेदना झाल्या! गुरुदेव, मी कुमारी खरी परंतु मी माता झाले. माझा विवाह झाला नाही. मी कोणाचीहि पतिव्रता पत्नी नसतांना मातृपद माझ्या दैवीं आलें."

"राजनंदिनी, म्हणूनच मी तुला जगन्माता म्हणून गौरविलें. नारी जन्माची खरी सफलता मातृत्वांत आहे. पत्नी, कन्या, भगिनी हीं नारीचीं मानवी रूपें होत. माता हें मात्र तिचें दैवी स्वरूप होय. जगाचें मातृत्व प्राप्त झालेली नारी ब्रम्हदेवाप्रमाणे चतुर्मुखी देवता मला भासते व म्हणून तिला

केलेला नमस्कार ईश्वराच्या चरणीं रूजू होतो असा माझा दृढ विश्वास आहे. जगन्माते, मी तुला नम्र भावाने वंदन करतो." एवढें बोलून गुरुजींनी खरोखरच शक्तिमतीला सादर प्रणाम केला!

शक्तिमति अधिकच व्यथित होऊन म्हणाली, "गुरुदेव! तुम्ही संतश्रेष्ठ आहात, परंतु मला लाजवूं नका. माझें समग्र पूर्वचरित्र तुमच्या दैवी दृष्टीला ज्ञात नसेल असें मी कसें म्हणूं?"

"राजमाते, देवी, तूं तें आपल्या मुखाने आपल्या पुत्राला निवेदन करावें म्हणून मी तुला मुद्दाम आज येथे बोलावणें धाडलें. माझा निरोप कुमाराने तुला कळविला. मी सांगण्यापेक्षा तूंच तें कुमाराला सांगितलें तर त्याचा प्रभाव त्याच्या मनावर अधिक पडेल व त्याच्या महत्त्वाकांक्षा बहरून येतील व त्याच्या पराक्रमाची ज्योति तेजस्वी होऊन जगांत झळकेल. माते, तें मोकळेपणाने कथन कर व तुम्हा मातापुत्रामध्यें असलेला गोप्याचा पडदा फाडून टाक, म्हणजे देवता-भक्ताचें खरें हृदयमीलन होईल." गुरुजींनी शक्तिमतीला असा धीराचा संदेश दिला.

शक्तिमतीने आपल्या पदराच्या टोकाने डोळे पुसले व मन स्थीर केलें. नंतर शांत व मृदुल स्वराने तिने आपली पूर्वकथा सांगितलीः—

"सुप्रसिद्ध नागवंशी राजा श्रीमुख यांची मी सर्वांत धाकटी कन्या. माझी आई परमश्रेष्ठ आंध्र घराण्यांतील राजकन्या होती. अवंतीचा सम्राट विक्रमादित्य याची कन्या श्री ही माझी माता होती. ती विजेप्रमाणे सौंदर्याने तळपत असे व तलवारीप्रमाणे मोठी मानी व तीक्ष्ण स्वभावाची होती. माझा पिता नाममात्र आंध्र महाराजांचा सेवक होता. परंतु तो खरोखर मध्य व पश्चिम दक्षिणापथाचा स्वतंत्र राजा होता. पूर्व दक्षिणापथावर आंध्रांची प्रत्यक्ष सत्ता होती. कृष्णेच्या मुखाजवळ असलेली धनकटक नगरी ही आंध्रांची दक्षिणेंतील राजधानी होती व अवंती ही

त्यांच्या उत्तरेकडील साम्राज्याची राजधानी गणली जात असे. माझा पिता जरी वरपांगी स्वतःला आंध्रभृत्य म्हणवून घेई तरी तो आपल्याला मनांतून स्वतंत्र राजाच समजे. प्रतिष्ठान नगरी ही माझ्या पित्याची स्वतंत्र राजधानी होती. माझ्या पित्याच्या पराक्रमामुळेच अवंतीच्या आंध्र सम्राटांना मगधांतील कण्वांच्या साम्राज्याचा नाश करतां आला व भारतवर्षाचे ते सम्राट झाले. माझ्या पित्याच्या पराक्रमाने संतुष्ट होऊन विक्रमादित्य महाराजांनी आपली कन्या श्रीमुखाला दिली व त्याला राजा ही पदवी गौरवाने अर्पण करून दक्षिणापथावर स्वतंत्रपणें राज्य करण्यास पाठविलें. परंतु राजा श्रीमुखाचें हें भाग्य सरासरी चाळीस वर्षें टिकलें. भारतावर गोऱ्या शकांच्या टोळधाडी एका मागून एक लोटूं लागल्या. आंध्र राजांचा पराभव झाला. कण्वांचें साम्राज्य मोडलें होतेंच. त्यामुळे उत्तरेस कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नव्हता. एकीची बेकी झाली होती. अखेरीस उत्तरेस आंध्रांची वाताहत झाली. त्यांत यवनांनी जोर केला, यवन व शक यांच्या कचाटींत माझें आजोळ सापडलें. ती झळ पुढे माझ्या वृद्ध पित्यालाहि दक्षिणेंत भोगावी लागली. साठीच्या घरांत असून देखील त्याने भीम पराक्रम केला पण त्याचें चीज झालें नाही. राजा श्रीमुखाचें रणांगणांत पडल्यामुळे सोनें झालें;धारातीर्थाचा मोक्षलाभ त्यांना झाला. प्रतिष्ठान राजधानी शकांनी जिंकली. राजवाड्यांत उसळलेल्या दंगलींत माझ्या मातेचा अंत झाला. शेवटपर्यंत ती वृद्ध राजलक्ष्मी शत्रूशीं लढत होती व राजवाड्याच्या अब्रूचें संरक्षण करीत होती. त्यावेळीं मी लहान होते. माझें वय चवदा वर्षांचे असेल नसेल. मी देखील हातांत शस्त्र धारण करून आईला शक्य तें सहाय्य करीत होतें. परंतु आईचें तें वीरमरण माझ्या दैवांत लिहिलें नव्हतें. दुर्दैवाने डाव साधला. उंबरठ्यांत सांचलेल्या रक्तांत माझा पाय घसरला व मी खाली पडलें. शकांनी मला कैद केलें. हें परचक्र येण्यापूर्वी माझ्या विवाहाची चर्चा घरांत चालूं झाली होती, परंतु मी लहान असल्यामुळे माझा

विवाह मात्र झाला नव्हता. त्या नीच शकांच्या हातीं ही अभागी राजनंदिनी सापडली. त्या कसाबांच्या हातीं ही गाय लागली. पुढची विटंबना काय सांगू? तो असह्य छळ, तें जबरीचें व्यभिचारी जीवन! तें भयंकर कौमार्य-विडंबन! जवळ जवळ दहा-बारा वर्षें मी त्या नर्कवासांत काढली. तीं मी कशी काढलीं-माझ्या मनाला किती यातना झाल्या, तें ईश्वरच जाणें! कारण मला प्राणनाश करण्याची संधी गवसेना. माझ्यावर सर्वांचा कडक पहारा होता. मला पळून जातां येईना, व जीव जाईना. त्या नर्कवासांतच मी खितपत असतांना बाळ, तुझा जन्म झाला. या करंटीच्या हातीं परीस सापडला. तुझा जन्म हा शुभ शकुन मी मानला. तुझ्या जन्मामुळे माझ्यावरील कडक पहारा सौम्य जाहला. एका काळरात्रीं संधी साधून शकांच्या तावडींतून मी निसटले व पळाले. पण या पतितेला कोण उदार आश्रय देणार? ही राजनंदिनी असली तरी उच्च समाजवर्णीयांच्या दृष्टीने ती नीचाहून नीच ठरली. परंतु देव अगदींच झोपला नव्हता. महाबाहूने मला आश्रय दिला. त्या पित्याच्या छायेंत राहून मी तुला वाढविलें. त्या उदार महात्म्याच्या कृपाछत्राखाली या करंटीच्या अमोल रत्नाचें आजवर रक्षण झालें! बाळ शक्ती! या अभागिनी कुलकलंकिनीचा तुला विलक्षण तिटकारा आला असेल. ही दारुण अधःपाताची कथा ऐकून बाळ, तूं माझा त्याग केलास तरी चालेल. तूं मला दूर लोटलेस तरी चालेल. फार काय तूं माझी ओळख या पुढे ठेवली नाहीस तरी चालेल. कारण माझें जीवन आता समाप्त झालें. गुरुदेव, आपल्या स्वतःच्या पुत्राजवळ आपल्या हातून घडलेल्या पापाची कबुली देण्याचा हा लाजीरवाणा प्रसंग आज प्राप्त झाला. माझ्या हृदयाला आग लागली. त्या झळींत मी लवकरच होरपळून मरणार! पण बाळ, तूं या अभागिनीला विसरून जा. त्यांतच तुझें कल्याण आहे. माझा कलंक तुला लागावयास नको. तूं सुखांत रहा. तूं समाधानांत-आनंदांत

रहा. तुला वैभव लाभो. तुझें भाग्य उदयाला येवो! हाच या पतितेचा तुला मनःपूर्वक आशीर्वाद्! ”

ही हकीगत देवीने अशी सरळ थोडीच सांगितली? अडखळत, अळखळत, रडत, निःश्वास सोडत, हुंदके देत देत ही हकीगत सांगत असतांना शक्तिमतीला झालेलें अपार दुःख शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. विजेच्या कल्लोळांत सापडलेल्या वेलीप्रमाणे ती लज्जेने काळवंडली व भयाभीत झाली. गुरुजी व शक्तिकर्ण यांच्याहि नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. केवढें भयंकर जन्मरहस्य होतें तें!

मेघ काळे असले तरी ते पाझरले म्हणजे धरणी शांत होते व ताप लुप्त होतो.

शक्तीने मातेला वंदन केलें व म्हटलें, “ देवी! या बालकावर तुझ्या कृपेची पाखर अशीच पुढेहि असूं दे! तुझ्या आशीर्वादाच्या बळावर मी शकांचा पार नायनाट करीन व नाग आणि आंध्र या दोन्ही कुलांचा कलंक साफ धुवून काढीन. मी तुझा कर्णपुत्र आहे याचा मला अभिमानच वाटेल. ” गुरुदेव सद्गदित स्वराने म्हणाले, “ माते! तूं गंगेप्रमाणे पवित्र आहेस! तूंच लोकांना पुनित करशील. तुझ्या कर्णपुत्राचें नांव यावश्चंद्रदिवाकरौ जगांत दुमदुमेल! ”

# ६

## सतीची समाधी–

सूर्योदय होऊन लोक आपल्या नित्य नैमित्तिक कामास लागतात न लागतात तोंच वाकणच्या खेड्यांत एकच धांदल उडाली. शक शिपायांची टोळी त्या गावांत आली होती. सर्वच घोडेस्वार होते. त्यांच्या हातांत कुऱ्हाडी व कंबरेस छोट्या जंबियेवजा तलवारी लटकल्या होत्या. त्यांचे पोषाख काळे होते. त्यांचे घोडे मात्र लालवर्णी होते. लाल घोड्यावर आरूढ झालेले काळया पोषाखांतील ते गोरे हत्यारबंद स्वार पाहून कोणाहि ग्रामस्थाच्या उरांत सहज धडकी भरली असती. त्यांच्या डोक्यावर पटके

बांधले होते व त्या पटक्यांचे शेपटे त्यांच्या पाठीवर डौलाने फडकत होते. त्यांच्या पुढाऱ्याचा पटका जरतारी दिसत होता. त्या जरीच्या तुऱ्यामुळे त्या राणा कोंबड्याकडे प्रत्येकाचें सहज लक्ष वेधत होतें.

कुंभारवाड्याकडे त्यांचा मोर्चा वळला. खेड्यांतील बायका घरांत दडून बसल्या. कारण शकांचें प्रेमळ स्त्रीदाक्षिण्य सर्वांच्या परिचयाचें झालें होतें. पण त्या शिपायांची प्रेमळ कामुकता त्या ग्रामीण स्त्रीजीवनांत सहज पचण्यासारखी व रुचण्यासारखी नव्हती. लहान लहान मुलें मात्र आईच्या पदराच्या आडोशाला जाऊन लपून बसलीं.

मोठीं मुलें व माणसें मात्र झोपड्या बाहेर पडलीं व त्या टोळधाडी-कडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहूं लागलीं. या अवचित व आकस्मिक राजकृपेचें कारण त्यांना कळलें नव्हतें. त्यामुळे घोडेस्वारांच्या मागोमाग ग्रामस्थांचे पायदळ कुंभारवाड्याकडे वळलें.

शिपायांना महाबाहू कुंभाराशी काम होतें. कुंभारवाड्यांत त्याचेंच घर जरा सुरेख व मोठें होतें. कारण त्याच्या मालाचा खप चांगला होत असल्यामुळे तो खाऊन पिऊन चार पैसे बाळगून होता.

महाबाहू घराबाहेर आला. त्याने त्या सरकारी अधिकाऱ्याला लवून मुजरा केला. अधिकारी पडला मोठा मनुष्य! त्याने त्या भिकारड्याच्या मुजऱ्याचा अर्थातच स्वीकार केला नाही. जेत्यांच्या दृष्टीने जितांना कुतरड्यांची योग्यता लाभते!

अधिकारी मोठ्याने गर्जना करून म्हणाला, "ए बद्माश!"

महाबाहूने नम्रतेने उत्तर दिलें, "माझें नांव बद्माश नाही, महाबाहू आहे."

"चूप बैस पाजी माणसा! तूं राजद्रोही कुत्रा आहेस. तूं प्रजाजनांत राज्यकर्त्यांविषयीं द्वेष पसरवतोस! या घोर राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल तुला

कडक शिक्षा करण्याचें सरकारने ठरविलें आहे. तुझ्यासारख्या हलकटाला नेस्तनाबूत केला म्हणजे बाकीच्या लोकांना वचक बसेल व पुनः असा राजद्रोहाचा गुन्हा कोणी करणार नाही."

"पण महाराज, मजवर एवढा गहजब कां म्हणून? मी एक खेडवळ गरीब कुंभार आहे. मी शिपाई नाही कीं कारकून नाही. राजद्रोह कसा कच्चा कां शिजवून तयार करतात, याचें देखील मला ज्ञान नाही."

"करून सवरून वर हें खोटें ढोंग चांगलें करतां येतें तुला! ही कालिकेची मूर्ति कोणी घडविली?" समोरच्या पडवींत मांडलेल्या चित्रांपैकी एका मोठ्या कालिकेच्या मूर्तीकडे बोट दाखवून अधिकाऱ्याने रवाबांत प्रश्न विचारला!

"आणि सुंदर सुंदर व गोड मुलींच्या बाहुल्या करण्याऐवजीं तूं लष्करी शिपायांचीं चित्रें तयार करतोस कीं नाही, बोल! नकार देण्याची तुझी छाती होणार नाही. कारण त्या कालिकेच्या मूर्तीभोंती पसरलेल्या हजारो शिपायांच्या रांगा तुझ्या पापाची साक्ष देतील." दुय्यम अधिकारी गर्जला.

घराच्या पडवींत शिपायांची, घोडेस्वारांची व द्वंद्वयुद्धाची अनेक चित्रें मांडलीं होतीं. त्यांच्याकडे बोट दाखवून अधिकाऱ्याने महाबाहूस दरडावलें.

"महाराज, हा माझा पोटाचा धंदा आहे. अशीं हजारो चित्रें आजपर्यंत मी प्रतिष्ठानच्या गुजरींत मांडून विकलीं आहेत?"

"बरें झालें! तूं आपल्या तोंडाने आपल्या अपराधाची कबुली दिली. अशीं चित्रें तयार करणें हा एक गुन्हा व प्रजाजनांना तीं विकणें हा तर सहस्रपट मोठा अपराध! या दुहेरी राजद्रोहाबद्दल तुला प्रायश्चित्त देणें सरकारला भाग आहे."

"काय चित्रें तयार करणें व विकणें हा या नव्या राजवटींत गुन्हा ठरतो?" महाबाहूने आश्चर्यचकित स्वरांत प्रश्न केला.

" रतिविलासाच्या चौऱ्याशी आसनांचीं तूं चित्रें काढलीं असतीं तर सरकारने तुझा गौरव केला असता. कलापूर्ण मद्यचषक तूं बनविले असतेस तर सरकारने ते खरेदी करून तुझ्या धंद्याला उदार आधार दिला असता. पण दुष्टा, तूं कलेचें विडंबन केलें! धंद्याच्या नांवाखाली तूं शिपायांचीं आवेशपूर्ण लढाऊ चित्रें तयार करून हिंसेला उत्तेजन दिलें व लोकांत लष्करी वृत्तीची जागृती करण्याचा प्रयत्न केला. तुम्ही लोकांनी सुखासमाधानांत दिवस काढावे व हत्यारांचे जोखमी खेळ खेळूं नये ही सरकारची प्रामाणिक इच्छा व तसा सरकारचा सारखा प्रयत्न चालूं आहे. पण तूं आपल्या वर्तनाने सरकारी धोरणाला काळें फासलें. आणि या कालिकेच्या मूर्ती घडवून तर तूं राजद्रोहाचा कळस केला! गोऱ्या लोकांना काय काळ्या बायका ठार मारूं शकतात?"

" सरकार, आपण अर्थाचा अनर्थ करतां? तो गोरा शिपाई नसून दैत्य आहे आणि त्याला ठार मारणारी काळी बाई नसून प्रत्यक्ष देवी कालिका माता आहे." महाबाहूने नम्रतेने उत्तर दिलें.

" हे प्रतिकात्मक लपंडाव मी पूर्णपणें ओळखून आहे. अशाने मी फसणार नाही." महाबाहूच्या आत्म समर्थनाची अशी थोडक्यांत विल्हेवाट लावून त्या अधिकाऱ्याने आपल्या शिपायांना त्या पडवींतील सर्व मूर्ती फोडून टाकण्याची आज्ञा दिली.

इतक्यांत भोंती गोळा झालेल्या ग्रामगर्दींतून एक मोठा पोरगा पुढे झाला व अधिकाऱ्याला जमिनीपर्यंत झुकून मुजरा करून म्हणाला, " सरकार, हीं सर्व चित्रें महाबाहूचा नातू शक्तिकर्ण याने तयार केलीं आहेत. तो मोठा कसबी कारागीर आहे. तोच खरा गुन्हेगार आहे." हा चोंबडा शक्तीचा सवंगडी पार्थ होता.

अधिकारी डोळे मिचकावून व किंचित हसून म्हणाला, " शाबास! तूं मोठा राजनिष्ठ प्रजाजन दिसतोस! तुझें नांव काय?"

"सरकार, या दासाला पार्थ म्हणतात. सरकारने जरूर त्या शक्तीला शासन करावें. तो फार मग्रूर झाला आहे."

"त्याला आम्ही कडक शिक्षा करूं व तुला या राजनिष्ठेबद्दल आमच्या सेवेची दीक्षा देऊं. तूं आमच्या राजवटींत मोठ्या मानमरातबाला चढशील. तूं मोठा अधिकारी होशील." अधिकारी उत्तरला.

पार्थाची मुद्रा आनंदाने प्रफुल्ल झाली पण महाबाहूच्या नेत्रांतून अग्नीच्या ठिणग्या बाहेर पडल्या.

राजाधिकाऱ्याने गर्जना केली, "पकडा या म्हातारड्याच्या नातवाला!"

कांहीं शिपाई घोड्यावरून उतरून घरांत घुसले. त्यांनी त्या चित्रांची मोडतोड आरंभली. परंतु कालिकेची भव्य मूर्ति भंग करण्याची कोणालाहि हिंमत होईना. कारण शक शिपाई तिची पूजा करीत असत. ती त्यांच्या आराध्यदेवतेची मूर्ति होती. तेव्हां पार्थाने तें देवता-विडंबनाचें कार्य करून अधिकाऱ्यांकडून वाहवा मिळविली!

महाबाहूची धडपड चालूं होती. पण त्याच्या मुसक्या बांधण्यांत आल्या. त्याचे हात त्याच्या पाठीमागे वळवून बांधण्यांत आले. तो म्हातारा मात्र भ्यायला नाही कीं कापला नाही. एका शक शिपायाने त्याला ठार मारण्यासाठी आपली कुऱ्हाड वर उंच केली आणि जोराने त्याच्या मस्तकावर हाणली. त्याला वाटलें कीं एक घाव व दोन तुकडे!

पण त्या क्षणीं एक करुण व कोमल किंकाळी ऐकूं आली. महाबाहू व त्याच्या गळ्याला मिठी मारून बिलगलेली एक सुंदर तरुणी असे दोन अचेतन देह धरणीवर कोसळले! सारे शिपाई तें दृश्य पाहून चकितच झालें!

डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या वेगाने शक्तिमति घरांतून अंगणांत आली व तिने आपल्या पित्यावरून आपला जीव ओवाळून टाकला. महाबाहू आपल्या कन्येसह स्वर्गाला चालता झाला!

हातून अवचित घडलेल्या या स्त्रीहत्येमुळे त्या दुष्ट शिपायाला देखील अतोनात दुःख झालें. करावयास गेलो एक व झालें भलतेंच ! असें त्यास वांटलें असावें.

गावांतील गोळा झालेले सर्व भोतालचे लोक मोठमोठ्याने रडूं लागले. सर्वत्र हाहाकार झाला. त्या क्रूर शक शिपायांच्या डोळयांतहि पाणी थरारलें. ती तरुणी किती नाजुक व सुंदर दिसत होती. मृत्यूला देखील तिचें सौंदर्य नष्ट करतां आलें नाही. तिच्या खांद्याला जबर वार लागला होता. पण तिच्या डोळयांत मात्र हुतात्म्याची तृप्ती दिसत होती.

कांही पळें त्या निस्तब्ध अवस्थेंत लोटल्यानंतर अधिकाऱ्याने हळूच विचारलें, " आमच्या हत्यारांना अचानक बळी पडलेली ही सुंदर कोमल तरुणी कोण बरें ? "

गर्दीतील कोणी तरी म्हटलें, " ही महाबाहूची कन्या ! तिने आपल्या पित्यावर मायेने आपल्या देहाची अखेरची शाल घातली ! केवढी थोर पितृभक्ति ! हाय हाय ! देवी ! "

त्याला पार्थाने मागून पुस्ती जोडली, " पण राजद्रोही शक्तिकर्णाची माताहि हीच ! "

तें ऐकून अधिकाऱ्याने समाधानाचा निःश्वास सोडला ! शक्तिकर्णाला शिक्षा करतां आली नाही तर निदान त्याच्या अपराधांचा दंड त्याच्या मातेवर लादतां आला या कल्पनेने त्याला बरें वाटलें असावें. शक्तिकर्णाचा शोध सुरू झाला पण शक्तिकर्ण कोणाला आढळला नाही. पार्थाची शक्तीचा सूड घेण्याची खटपट फुकट गेली.

महाबाहूचें घर जाळण्यांत आलें. त्या आगींत महाबाहूची म्हातारी पत्नी जळून मेली. तिला आगींतून बाहेर काढण्याचें भान कोणालाच राहिलें

नाही. झालेल्या भयंकर प्रकाराने गांवकऱ्यांना क्षणभर तिचा विसर पडला होता.

एवढा प्रसंग ओढवला तरी ती म्हातारीहि पण घराबाहेर पडली नाही. आग भडकली तरी ती घरांतच देवापुढे स्वस्थ ध्यानस्थ बसून होती. तिची रोजची पूजाअर्चा शांत चित्ताने चालली होती. देवधर्माच्या साक्षीने व अग्निनारायणाच्या कृपेने बसल्या जागींच सतीने समाधी घेतली ! तिची कन्या व तिचा पति तिच्या संगतीनेच कैलासाच्या दर्शनास चालते झाले ! असल्या आत्माहुतीमुळेच सतीला देवता मानतात व तिचें मंदिर उभारतात. भारतांत अशा सती साध्वी आजपर्यंत अनेक होऊन गेल्या. त्यांच्या पुण्याईने भारताचें मुख उज्वल झालें आहे.

२

# प्रकृति-पर्व

(भूत काळ)

# ७

## मौर्यांचें साम्राज्य मोडलें—

मौर्यांच्या पराक्रमी साम्राज्याचा अस्त झाला परंतु गुप्तांच्या वैभवशाली सुवर्णयुगाचा उदय झाला नव्हता. शक, यवन, असूर, पल्लव व कुशान या परकीयांच्या एकामागून एक झालेल्या आक्रमणामुळे भारतवर्षाच्या प्राचीन इतिहासांत जें अंधारयुग दाटलें त्यांत शातवाहनांचा मंद प्रकाश तेवढा तेवतांना दिसतो. मौर्य व गुप्त या घराण्यांतील सम्राटसूर्यांच्या मानाने शातवाहन हे सौम्य चंद्र भासतात. ते आंध्र असतील किंवा आंध्रभृत्य असतील. परंतु हिंदु कालगणनेंत विक्रमादित्य व सातवाहन या आंध्र कुलांतील किंवा आंध्रसंबंधी नृपांना सन्मानस्थान प्राप्त झालें आहे. हें आश्चर्योत्पादक रहस्य सुसंगत रीत्या उलगडण्याचा प्रयत्न या कथेंत केला

आहे. विक्रमादित्याच्या नांवांत तर इतकी जादू भरली होती कीं पुढें तीन शतकानंतर गुप्त वंशांतील सम्राटांनी व इतर पराक्रमी राजांनीहि मोठ्या आवडीने तें नांव धारण केलें. कालगणनाधीश विक्रमादित्य किंवा सातवाहन हे कधी झालेच नाहींत किंवा पुढे एक दोन शतकांनी झालेल्या कोणीतरी नृपांनी आपल्या नांवाचे शक कोणत्या तरी एका बिनबुडाच्या प्राचीन संवत्सरापासून चालूं केले अशा हास्यास्पद कल्पना कोणी कोणी मांडल्या आहेत. तर इतरांच्या कल्पना वाऱ्याप्रमाणे मोकाट सुटून स्वैराचारी परदेशी शकांनी चालू केलेला शक हिंदुधर्मी स्वाभिमान शून्यांनी तसाच पुढे आळसाने चालूं ठेवला, असें बरळण्यापर्यंत त्यांची पाळी आली. विक्रमादित्य व शातवाहन हे पराक्रमी व वैभवशाली हिंदु सम्राट प्रत्यक्ष होऊन गेले व त्यांनी आपल्या हयातींत हिंदु परंपरेप्रमाणे दिग्विजयानंतर आपली कालगणना चालूं केली. त्यांनी परकीयांचा मोड केला व हिंदु धर्मावरील संकट आणि हिंदु संस्कृती वरील आक्रमण दूर केलें. म्हणून हिंदु कालगणनेंत त्यांना गौरवाचें स्थान जनताजनार्दनाच्या कृपेने प्राप्त झाले. त्या थोर व्यक्तींचे पराक्रम प्रत्यक्ष सृष्टींत गाजले नसते तर केवळ कल्पनेवर भीस्त ठेवून पांडवांतील धर्मराज युधिष्ठिराला हिंदु कालगणनेतून पदच्यूत करण्याचें पाप कोणता हाडाचा हिंदु प्राचीन काळांत करतां ? तो तर धर्मनिष्ठेचा व श्रद्धेचा काळ होता. हे थोर सम्राट जगांत झाले नसतांना त्यांच्या काल्पनिक नांवावर ख्रिस्तपूर्व ५७ व ख्रिस्तोत्तर ७८ अशा अनमानधपक्याने ठरविलेल्या वर्षापासून हिंदूंनी धर्मराज युधिष्ठिराला बळेच खो देऊन नवी कालगणना केवळ जिवाची करमणूक म्हणून चालूं केली, असें गरळ ओकणारे इतिहासतज्ञ कोठे कोठे आढळतात. नाचतां येईना तर अंगण वाकडें, असें म्हणण्याचा हा वेढगळ प्रकार आहे. ह्या थोर पूज्य हिंदु सम्राटांच्या जीवनचरित्रावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न या कथेंत केला आहे. बृहत्कथा, पुराणें, शिलालेख व परंपरेने चालत आलेला श्रुत इतिहास यांचा समन्वय करून ही सुसंगत चरित्रात्मक इतिहास-कथा

लिहिली आहे. ही ऐतिहासिक कथा नसून हें केवळ चरित्र आहे असें कोणी म्हटलें तरी चालेल.

मौर्यांचें पराक्रमी साम्राज्य मोडलें आणि त्या साम्राज्याची शकलें झालीं. प्रत्येक प्रांतावरील सुभेदार स्वतःला स्वतंत्र समजूं लागला. आर्यावर्तांत लहान लहान नवीं राज्यें उदयास आलीं. सुभेदाराने स्वतःस राजा म्हणवून घेतलें म्हणून काय त्याचें वैभव वाढणार? उलट मौर्य साम्राज्याचा सुभेदार या नांवामागे प्रचंड सत्ता लपली होती. सुभेदार स्वतः सामान्य सत्ताधीश असला तरी मौर्य सम्राटाची सत्ता त्याच्या पाठीशीं सदैव हात जोडून सज्ज असे. परंतु साम्राज्य मोडून सुभेदार राजा झाला तेव्हां त्याच्या पाठीशीं कोणती सत्ता राहणार? नांव सोनूबाई पण हातीं कथलाचा वाळा!

कोणतेंहि साम्राज्य मोडकळीस आलें म्हणजे याच इतिहासाची पुनरावृत्ति होत असते. छोट्या छोट्या प्रांतांचे सुभेदार स्वतंत्र होतात व स्वतःस राजे म्हणवितात. परंतु त्यांचें वैभव वेताचें व त्यांची सत्ता पोकळ असते. मोडक्या जहागीरदाराप्रमाणे या नामधारी राजांचें मोठेपण दिखाऊ बडेजावांतच साठवलें असावयाचें.

आणि या नामधारी राजेलोकांत मग मत्सराचा धिंगाणा सुरू व्हावयाचा; आपापसांत भांडणें क्षुल्लक कारणावरून व्हावयाची; तूं मोठा कीं मी मोठा असा वाद निघावयाचा; वास्तविक दोघेहि भिकारडे असावयाचे! स्वतःच्या पराक्रमाने आपली सत्ता वाढवून जगाला दिपविण्याऐवजी दुसऱ्याचा पाय मोडून त्या तुलनेने आपण मोठे दिसण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावयाचा; वनांतील मोठमोठीं झाडें खच्ची करून टाकून मग तेथील एरंडाने त्या निरस्तपादपे देशे महावृक्ष म्हणून मिरवावयाचे! शौर्य, धैर्य, त्याग, पराक्रम या ऐवजीं स्वार्थ, मत्सर, द्वेष व दंभ यांनी माणसाची किंमत जगांत ठरावयाची!

आणि शेजाऱ्याचा पाडाव सरळ मार्गाने करतां आला नाही तर परदेशी शत्रूला निमंत्रण देऊन त्याला घरांत घ्यावयाचे व त्या परक्याच्या

जिवावर उड्या मारून आपल्याच भाऊबंदांचे गळे कापावयाचे! परधर्मी व परदेशी राजाची मैत्री जोडून स्वधर्मी देश बांधवांचे शत्रुत्व करावयाचे. स्वार्थापायीं आपले देशबंधु पायाखालीं तुडवावयाचे व परकीयांचे राज्य देशांत होऊं द्यावयाचे. आपण त्यांचें मांडलिकत्व पत्करावयाचे आणि कसाबसा आपला जीव वाचवावयाचा व आपलें राज्य टिकवावयाचें! त्या मांडलिकत्वाला मात्र वरपांगी मैत्रीचा मुलामा चढवावयाचा! जणूं कोल्हा सिंहाचा मांडलिक वा नम्र सेवक वा दास नव्हे; जिवलग मित्रच तो!

आणि ही विपरीत मैत्री किती दिवस टिकावयाची! सिंहाच्या मनास येईल तोंपर्यंत! कोल्ह्याच्या गुलामी मताला किंमत कोण देणार? सिंहानें 'बैल गाभण' म्हटलें तर तो 'दहा शेर दूध देईल' म्हणून कोल्ह्याने मान तुकवावयाची! सिंहाने त्याला लाथ मारली तर त्याने माझ्या पाठीवर महाराजांनी आज प्रेमाने थाप मारली, अशी प्रौढी लोकांत मिरवावयाची व बळेंच तोंडावर हसें आणावयाचें! साय त्याला द्यावयाची व आपण ताक प्यावयाचे! त्याला भात खाऊं घालावयाचा व आपण पेजेवर संतुष्ट रहावयाचे! जोंपर्यंत कोल्हा उष्ट्या काकडीला राजी तोंपर्यंतच ही मैत्री टिकावयाची. जरा त्या मांडलिकाने स्वाभिमान दाखविला कीं मैत्रीचा सारा ग्रंथ आटोपलाच. राज्यच काय पण मग त्याचा जीवहि जावयाचा! वाघ व शेळी एका भांड्यांतून पाणी पितात खरे, पण त्या दिखाऊ मैत्रीच्या प्रदर्शनार्थ शेळीचें पसाभर रक्त प्रत्यहीं आटत असतें. शेळी अखेर जिवानिशी जाते आणि वाघ 'ती वात्तड होती' असें मिटक्या मारीत मारीत जगाला सांगत सुटतो.

मगधांतील मौर्यांचें साम्राज्य मोडून शुंग, कण्व वगैरे अनेक शाब्दिक सार्वभौम राजवंश तेथे अस्तित्वांत आले. पण एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायांत नाहीं अशी बेबंदशाही तेथे खरोखर निर्माण झाली. पल्लव, शक व यवन या परदेशी लोकांना प्रेमाने निमंत्रण करण्यांत आलें. त्यांच्या टोळधाडी हिंदुस्थान देशावर येऊं लागल्या. पाहुणेच ते! हिंदुस्थानांतील लहानलहान

राजे त्या पाहुण्यांची परोपरीने बरदास्त ठेवूं लागले व त्यांच्या करवी आपल्या देशबांधवांचा निःपात करूं लागले. लहानसहान कारणांवरून स्वदेशबांधवांशीं वैर धरण्यांत सर्वांना पुरुषार्थ वाटूं लागला. मौर्य भारताचे खरेखुरे सम्राट होते. पण त्यांच्या मागून मगधाच्या सिंहासनावर आरूढ झालेल्या शुंग व कण्ववंशी राजपुरुषांची सत्ता मगधांत देखील फारशी मानली जात नसे, मग भारतवर्षाच्या इतर भागांची कथा काय सांगावयाची ? ते नामधारी सार्वभौम होते व म्हणूनच परकीयांच्या एकामागून एक टोळधाडी या देशावर लोटूं लागल्या !

या परदेशी लोकांत शक अत्यंत बलिष्ठ होते. अंगाने धष्टपुष्ट, सहा फूट उंचीचे, रंगानें लालबुंद, गोरेपान, मांसभक्षक व क्रूर वृत्तीचे ते आडदांड लोक होते. यवन व पल्हव गोरे होते परंतु ते क्रूर नव्हते. यवन कलाप्रेमी होते व पल्हव गानप्रिय होते. यवन युवान ( ग्रीस ) देशांतून आले व पल्हव इराणांतून आले. यवन व पल्हव परदेशी असले तरी सुधारलेले व सुसंस्कृत होते. ते पराक्रमी असले तरी क्रूरकर्मे नव्हते. भारतीय संस्कृतीबद्दल त्यांना आदर वाटे.

चंद्रगुप्त मौर्याने नंदवंशाचा उच्छेद करून गुरुवर्य चाणक्याच्या साह्याने आपलें सिंहासन दृढ केलें व सेल्यूकस निकेतराच्या अधिपत्याखालीं लढणाऱ्या असंख्य यवनांचा पराभव केला. आलिक सुंदराने पुरु राजाचा पराभव केल्यापासून यवन हिंदुस्थानांत आजिंक्य समजले जात असत. हिंदी लोकांना यवनांची दहशत बसली होती. यवनांबद्दल हिंदी लोकांना एक प्रकारचा आदर वाटूं लागला होता. यवनांची संस्कृति उत्तम व हिंदी संस्कृति त्या तुलनेने कनिष्ट अशी भावना देशांत सर्वत्र पसरूं पाहत होती. हिंदी राष्ट्राच्या उत्कर्षाला पायबंद घालूं पाहणारी ही भावना चंद्रगुप्ताच्या विक्रमाने नष्ट झाली. सेल्यूकसाच्या यवन सेनेचा चंद्रगुप्ताने धुवा उडविला व हिंदी लोकांतील क्षणभर लुप्त झालेला स्वाभिमान पुनश्च

प्रज्वलित केला. यवन गोरे, कलाप्रिय, बलिष्ठ व सुसंस्कृत असले तरी ते अजिंक्य नाहीत अशी लोकांची खात्री पटली. संघटनात्मक प्रयत्न केला तर त्यांचा पराभव हिंदी लोकांना करतां येईल असा आत्मविश्वास लोकांत उत्पन्न झाला. यवनांच्या अंगभूत श्रेष्ठतेबद्दलचा भ्रम पार उतरला. हिंदी लोकांच्या डोळ्यावर यवनांच्या पराक्रमाची जी झापड आली होती ती चंद्रगुप्ताच्या अपूर्व विजयाने नष्ट झाली. तेव्हांपासून यवनहि मनांत चरकले व हिंदुस्थानाच्या उंबरठ्यांतच ते थबकले. आलिकसुंदराच्या वेळेपासून त्यांना चढलेला पराक्रमाचा उन्माद उतरला व त्यांची हावरी दृष्टि या देशाकडे वळेना! यवनाप्रमाणेच पल्लवांचीहि चंद्रगुप्ताने खोडकी मोडली. सेल्यूकसाचा पराभव केल्यानंतर त्याची कन्या हेलन चंद्रगुप्ताची राणी झाली. तहनामा करतांना चंद्रगुप्ताने ती अट सेल्युकसावर प्रथमच लादली होती. त्यामुळे पुढें दोनतीनशे वर्षें हिंदुस्थान देशावर परचक्र आलें नाहीं. मौर्यांचा भाग्यरवि आकाशांत तळपत होता तोंपर्यंत हिंदुस्थानाकडे वाकडा डोळा करून कोण पाहणार? हिंदुस्थानावर स्वारी करणें म्हणजे आपल्या आईचें, पत्नीचें व बहिणीचें कुंकू स्वतःच्या हातांनी पुसून टाकणें, ही गोष्ट स्वानुभवाने यवनांना व पल्लवांना पटली होती.

परंतु पराक्रमी मौर्य साम्राज्य मोडलें व बुद्धिबळांतील अनेक राजे या देशांत नांदूं लागले. त्यांच्यांत आत्मघातकी यादवी माजली आणि हिंदी लोकांच्या आमंत्रणावरून शक, यवन व पल्लव यांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या. यवन व पल्लव यांच्यापेक्षा शकांच्या स्वाऱ्या देशाला अधिक जाचक झाल्या! कारण शक दिसावयास गोरेगोमटे असले तरी रानटी होते. ते शूर असले तरी जंगली पशू होते. माणसांची संस्कृति व सभ्यता काय गोऱ्या रंगावर अवलंबून असते? ती जन्मजातच असते. केवळ वर्ण, रंग, देश व धर्म यांच्यावर मानवी संस्कृति अवलंबून राहत नाही!

## ८

# आपला महाराष्ट्र देश—

पूर्वी हिंदुस्थान व दक्षिण हे दोन स्वतंत्र देश समजले जात असत. विंध्याद्रीपासून तो हिमालयापर्यंत हिंदुस्थान देशाचें सुपीक मैदान पसरलें होतें आणि आर्य तेथे नांदत असत. हिंदुस्थानांतून दक्षिणेंत सहजासहजीं कोणाला उतरतां येत नसे. विंध्याद्रीची प्रचंड तटबंदी उल्लंघन करावी, नर्मदेचा खंदक पार करावा मग सातपुड्याचा विस्तीर्ण व चक्रव्यूहात्मक पहाड ओलांडावा आणि सरतेशेवटीं तापी नदीचा खंदक उतरून पार व्हावें तेव्हां कोठे दक्षिण देश लागे. विंध्याद्री व सातपुडा हे पूर्वपश्चिम पसरलेले नैसर्गिक भव्य तट आणि नर्मदा व तापी या पूर्वपश्चिम वाहिनी घनत्तर नद्या, यांच्यायोगें दक्षिण देशाचें परचक्रापासून आपोआप संरक्षण होई. विंध्याद्री,

सातपुडा या पर्वताच्या रांगांनीं परिवेष्टित अशा नर्मदा नदीच्या खोऱ्यांतील प्रदेशांत विलक्षण दाट जंगल वाढलें असल्यामुळे सूर्यकिरणांना देखील तेथून प्रवास करतांना सहसा मार्ग सापडत नसे, मग मानवी प्राण्यांची कथा काय? उत्तरेंतून येणारे अपरिचित आर्य तर या चक्रव्यूहांत अडकून पडत असत व कोणी ओळखीचा चोर भेटल्याशिवाय त्यांची तेथून जिवानिशीं सुटका होत नसे. त्यामुळे आर्य पराक्रमी व धाडशी असले तरी दक्षिणेंत जाणें त्यांना दुरापास्तच होई.

दक्षिणेंत द्रवीड व नाग लोक राहत असत. हे काळेसावळे व ठेंगणे-ठुसके असत. आर्य धाडशी असले तर यांच्यात चिकाटी होती; आर्य बलिष्ट तर हे कंटक; आर्य चंचल तर हे चिवट; आर्य लढाऊ तर हे सहनशील होते; आर्य भटके तर हे घरादारावर प्रेम करणारे; आर्य सुधारक तर हे परंपरेचे कट्टे अभिमानी! त्यामुळे क्वचित् प्रसंगीं आर्य उत्तरेंतून दक्षिणेंत आले तरी या विरूद्धाचरणी दाक्षिणात्यांशीं त्यांचे पटावें कसें? आर्यांचा दक्षिणेंत त्यामुळे खराखुरा प्रवेश होऊं शकला नाहीं. उन्हाळी पाऊस भरभर घटका दोन घटका पडतो व क्षणांत नष्ट होऊन त्याचा पुढे मागमूसहि राहत नाहीं. त्याप्रमाणे आर्य दक्षिणेंत आले व परत हिंदुस्थानांत गेले. त्यांची संस्कृति त्यांच्यामागे दक्षिणेंत रेंगाळली पण ते गेलेच. जे थोडेबहुत आर्य दक्षिणेंत राहिले ते तेथील लोकगंगेंत मिसळून गेले! महाराष्ट्र हा हिंदुस्थान व दक्षिणदेश यांच्या मधील सीमांतर प्रदेश. महाराष्ट्र हें देशनांव तेव्हां प्रचारांत नव्हतें. दक्षिणापथाचा मध्यविभाग या संज्ञेने तो प्रदेश ओळखला जाई. दिवस व रात्रीला जोडण्याचें कार्य ज्याप्रमाणे संध्याकाल करतो त्याप्रमाणे हिंदुस्थान व दक्षिण देश यांच्यामधील महाराष्ट्र हा दुवा होय. टोळधाडीप्रमाणे आर्य दक्षिणेंत आले व परत गेले. दक्षिणेंत ते स्थायिक झाले नाहीत. त्यांच्यापैकी थोडेफार महाराष्ट्रांत म्हणजे उत्तर-दक्षिणेंतील सीमाप्रदेशांत मात्र राहिले.

पण जे थोडे आर्य महाराष्ट्रांत राहिले ते तेथील बहुजन समाजांत मिसळून गेले. द्रवीड व नाग लोकांशीं त्यांचे सोयरसंबंध झाले. पश्चिम समुद्राच्या काठाकाठाने उत्तरेंतून दक्षिणेंत आलेले आर्य सूर्पारक व कोकण प्रांतांत राहिले आणि नर्मदा व तापी ओलांडून आलेले आर्य विदर्भाच्या सुपीक मैदानाला भाळून तेथेच चिकटले. गुळाची ढेप दृष्टीस पडल्यावर मुंगळे तेथे चिकटले तर त्यांत नवल नाहीं. विदर्भ व कोकण यांच्यामधील प्रदेश पूर्वी दंडकारण्य या नांवाने प्रसिद्ध होता. सुखाचा जीव धोक्यांत कोण घालणार ? हातचें सुख सोडून पळत्याच्या पाठीस कोण लागणार ? दंडकारण्याची वसाहत या कारणाने विदर्भ व कोकणाच्या मानाने फार उशीरा झाली.

आर्य, द्रवीड व नाग यांच्या वंशसंकराने हल्लीचे महाराष्ट्रीय लोक झाले आहेत. द्रवीड व नाग बहुसंख्याक आणि तेथे स्थायिक झालेले आर्य अल्पसंख्याक असल्यामुळे महाराष्ट्रीय लोक स्वभावतः पंचद्रविडांत मोडतात. पंचगौड आर्यांत त्यांची गणना कोणी करत नाही. या वर्णसंकरामुळे महाराष्ट्रीयांत आर्य व द्रवीड यांच्या उत्तमोत्तम गुणांचें मीलन झालें आहे. ते आर्यांप्रमाणे सुधारक व सुसंस्कृत असले तरी द्रवीडांप्रमाणे परंपरेचे व स्वधर्माचे कट्टे अभिमानी आहेत. ते पराक्रमी असले तरी घरकोंबडे आहेत. ते धाडशी असूनहि चिवट व कंटक आहेत. ते शूर असूनहि चंचल नाहीत. चिकाटी हा त्यांचा सद्गुण आहे. आर्यसंकरामुळे त्यांच्या मूळच्या श्याम-वर्णावर जरा टवटवी चढली आणि त्यांना किंचित बाळसें आलें. त्यांची शारीरिक व सांस्कृतिक उंचीहि त्यामुळे वाढली. या सीमांत प्रदेशांत स्थायिक झालेले आर्य महारथी व महाराष्ट्रीक असत. संस्कृतापासून निघालेली प्राकृत महाराष्ट्री भाषा ते बोलत असत. चंद्रगुप्त मौर्याचा पराक्रमी नातू सम्राट अशोक याच्या कारकीर्दींत महाराष्ट्र देश मौर्य साम्राज्यांत मोडूं लागला व महाराष्ट्राची वस्ती वाढली. हा पराक्रमी सम्राट बुद्ध धर्मी होता

व धर्मप्रसाराच्या कार्यास त्याने आपलें आयुष्य वाहिलें होतें. वैदिक धर्मातील चातुर्वर्ण्यावर बौद्धांचा विशेष कटाक्ष होता. स्त्रिया व शूद्र यांना पुरुषांच्या व ब्राम्हणांच्या बरोबरीने बुद्ध धर्मांत मान असे. त्यामुळे अशोकाच्या काळांत आर्यांच्या बरोबरीने द्रवीड व नागांना सन्मान प्राप्त झाला. द्रवीड व नागांच्या संसर्गाने आर्यांची प्राकृत महाराष्ट्री भाषा अपभ्रंशाने दूषित झाली; परंतु त्या दूषणामुळेच मराठी या देशी भाषेच्या जन्माची पूर्वतयारी झाली.

उत्तर हिंदुस्थानांत आर्य, दक्षिणेंत द्रवीड व महाराष्ट्र या सीमाप्रदेशांत आर्य, द्रवीड व नाग यांचें संकर राष्ट्र नांदू लागलें. उत्तरेंतील आर्यांप्रमाणेच महाराष्ट्रीयांचे दक्षिणेंतील द्रवीडांशींहि स्नेहसंबंध असत. त्यांची संस्कृतोद्भव महाराष्ट्री भाषा देखील द्रवीड भाषांच्या संसर्गाने अपभ्रंशरूप पावली होती वैदिक हिंदु धर्माप्रमाणे बुद्ध व जैन धर्महि महाराष्ट्रांत पसरले होते अशोक व त्याच्या नंतरचे मौर्य सम्राट बुद्ध धर्माचे अनुयायी असल्यामुळे बुद्ध धर्माला मात्र राजधर्माचें स्थान प्राप्त झालें. बुद्ध धर्माचा प्रसार स्त्रियांत व शुद्रांत सुलभतेने व्हावा म्हणून बुद्ध धर्माने लोकांत रूढ असलेल्या प्राकृत भाषांना हाताशीं धरलें. संस्कृत भाषेचें महात्म्य त्यामुळे कमी झालें. ज्याप्रमाणे वैदिक धर्मभाषा संस्कृत होती त्याप्रमाणे पाली ही प्राकृत भाषा बुद्ध धर्माची अधिकृत भाषा झाली. त्या धर्मातील ग्रंथ पालींत लिहिले गेले. पाली या प्राकृत भाषेच्या अनुषंगाने इतर प्राकृत भाषांनाहि देशांत महत्व चढलें. महाराष्ट्री भाषेचाहि दर्जा त्यामुळे वाढला. जैन धर्माची तत्वें ती भाषा प्रतिपादन करूं लागली. अपभ्रंशात्मक महाराष्ट्री कालांतराने मराठी रूप धारण करून महाराष्ट्राची मातृभाषा बनली.

महाराष्ट्रीयांत साहजिकच दोन पक्ष निर्माण झाले. कोणाला आपल्या आर्य बीजाचें महत्व वाटें तर कोणाला आपल्या द्रवीड व नाग वंशांतील

रक्ताचा अभिमान वाटे! मौर्यांचें साम्राज्य मोडकळीस आलें तेव्हां हे पक्षभेद अधिकच तीव्र झाले. मौर्य साम्राज्य मोडलें आणि शुंग व कण्व, यांच्या राजवटी चालूं झाल्या. हिंदी राजे लोकांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष आमंत्रणाने व प्रोत्साहनाने शकांच्या स्वाऱ्या देशभर सुरू झाल्या. हिंदुस्थानांतील इतर प्रांताप्रमाणे शकांची टोळधाड उत्तरेनंतर महाराष्ट्रावरहि येऊन थडकली. स्थानिक राजांना साह्य देण्याकरिता म्हणून या देशांत आलेले शक हळूहळू एकामागून एक येथील प्रांत पादाक्रांत करून येथले मालक बनूं लागले. या देशाचे मूळचे खरे मालक चोर ठरले व बाहेरून आलेले चोर राजरोस साव बनून येथले मालक झाले. पाहुण्याला दिली ओसरी व पाहुणा मग हातपाय पसरी, अशी स्थिति सर्वत्र निर्माण झाली.

परदेशांतून शकांच्या टोळया या देशांत आल्या त्या अर्थातच बेछूट तरूण शिपायांच्या आल्या. दूर परदेशांत लढाईवर जातांना बायकापोरांचे व म्हाताऱ्याकोताऱ्यांचें लटांबर थोडेंच कोणी बरोबर बाळगतो? शिवाय शक गोरेगोमटे, उंचेपुरे, धष्टपुष्ट असले तरी रानटी व क्रूर पशू होते. त्यांच्या समाजांत वैयक्तिक कुटुंबसंस्था निर्माण झाली नव्हती. त्यामुळे त्यांना कोणताच माया-ममतापाश नसे. ते सामायिक कुटुंबपद्धतीने राहत असत. शकांची एक टोळी म्हणजे एक मोठे सामायिक कुटुंब. त्या टोळीचा नेता हा त्या कुटुंबांतील कर्ता पुरुष! त्या टोळीच्या ताब्यांत असणारी गाई-म्हशी घोडे-बकरे वगैरे संपत्ति त्या कुटुंबाच्या सामायिक मालकीची! त्या टोळींतील शूर वीरांनी तरण्याताठ्या पोरी कोठून पळवून किंवा चोरून किंवा जिंकून आणल्या कीं त्या सर्व जणी जमातीच्या उपभोग्य वस्तू समजल्या जात असत. विवाह व लग्न हे शब्द शकांच्या कोशांत नव्हते. त्यांच्या जमातीच्या आश्रयाने राहणाऱ्या गाई म्हशींना वासरें झालीं म्हणजे तीं जशी त्या जमातीची सामायिक मिळकत समजली जाई, त्याच न्यायाने तेथे त्यांच्या आश्रयाने त्यांच्या छावणींत वा गोटांत राहणाऱ्या

स्त्रियांना संतती झाली तर ती त्या टोळीची सामायिक वारस समजली जाई. तिच्यावर कोणाचीच वैयक्तिक वात्सल्य, प्रीति वा मालकी नसे. आणि जनावराप्रमाणेच मुक्तपणें स्त्रीसंभोग करणाऱ्या रानटी पशूंना, ते कितीहि गोरेगोमटे, धाडशी व शूर असले तरी आईबापांचें, मातापुत्राचें किंवा पितापुत्रीचें पवित्र व प्रेमळ नातें कसें कळावें ?

शकांच्या टोळधाडीमुळे देशभर कसा हलकल्लोळ उडाला असेल याची कल्पना करणें कठिण आहे. शकांनी मुलुख बेचिराख करावा, लुट-मार करावी, खाद्यपेयांचा फडशा पाडावा, तरुणांची कत्तल करावी व त्यांच्या बायकामुली पळवून त्या आपल्या गोटांत दाखल कराव्या. म्हातारे-कोतारे लोक हातीं सापडले तर शक त्यांना दास करून त्यांच्या करवी आपली हलकी-सलकी कामें करवून घेत असत. त्यांच्या हातीं लागलेल्या सुंदर व तरूण स्त्रिया टोळीच्या भोग्यांगना समजल्या जात असत. टोळींतील नायकाच्या हुकमाप्रमाणे त्या भोग्यांगनांची प्रतिदिवशीं वाटणी होत असे. त्यांच्या जमातीच्या कायद्याप्रमाणे हे प्रकार नैतिक व समर्थनीयच ठरत असत. शकांना त्यांत कांही अनैतिक व पाशवी अत्याचार भरला आहे, असें वाटत नसे. परंतु सुधारलेल्या व सुसंस्कृत हिंदी लोकांना ही घटना किती भीषण, अन्यायी व पाशवी वाटत असेल, बरें! एखाद्या प्रसंगीं शकांच्या टोळीला हार खाण्याचाहि प्रसंग येई. तेव्हां ते आपल्या मालकीच्या जना-वरांची व बायकांची सररास कत्तल करून सड्या स्वारीने पलायन करीत असत. शत्रूंच्या हातीं आपल्या सुंदर भोग्य वस्तू लागूं देण्यापेक्षा त्यांचा विध्वंस करणें त्यांना पसंत पडत असे. आज युद्धांत एके ठिकाणीं अपजय आला तर उद्यां दुसरीकडे विजय मिळेल अशी त्यांची खात्री असे. कारण शकांना घरदार नसे व त्यामुळे वायुगतीने त्यांचा संचार सर्वत्र होत असे. जिकडे लूट मिळण्याचा संभव तिकडे ते धावून जात असत. शिवाय त्यांच्याजवळ स्वारीला घोडे असल्यामुळे त्यांची स्वारी व पलायन

तीव्र गतीने होई. उलटपक्षीं हिंदी लोक येथे स्थायिक झालेले, घरादारांना व शेतीवाडीला जखडलेले आणि बायकामुलांच्या नाजुक व प्रेमळ संसारी बंधनांनी बांधलेलें ! ते एखाद्या चकमकींत तात्पुरते विजयी झाले तरी शकांच्या मागे पाठलाग करीत कुठपर्यंत हिंडणार? शकांची वाऱ्यावर वरात असावयाची ! आज येथे तर उद्यां तेथे ! आज जमातीला शंभर स्त्रिया लुटमारींत सापडल्या, उद्यां पन्नास गमावल्या तर परवां नव्या शंभर पैदा केल्या ! शेत कोणीहि पिकवावें, त्यांतील धान्य शक लोक खात असत. दूध कोणीहि काढावें व विरजावें, लोणी शक लोक खात असत. बायका, मुलीबाळी, बहिणी कोणाच्याहि संसारांतील असोत, संधि सापडताच शक लोक त्या लुटून त्यांचा उपभोग घेत असत !

बुद्धधर्मी मौर्य साम्राज्याचा अस्त व हिंदुधर्मी प्रतापशाली गुप्त साम्राज्याचा उदय, यांच्यामधील संधिकालांत शकांचें हिंदुस्थान देशावर आक्रमण झालें. रात्र व दिवस यांना जोडणारा आशादायक व आनंदमय प्रभातकाल हाहि संधिकालच होय व दिवस-रात्रीला जोडणारा अनर्थसूचक व नैराश्यपूर्ण संध्याकाल हाहि संधिकालच होय ! परंतु त्या दोहोंत किती जमीन-अस्मानाचें अंतर आहे. त्यापैकी एक दैवी तर दुसरा दानवी ! या दानवी संधिकालांत धर्म व नीति यांना कोणीच त्राता उरला नाही. हिंदू लोक धर्मनिष्ठ होते परंतु अधार्मिक व भुरट्या शक लोकांची व त्यांची गाठ पडली. शकांना धर्म नव्हता व कोणती उज्वल संस्कृतिहि त्यांच्यांत नांदत नव्हती. ते सडे–फटिंग हिंदुस्थानांत आले. संसारबंधनें त्यांच्यांत नव्हतींच. पूर्वी एशिया खंडांत अरेबिया, मेसापोटेमिया, बॅक्ट्रीया वगैरे ज्या भागांत ते नांदत असत, तेथे जमातीचा कायदा चालू असे. त्यांची सजातीय पण सामायिक बायकामुलें त्यांच्या मूळ देशांतच मागे राहिलीं व ते सडेसोट हिंदुस्थान लुटण्यास आले. तेव्हां त्यांच्या मागे कसलाच पाश नव्हता.

कसलेंच बंधन त्यांना अडवूं शकत नसे. कोणतेंहि नाजुक नातें त्यांना अवगत नव्हतें.

हिंदुस्थान ही त्यांची भोगभूमि होती. खावें प्यावें, लुटमार करावी, विलास करावा, बायका–जनावरें लुटावीं व वाटून घ्यावीं, त्यांचा उपभोग घ्यावा व प्रसंग पडल्यास त्यांची कत्तल करावी ही त्यांची आचार–नीति ! अशा उडाणटप्पू लोकांना सुधारलेल्या राजयंत्राची माहिती कोठून असणार ? त्यांचा पुढारी हा त्यांचा राजा व त्याचा शब्द हा त्यांचा कायदा. त्याची आज्ञा पालन करणें हाच त्यांचा धर्म! एकमेकांशीं दगलबाजी न करणें ही त्यांची नीति ! टोळीच्या बाहेरील इसमाशीं दगा करण्यांत ते पाप समजत नसत. टोळी हेंच त्यांचें कुटुंब व हेंच त्यांचे राज्य, पुढारी हाच त्यांचा राजा व हाच त्यांच्या सामायिक कुटुंबांतील कर्ता पुरुष. मिळेल ती लूट टोळीच्या समायिक मालकीची. एखाद्याने गुप्तपणें लुटींत मिळविलेली एखादी वस्तु नायकाजवळ न देतां स्वतःजवळ ठेवून घेतली तर तो अत्यंत मोठा अपराध समजला जाई. एखाद्या इसमाचें मन एखाद्या विवाक्षित स्त्रीवर गुंतून राहिलें तर ती गोष्ट अधर्म्य व अनैतिक समजली जाई. विवाह हा तर त्यांच्यांत महान अपराध समजला गेला असतां आणि त्या रीतीने एखाद्या विवक्षित स्त्रीच्या पाशांत सापडणाऱ्या पुरुषाला कडक शिक्षाहि जमातीने दिली असती. स्त्रियांची गणना टोळीच्या मालकीच्या वस्तूंत होत असे. आणि टोळीच्या मालकीच्या सर्व वस्तूंचा सर्वांनी आळी-पाळीने नायकाच्या अनुमतीने उपभोग घ्यावा हा राजमार्ग समजला जात असे. त्यामुळे टोळींतील इसमांत बंधुभाव नांदत असे. मोठा–लहान हा भेदभाव त्यांच्यांत नसे. आपला पुढारी ते स्वतःच निवडत असत व एकदा त्याला निवडल्यानंतर त्याच्या आज्ञेंत ते वागत. पुढारी मेला किंवा मारला गेला तर जमातींतील बलिष्ठ, अनुभवी व चतुर पुरुषाची नवा

पुढारी म्हणून टोळीकडून निवडणूक होई. हीच त्यांची राज्यव्यवस्था व हीच त्यांची समाजघटना !

अशा बेबंद लोकांच्या स्वाऱ्यांनी हिंदुस्थान देश किती त्रस्त झाला असेल ? आणि त्यांना आपल्याच हिंदी राजांनी एकमेकांच्या चुरशीने हिंदुस्थानांत बोलावले व उत्तेजन दिलें. ते आले, लोभावले व येथेच राहिले. त्यांना या सुजलां सुफलां भूमींतून परत आपल्या रुक्ष वैराण देशीं जाण्यास सांगण्याची हिंमत कोणाला होणार ? ते सडेफटिंग येथे आले खरे परंतु ते पुढे संसारी बनले. त्यांच्या जातीच्या बायका त्यांच्या देशांत राहिल्या पण नव्या फटाकड्या हिंदी बायका त्यांनी येथे संपादन केल्या. त्यांचा देश रूक्ष व नापिकी ! तो निर्जल वाळवंटी प्रदेश ! येथील **सुजलां सुफलां शस्यश्यामलां** भूमि पाहून ते प्रसन्न झाले. येथून परत स्वदेशी जाण्याची त्यांना इच्छाच होईना. मधाला मुंगळे चिकटतात त्याप्रमाणे ते येथेच स्थायिक झाले. त्यांच्या देशांतील स्त्रिया त्यांच्याप्रमाणेच धष्टपुष्ट, उंच्यापुऱ्या, कंटक व राठ असत. त्यामुळे येथील ऐश्वर्यांत लोळणाऱ्या व सुग्रास अन्न खाणाऱ्या नाजुक, ठेंगण्या ठुसक्या, सुकुमार व कोमल रमणीवर त्यांचें चित्त विलोभलें तर त्यांत नवल नाही. विरोधभक्ति हा मानवी आवडीनिवडीचा पाया होय. दांडगे राक्षस सुकुमारींच्या नेत्रकटाक्षांनी विव्हल होतात आणि सुंदर व नाजुक रमणी आडदांड पुरुषांच्या चरणाच्या दासी होण्यांत धन्यता मानतात. या वैचित्र्यप्रियतेचे समर्थन एरवी कसें करणार ?

---

१

## कुमारीपुत्र कर्ण—

भारतवर्ष सर्व जगांत पुढारलेला होता. चवदा विद्या व चौसष्ट कलांचें माहेरघर या देशांतच होतें. गणित, ज्योतिष, रसायन, वैद्यक हीं शास्त्रें या देशांत परिणत झालीं होतीं. येथूनच चीन, अरेबिया, इराण, मिसर, मेसापोटेमिया व ग्रीस या देशांत हीं शास्त्रें व विद्या पसरल्या! धर्म, तत्वज्ञान व काव्य यांचा अपूर्व सुंदर त्रिवेणी संगम या देशांत झाला होता. वाल्मिकीच्या रामायणाने होमरला स्फूर्ति मिळाली व त्याने इलीयड हें महाकाव्य रचलें. महर्षी व्यासांच्या महाभारताने साक्रेटीस—प्लेटो—अरिस्टाटल

या गुरुशिष्यपरंपरेला विचार-जागृत केलें. ग्रीक तत्वज्ञान, राजनीतिशास्त्र, पुराणें व धर्मशास्त्र या विविध युरोपीयन ज्ञानभांडाराचा उगम महाभारताच्या मंथनांतून झाला.

इंद्र—वरूण—मरूत या नैसर्गिक देवतांच्या कृपाप्रसादाने मनमुराद धन-धान्य येथे पिकत असे व येथूनच सुधारलेल्या जगाला अन्नवस्त्रांचा पुरवठा होई. हिरे—माणिक—मोतीं—पाच-नील अशा विविध रत्नांनी ही भूमि अलंकृत झाली होती. सुवर्ण-भूमि म्हणून ज्ञात जगांत ती ख्यात होती.

हिंदी संस्कृति व हिंदु आणि बौद्ध धर्म यांचा प्रसार परखंडांत झाला. हिंदी भिक्षू व व्यापारी परदेशांत जाऊन वसाहती करूं लागले व तेथील लोकांत हिंदु संस्कृतीचे लोण पोहोचवूं लागले. जावा, बली वगैरे प्रशांत महासागरांतील बेटांत आणि उत्तर व दक्षिण अमेरिकेंत हिंदी लोकांनी आपल्या वसाहती थाटल्या. त्यामुळेच उत्तर अमेरिकेंतील मूळच्या रहिवाश्यांची तेथे नवीन आलेल्या पाश्चात्य गोऱ्या लोकांनी रक्तवर्ण हिंदी लोकांत (Red Indians) गणना केली इतका त्या दोघांत सारखेपणा होता. हिंदी लोकांचा वर्ण ताम्र किंवा गहू या उपमेने अजूनहि वर्णन केला जातो. दक्षिण अमेरिकेंतील मूळचे रहिवाशी इंका हे तेथे पिढ्यान् पिढ्या पूर्वी स्थायिक झालेल्या हिंदी लोकांचेच वंशज होते, हें त्यांच्या नामसादृश्या-वरून कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

हिंदी लोकांची समाजरचना नमुनेदार होती. त्यांच्यांत जातीभेद नव्हता पण गुणकर्मावर अधिष्ठित झालेला वर्णभेद मात्र होता. स्वतःच्या कर्तब-गारीने कोणालाहि इच्छा झाली तर एका वर्णांतून दुसऱ्या वर्णांत जातां येत असे. विश्वामित्र क्षत्रियाचा ब्राम्हणच केवळ नव्हे तर ब्रम्हर्षी म्हणून समाजांत मान्य होई व जन्माने चांडाळ असतांहि अरुंधती ऋषी—पत्नी

म्हणून पूजनीय ठरत असे. बहुसंख्याक जनता मात्र आपल्या वंशपरंपरागत वर्णांत राहून धंदेवाईक नैपुण्य पिढ्यान् पिढ्या जतन करी व त्यामुळे कलांची येथे विलक्षण प्रगति झाली.

वर्णव्यवस्थेप्रमाणेच प्रत्येकाला आश्रमधर्म पाळावे लागत. ब्रम्हचर्य व शिक्षण यांची सांगड घातली जाई. तारुण्यांत गृहस्थाश्रम धर्म प्रत्येकाला पाळावा लागे. संसार करावयाचा व संततीस जन्म देऊन पितरांचें ऋण फेडावयाचें आणि वंशसातत्य टिकवावयाचें. गुरु–ऋषी यांचें ऋण शिक्षण घेतल्याने फिटत असे. संसारानंतर वानप्रस्थाश्रम व संन्यास या आश्रमांत मनन, पूजन व यजन केल्याने देवांचें ऋण फिटें आणि मोक्षाची तयारी होई. वृद्ध विरक्त व संसारनिवृत्त झाल्यामुळे तरुणांच्या महत्वाकांक्षांना खुलें क्षेत्र सापडत असे. त्यामुळे वृद्धांविरुद्ध जळफळण्याचा प्रसंग तरुण–तरुणींना येत नसे. सुनबाईला सासूचें गृहराज्ञीपद लाभत असें.

चारी वर्णांत विवाहसंबंध रूढ होते. मनुष्य स्वभावतः कर्मठ व परंपराभक्त असल्यामुळे आपल्या समसंस्कारी लोकांशी सामान्यतः सोयरेसंबंध करीत असे, परंतु चातुर्वर्ण्यांत सोयरेसंबंध जोडण्याच्या मार्गांत धर्माची आडकाठी नव्हती. परधर्मी व परदेशी तरुणींशीं देखील विवाह करण्यास समाजाची वा धर्माची आडकाठी नसे. तिला अर्थातच हिंदी संस्कृतीची प्रथम दीक्षा घ्यावी लागे. मुलांप्रमाणेच मुलींचेंहि शिक्षण होई व ज्या विशेष बुद्धिमंत असत त्या गार्गी मैत्रेयीप्रमाणे महापंडिता होत. वेदांतील सूक्तें देखील स्त्रियांनी रचलीं मग सामान्य लोकगीतांची गोष्ट निराळी सांगावयास नकोच.

विधवांना पुनर्विवाहाची मोकळीक होती इतकेच नव्हे, तर ज्या दुर्दैवी स्त्रियांचे पति क्लीब असत किंवा दूर देशांतराला निघून गेल्यामुळे ज्यांचा पत्ता लागत नसे किंवा जे पतित अथवा धर्मभ्रष्ट होत, त्या सर्वांना

पुनर्विवाहाची मोकळीक असे. म्हणजे पुनर्विवाहाबरोबरच घटस्फोटाचीहि मर्यादित परवानगी समाजाने स्त्रियांना दिली होती. पति जीवंत असून पत्नीच्या दृष्टीने जीवन्मृत असला तर तिला अन्य पतीबरोबर संसार थाटण्याची मुभा असे. मात्र पातिव्रत्य व एकपत्नीव्रत यांचा समाजांत सन्मान होई. स्वैरता निंद्य मानली जाई. अपवादात्मक बहुपत्नीत्व किंवा बहुपतिकत्व यांच्याकडे क्षमाशील वृत्तीने पाहण्याचा समाज प्रयत्न करी.

मुलींचीं लग्नें बऱ्याच उशीरा म्हणजे त्या वयांत येऊन शहाण्या झाल्यानंतरच होत. स्वयंवराला प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. मुली आपले सहचर पसंत करीत. समाजांत त्या मोकळेपणाने हिंडत फिरत व तरुणांबरोबर मिसळत. एरवी आपल्या सहचरांची निवड त्यांना कशी करतां येणार? तरुणांनाहि तीच सवलत मिळत असे. स्त्रीस्वातंत्र्याच्या या प्रथेमुळे तरुण–तरुणींचा संयम कधीमधी पराभूत होई. कारण तरुणांच्या मनावर विचारांपेक्षा विकारांचें प्राबल्य अधिक असतें व नीतिधर्मपर आज्ञावचनापेक्षा कामुक आकर्षण अधिक प्रभावी ठरतें. त्यामुळे क्वचित कुमारींना गर्भधारणा होई व विवाहपूर्व त्या माताहि होत असत. मात्र कुमारी मातांच्या संततीचें समाजाकडून पालन करण्यांत येई. कुमारीपुत्रांना कर्ण म्हणून संबोधण्यांत येई. कर्ण किंवा कानीन हें समाजांत सामान्य वर्गनाम म्हणून रूढ झालें होतें. यावरून तत्कालिन समाजांत कुमारी–माता बऱ्याच जणी होत असत, असें दिसतें.

विवाहोत्तर पुत्रांचा दर्जा अर्थातच कानीन पुत्रांना लाभत नसे, पण अंगच्या कर्तबगारीने त्यांना अंगराजाप्रमाणे मोठेपणास चढतां येत असे व मग त्यांना समाजांत कर्णाप्रमाणे मानमान्यताहि मिळे. शक लोकांच्या विजयी पण संहारी स्वाऱ्यामुळे कानीनपुत्रांच्या संख्येंत मोठीच भर पडली असावी. त्यांच्यांतील कांही अत्यंत थोर पदाला चढले! मातृत्व हें नारी-

जीवनाचें साफल्य मानलें जाई. मातृत्व धर्मानुसारी असलें तर तें उघडच वंद्य ठरे. कुमारीमातेकडे कमीपणा येत असला तरी ती पूर्णपणे बहिष्कृत समजली जात नसे. त्यामुळे अनुकूल परिस्थितींत ह्या कुंतींचे विवाह देखील होत असत व मग त्यांना समाजांत पुनश्च पूर्वप्रतिष्ठा प्राप्त होई. त्यांच्या विवाहपूर्व असंयमी वर्तनाची समाज मौन धारण करून क्षमा करी. मौनं संमतीलक्षणं नसलें, तरी या बाबतींत क्षमालक्षणं होत असे.

परंतु हिंदी संस्कृतीचा मोठेपणा तिच्या औदार्यांत व संग्राहक धोरणी बुद्धींत आहे. यवन, पल्लव, शक, मग, हूण, कुशाण या परदेशी असंस्कृत व आडदांड लोकांवर हिंदी संस्कृतीने संस्कार करून त्यांचा आपल्या समाजांत समावेश करून घेतला. हिंदु धर्मांत त्या परकीयांचा अंतर्भाव झाला एवढेंच नव्हे, तर हे नवे समाज हिंदु धर्माशीं तादात्म्य पावले. अति प्राचीन काळी देखील अनार्य, दस्यू व राक्षस यांना हिंदु समाजरचनेंत स्थान मिळालें. युरोपांतील पाश्चात्य लोक जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी मूळ रहिवाशांचा समूळ नाश केला व वसाहतीसाठी निष्कंटक व निर्मनुष्य भूमि निर्माण केली. अमेरिका, आफ्रिका व आस्ट्रेलिया यांचे इतिहास या दृष्टीने अति निंद्य व रक्ताने माखलेले ठरतील. हे तिन्ही खंड गोऱ्यांनी सुधारले खरे पण तें कार्य स्वार्थी होतें. काळया व लाल रंगाच्या रहिवाशांच्या रक्ताचें खत त्या खंडांतील भूमीस घालावें लागलें. उलटपक्षी हिंदी समाज-संस्कृतीने मूळच्या रानटी लोकांचा शक्य तेवढा उद्धार केला व त्यांना आपल्या संस्कृतींत समाविष्ट केले. त्यांना सर्वांना चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत स्थान मिळालें.

यवन, पल्लव, शक व युएची (कुशान) हे परदेशी असंस्कृत असले तरी निदान दिसण्यांत उमदे दिसत. मग व हूण हे मात्र भीषण व भेसूर दिसत. परंतु हिंदु समाजांत या सर्वांचा समावेश झाला. प्रसिद्ध बुद्धधर्मी मिलिंद राजा व त्याचा नातू हिंदुधर्मी कृष्णभक्त हरमणी हे दोघेहि

मूळचे यवन (ग्रीक) होते. सुप्रसिद्ध बुद्धधर्मी सम्राट कनिष्क व त्याचा नातू हिंदु धर्मी वासुदेव हे मध्य आशियांतून आलेले कुशानवंशी होते. रुद्रदमन व नहपान हें राजे बॅक्ट्रियांतून आलेले शकवंशी होते. हिंदुस्थानच्या इतिहासांतील ही मौज मुद्दाम लक्ष वेधल्याशिवाय कोणाच्या लक्षांतहि येणार नाही. कारण अति परिचयामुळे आपणांस ते सर्व हिंदु राजे वाटतात.

ह्या राजांबरोबर त्यांच्या शिपायांनाहि हिंदु संस्कृतीने छाप मारून आपले केले. त्यांनी येथील हिंदी लोकांशी विवाह-संबंध जोडले व कोणी हिंदु धर्माची तर कोणी बुद्ध धर्माची तर कोणी जैन धर्माची व सांप्रदायाची दीक्षा घेतली. या उदार धोरणामुळे हिंदु धर्मांत अनेक पंथ निर्माण झाले व अनेक देवदेवतांना मान्यता मिळाली. बुद्ध व जैन धर्मापासून तों आर्य व ब्रम्हसमाजापर्यंत सर्वांचा हिंदु धर्मांत समावेश झाला व तोहि आपुलकीच्या सर्वसंग्राहक भावनेने!

उदार प्रवृतीच्या व विश्वधर्मी मनोवृत्तीच्या हिंदु समाजाने कानीन पुत्रांना प्रेमाने व आदराने वागविले असल्यास त्यांत नवल नाहीं. त्यामुळे कानीन पुत्र मोठ्या अभिमानाने म्हणूं शके—**दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्** ।

# १०

## दाक्षिणेचा पराक्रम-

दक्षिणापथाच्या नैसर्गिक मर्यादा स्वातंत्र्याला पोषक होत्या. तीन बाजूंना अथांग महासागर व उत्तरेस विंध्याद्री–सातपुड्याचे किल्लेकोट व नर्मदा–तापीचे जलपूर्ण खंदक ! त्यामुळे दक्षिण देश कायमचा कधीच जिंकला गेला नाही. परकीय अंमलाखाली प्रसंगवशात तो आला तरी लवकरच तो स्वातंत्र्यप्राप्तीस्तव पुन: खटपट व धडपड करूं लागे. स्वातंत्र्यासाठी दक्षिणेची तपश्चर्या गेलीं दोन हजार वर्षें सतत चाललेली दिसते.

मौर्य वंशातील सुविख्यात चक्रवर्ती अशोकाने दक्षिणापथाचा बराच मोठा भाग जिंकला. आंध्र व कलिंग देशचे राजे प्रसंग पाहून वेताप्रमाणे वाकले पण मोडले नाहीत. त्यांनी सम्राट अशोकाला मजरे केले पण आ:नलें

स्वातंत्र्य कायम राखलें. मौर्यांचा भाग्यरवि मावळल्यानंतर त्यांनी हळूच आपलें डोकें वर केलें. शुंगाच्या कारकीर्दीत त्यांनी उत्तरेला शह दिला व कण्वांचें तर समूळ उच्चाटण केलें.

दक्षिणेंत आंध्रराजे अत्यंत प्रबल होते. दक्षिणेच्या पूर्व विभागावर त्यांची प्रत्यक्ष सत्ता होती. दक्षिणापथाच्या मध्य व पश्चिम विभागांतील आर्य, द्रवीड व नागवंशी राजे स्वतःला त्यांचे मांडलीक म्हणवून घेत. मध्य दक्षिणापथांतील नागवंशी राजे तर आंध्रभृत्य म्हणवून घेण्यांत धन्यता मानीत. त्यांच्या सैन्यांत व कचेरींत आंध्र नोकरांचा साहजिक बराच मोठा भरणा असे.

शुंगांनी मौर्यांना पदच्युत करून त्यांच्या राज्याचा ख्रिस्तपूर्व १८५ सालीं ताबा घेतला. शुंग घराण्याचा संस्थापक पुष्यमित्र हा मौर्यांचा सेनापति होता. पण हें पापाचें राज्य त्याला मानवलें नाही. कारण मौर्य सत्तेचें दडपण जातांच त्यांचे मांडलिक पुष्यमित्राचें सार्वभौमत्व सुखासुखी कबूल करीनात. यवनाधिपति मिलिंद याने मथुरा, साकेत व राजपुताना हे प्रदेश शुंगाकडून जिंकून घेतले. मिलिंदाने बुद्ध धर्माचा स्वीकार केला होता. काबूलपासून औधपर्यंत त्याच्या राज्याचा विस्तार झाला.

त्यानंतर कलिंगाधिपति खारवेल या जैनधर्मी राजाने आग्नेय दिशेकडून मगधावर स्वारी केली व शुंगांचा पराभव करून आपल्या राज्याच्या सीमा विस्तारल्या. मौर्य मगधाचे सत्ताधीश राजे व भारताचे सम्राट होते. परंतु वायव्य व आग्नेय या परस्परविरुद्ध दिशांकडून मिलिंद व खारवेल यांनी स्वाऱ्या करून मगध साम्राज्याचे लचके तोडले. पुष्यमित्राने हिंदु धर्माचा पुरस्कार केला पण त्याची परागति थांबली नाहीं. परंतु तो व त्याचा पुत्र अग्निमित्र यांच्या राजवटींत मगध राज्याचा थोडा बहुत तरी बोज राहिला.

पण त्यानंतर शकांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यांनी मगध साम्राज्याचे आणखी लचके तोडले व तें खिळखिळें करून टाकलें. त्यांनी यवनांचाहि पराभव केला व तक्षशीला, मथुरा व सौराष्ट्र येथे आपली सत्ता स्थापन केली. त्यांच्या स्वाऱ्यांनी समाजाची घडी विसकटली. या धांदलीचा फायदा घेऊन ख्रिस्तपूर्व ७३ या वर्षी वासुदेव कण्व या शुंगांच्या ब्राम्हण अमात्याने शुंगांना पदच्युत करून मगधाचें सिंहासन आपल्या ताब्यांत घेतलें. वासुदेव कण्व थोडा बहुत कर्तबगार असला तरी त्याचे वंशज अगदीच निर्बल निघाले. शकांचा बंदोबस्त त्यांना करता येईना. अवंतीवर शकांची सत्ता प्रस्थापित झाली व माळव्याचें नंदनवन उजाड झालें.

मौर्य सम्राटांची सत्ता संपुष्टांत आल्यापासून आंध्रांनी आपलें आसन दक्षिणेंत बळकट केलें होतें. ते कडवे हिंदुधर्माभिमानी होतें. उत्तरेस धर्मावर व समाजावर आलेलें भीषण परचक्र त्यांना बघवेना. या वेळी आंध्रदेशाच्या सिंहासनावर एक तरुण व अद्भुत पराक्रमी राजा बसला होता. त्याला सर्व सिद्धी वश होत्या व वेताळ आपल्या गणांसह त्याच्या आज्ञेत असे. त्याचा पिता नरसिंह हा देखील अत्यंत शूर होता. परंतु नरसिंहाचा पुत्र त्रिविक्रम सेन हा पित्यापेक्षाहि थोर निघाला. त्याने आपल्या निवडक सैन्यानिशी नर्मदा नदी ओलांडली व शकांशी झुंज घेतली. त्या युद्धांत शकांचा पराभव झाला व माळव्याचें राज्य त्रिविक्रमसेनाच्या हातीं लागलें. त्रिविक्रमसेनाने धनकटक ही आपली जुनी कृष्णाकाठची प्रमुख राजधानी अवंती येथे आणली. कारण त्या महत्वाकांक्षी वीराला भारतवर्षाचा सम्राट व्हावयाचे होते. त्या दृष्टीने धनकटकापेक्षा अवंती अधिक सोयीची व मध्यवर्ती होती. त्याने विक्रमादित्य अशी पदवी धारण केली व अश्वमेध यज्ञ करून तो भारताचा सम्राट झाला. शकावर मिळविलेल्या विजयामुळे त्याचा सर्व हिंदुस्थानभर जयजयकार झाला व त्याच्या सन्मानार्थ ख्रिस्तपूर्व ५७ पासून विक्रम संवत गणना सुरू झाली. चक्रवर्ती विक्रमादित्याने शकांच्या हातून अवंती नगरी ख्रिस्त

पूर्व ५७ साली घेतली. हल्ली विक्रम संवत १९९९ चालूं आहे. म्हणजे महाराजाधिराज विक्रमादित्य यांनी सम्राटपद धारण केल्यापासून जवळ जवळ दोन हजार वर्षे लोटली. विक्रम संवताचा प्रारंभ कार्तीक शुद्ध प्रतिपदेपासून होतो. म्हणजे दिवाळीचा सण. अश्वीन वद्य अमावास्या हा विक्रम संवताचा वर्ष अखेरीचा दिवस. त्या दिवशीं लक्ष्मी पूजन होतें व व्यापारी आपल्या वार्षिक जमाखर्चांचा आढावा काढतात. जमाखर्चांच्या वह्यांचेंहि पूजन करण्यांत येतें व दीपावलीचा मंगल मनोहर प्रकाश घराची शोभा वृद्धिंगत करतो. विजयादशमीनंतर वीस दिवसांनी सवंत गणनेस प्रारंभ व्हावा ही सूचक गोष्ट आहे. शकांचा पराभव करून बहुधा विजयादशमीच्या सुमुहूर्तावर राजा विक्रमाने अवंतीनगरींत प्रवेश केला असावा. त्यानंतरच्या नव्या चांद्रमासाची प्रतिपदा ही नववर्षदिनाची मंगला मानण्यांत आली. उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र आणि दक्षिणदेशांत हि व्यापारी जगतांत विक्रम संवतानेच कालगणना करण्यांत येते. त्यापूर्वी युधिष्ठिर संवताने कालगणना होत असे. सुप्रसिद्ध धर्मराजाचा संवत मागे पडून विक्रम संवत चालूं झाला यावरून त्या थोर आंध्र सम्राटाने भारतांतील जनतेवर आपल्या पराक्रमी चारित्र्याचा केवढा प्रभाव पाडला असेल याची कल्पना करतां येते. धर्मराजापेक्षाहि विक्रमादित्य लोकप्रिय ठरला. या नव्या अवतारी चक्रवर्तीचा जयजयकार भारतांत होऊं लागला. मगधाचे कण्व राजे, जे पूर्वी नामधारी कां होईना, सम्राट समजले जात असत, त्यांनी देखील विक्रमादित्याला खंडणी देऊन संतुष्ट केले.

अवंती भारतवर्षाचें नवें केंद्र झालें. पाटलीपुत्राचें वैभव अवंती नगरीस प्राप्त झालें. विद्वान व शूर वीरांचा भरणा विक्रमादित्याच्या दरबारांत होऊं लागला. विक्रमादित्य महाराज या वेळीं जेमतेम पंचवीस वर्षांचे असतील.

विद्वानांचा परामर्श घेणें, विद्याकलांना उत्तेजन देणें व सभोंती पसरलेल्या परदेशी शत्रूंचा व स्वदेशी कंटकांचा समाचार घेणें, यांतच

महाराजांचा सर्वकाळ व्यतित होई. मगधाचे अखेरचे कण्व राजे अगदीच नादान निपजले. त्यांना शत्रूंचा नीट बंदोबस्त करतां येईना. तेव्हां विक्रमादित्य महाराजांनी नाइलाजास्तव खिस्तपूर्व २७ सालीं मगधावर स्वारी केली व सुशर्मा कण्वाला पदच्युत करून मगध देश आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केला. या स्वारींत मध्य दक्षिणापथाचा नागवंशी युवराज कुमारवर श्रीमुख याने अचाट पराक्रम केला. त्यावेळीं विक्रमादित्यांचें वय सरासरी ५५ व युवराज श्रीमुख याचें वय सरासरी २० वर्षांचें होतें. त्यामुळे या दोघां नामवंत वीरांना सर्वांनी भीष्मार्जुनाची उपमा एकमताने दिली.

या स्वारीनंतर शकांशी लढण्याचा भार श्रीमुखाने उचलला. त्यामुळे महाराजांना तो आपला उजवा हात वाटूं लागला. विक्रमादित्याची या तरुण सेनापतीकडे कृपादृष्टि वळली व त्यांनी आपली सर्वांत धाकटी कन्या श्री श्रीमुखास अर्पण केली. श्रीमुख सम्राटांचा जावई झाला. विवाह समयीं श्रीचें वय सोळा व श्रीमुखाचें चोवीस होतें.

आंध्र सम्राट व त्याचा सेनापति श्रीमुख यांच्यापुढे शकांची मात्रा चालेना. याच सुमारास युएची उर्फ कुशानवंशी परदेशीयांनी हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीपलीकडील प्रदेशांत शकांना शह देण्यास प्रारंभ केला. आंध्र सम्राट व कुशान यांच्या कैचींत सापडलेले शक दक्षिणेकडे हळू हळू घुसूं लागले. तेव्हां त्यांना दक्षिणेंत प्रतिरोध करण्यासाठी श्रीमुखाची पत्नीसह प्रतिष्ठानास रवानगी करण्यांत आली. खिस्तपूर्व १५ ते खिस्तोत्तर १५ पर्यंत श्रीमुखाने मध्य दक्षिणापथावर आपला अंमल गाजविला. तो स्वतःला स्वतंत्र राजा म्हणवूं लागला. परंतु शकांचा अनेकदां पराभव करूनहि त्यांचें निर्मूलन होईना. महिरावणाप्रमाणे प्रत्येक पराभवानंतर ते बलिष्ट होत चालले. कारण उत्तरेकडून त्यांना सारखी मदत येत होती. उलटपक्षी श्रीमुखाचें बल वार्धक्यामुळे कमी होऊं लागलें. सम्राट विक्रमादित्यानंतर अवंतीच्या

सिंहासनावर आरूढ झालेले चंडमहासेन पित्याप्रमाणे अद्‌भुत पराक्रमी नव्हते व त्यांचा पुत्र आदित्यसेन यांत विक्रमादित्याचा विक्रम तेवढा नव्हता. त्यामुळे श्रीमुखाला उत्तरेकडून किंवा पूर्वेकडून सहाय्य येईनासे झालें.

अशा परिस्थितींत जें व्हावयाचें तेंच अखेर घडून आलें. शक लोकांनी राजा श्रीमुखाचा पराभव केला व त्याच्या राजधानीची धुळधाण केली. ख्रिस्तोत्तर १६ सालीं राजा श्रीमुखाला रणांगणांत शकांशी लढतां लढतां वीर मृत्यु आला. त्याची आवडती राणी व विक्रमादित्य महाराजांची कन्या श्री त्या रणधुमाळींत मारली गेली. सर्व राजकुटुंबाची वाताहात झाली.

महाराष्ट्रांत शकांची राजवट चालूं झाली. त्यांचा सर्वत्र जम बसला नसेल पण त्यांचा दरारा मात्र सर्वांना जाणवूं लागला. सौराष्ट्रापासून तों प्रतिष्ठानपर्यंत शकांची लहान लहान संघराज्यें अनेक ठिकाणीं प्रस्थापित झालीं. जुन्नर व प्रतिष्ठान येथील शकराज्यें प्रबळ होतीं.

शक हिंदु लोकांच्या शतवार्षिक सहवासाने थोडेबहुत सुधारून माणसांत आले. त्यांच्यांत विवाह व तदंगभूत कुटुंबसंस्थेचा प्रारंभ झाला. त्यांच्या स्वैरतेला व व्यभिचाराला धार्मिक बंधन घातलें गेलें. त्यांच्या अनाचाराला धार्मिक स्वरूप प्राप्त झालें.

राजा विक्रमादित्याच्या पराक्रमाचा सारांश सांगतांना विशेष अद्‌भुत असें कांहीं भासत नाही. मौर्य साम्राटांच्या राजवटींत निस्तेज झालेल्या आंध्रवंशाने विक्रमादित्याच्या नेतृत्वाखाली आपलें डोकें उंच केलें, शकांचा पराभव केला व निर्बल बनलेल्या मगधाधिपतीचा पराजय करून स्वतःस सम्राट म्हणवून घेतलें. प्राचीन इतिहासांत अशा अनेक सम्राटांचीं उदाहरणें आढळतात. परंतु कांही व्यक्तींचें व्यक्तिमत्व इतकें अवर्णनीय प्रभावशाली असतें कीं जग त्यांना विसरूं शकत नाही. केवळ त्यांच्या चरित्रवाचनाने

त्यांचा मोठेपणा प्रत्ययास फारसा येत नाही. परंतु त्यांचें प्रत्यक्ष जीवन ज्या पिढीस पहावयास मिळतें त्यांच्या मनावर त्यांच्या उदात्त महनीयतेचा ठसा उमटतो व त्या प्रत्ययीभूत भावना वंशपरंपरेने समाजांत नांदत असतात. त्यांना चिरंजीवन लाभतें.

विक्रमादित्य ही प्राचीन भारतांतील अशीच महान विभूति होऊन गेली. अनेक अद्भुत रम्य कथा त्यांच्या चरित्राभोंती कालाच्या अनंत ओघांत गुंफल्या गेल्या आहेत. पुराणें व बृहत्कथा त्यांची स्तुतीस्तोत्रें गातात, कवि त्यांचा जयजयकार करतात व धर्मज्ञ त्यांना दैवी पुरुष लेखतात.

त्यांच्या विभूतितेजाच्या प्रकाशाने राजा श्रीमुखालाहि मोठेपणा प्राप्त झाला. मध्य दक्षिणापथांत भोज, अश्मक, क्रथकैशिक अशीं अनेक राजकुलें त्यांपूर्वी प्रसिद्धीस आलीं व त्यांनी अचाट पराक्रमहि केला. राजा श्रीमुख हा एका नव्या राजवंशाचा संस्थापक समजला गेला. परंतु अनेक ठिकाणीं श्रीमुखाच्या पराक्रमाची व त्याच्या वंशजांच्या थोरवीची शब्दचित्रें अगत्यपूर्वक रेखाटलीं गेलीं आहेत. कोणाचीहि विशेष स्तुती करावयाची झाल्यास तो विक्रमादित्याच्या दरबारांतील एक प्रसिद्ध कर्ता पुरुष होता, अशी प्रशस्ती त्यास देण्यांत येई. विक्रमादित्याच्या दरबारांत सामान्य पुरुषांना वाव कसा मिळणार ? असामान्य कवि, वीर, पंडित, धर्मज्ञ, शास्त्रज्ञ, गवई, चित्रकार, शिल्पज्ञ यांच्या योगें विक्रमादित्याची राजसभा सजली होती व त्यामुळे ते सर्व अमरकीर्ति झाले! राजा विक्रमादित्याच्या अनेक कथा कालांतराने भोज राजाला जाऊन चिकटल्या. कारण विक्रमादित्य कैलासवासी झाला असला तरी त्या रम्य कथा चिरंजीव झाल्या होत्या आणि त्या कोणत्या तरी सुप्रसिद्ध राजपुरुषाचा आधार नित्य शोधत असत.

---

# ३

# पुरुष-पर्व

## ( पराक्रम कांड )

# ११

## संपूर्ण जीवन–

पुरुष–प्रकृतीचा संघर्ष म्हणजेच संसार ! मग तो व्यक्तीचा असो कीं राष्ट्राचा प्रपंच असो.

महापुरुष आपल्या कार्याला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण करतो कीं अनुकूल परिस्थितीमुळे महापुरुष निर्माण होतो ही समस्या कोणीच सोडवूं शकत नाही.

प्रकृतीबरोबर वहात जाणें हा मानवी स्वभावधर्म होय. या दृष्टीने बहुजन समाजास प्रवाहपतित लेखण्यांत येते. परंतु प्रकृतीविरुद्ध जो चिकाटीने सतत झगडतो व तिजवर विजय मिळवितो त्यास अवतारी पुरुष मानतात.

संसारास ब्रम्ह–माया–वाद् देखील म्हणतां येईल.

परिस्थितीच्या मायावी आवरणाची छकलें उडवून पुरुषाचा पराक्रमी व स्वत्वदर्शक आत्मा तेजाने झळकूं लागला कीं लोक त्याच्या [illegible]

वंदन करतात. प्रत्येक मनुष्य तसें पाहूं जातां परमेश्वरस्वरूपी ब्रम्हाचा अंश आहे. पण परमेश्वरी प्रत्यय प्रत्येकास थोडाच येतो ?

माया ज्याच्या चरणाची दासी तो महापुरुष. जो मायेचे चरण चुरण्यांत गुंग असतो तो सामान्य मानव.

संचित ही दैवी देणगी, पराक्रम हा मानवी पुरुषार्थ ! यालाच क्रियमाण ही संज्ञा आहे. प्रारब्ध पूर्वार्जित ! तें कोणास बदलतां येत नाही. त्याच्या आधारावर प्रत्येकास उभे रहावे लागते. त्या पायरीवरूनच जीवनाचा नवा प्रवाह सुरू होतो. पुरुषार्थ व पराक्रम यांनी नव्या प्रवाहाला वळण लागतें. प्रारब्ध ही गंगोत्री ! निश्चल व शीत ! परंतु गंगा नदीचा पवित्र व प्रबल प्रवाह भगीरथाच्या प्रयत्नाने निर्माण झाला. त्या गंगेच्या मधुर जीवनामुळे भारतभूमि सुवर्णभूमि झाली.

प्रारब्ध कपाळावर कोरलें असतें. पराक्रम मात्र आपल्या मुठींत समावलेला असतो. पहिलें अचल तर दुसरें चपल ! पहिलें अक्षर तर दुसरें जीवन !

प्रारब्ध म्हणजे देवाची करणी व नारळांत पाणी ! परंतु मनुष्य तो नारळ फोडतो, आंतील खोबरें किसतो, त्यांत साखर मिसळतो व त्या गोड खिरापतीचा नैवेद्य देवाला दाखवून नंतर इष्टमित्रांसह तिचें सेवन करतो व कृतार्थ होतो.

प्रारब्ध देह तर पराक्रम त्यांतील आत्मा होय.

प्रारब्ध हा पहाड तर त्यांतून झुळझुळ वाहणारा मधुर जलाचा झरा हा पराक्रम होय.

प्रारब्ध अधिक पराक्रम म्हणजे संपूर्ण जीवन.

---

# १२

## मातृसावर्ण्य-

" गुरुदेव, या लाजीरवाण्या जीवनाचा शेवट करावासा वाटतो. मी जन्मतःच मेलो असतो तर बरें झालें असतें. विद्या व पराक्रम यांची महती आतां काय उरली ? "

" वत्सा शक्ती, दुःखाने तुझें भान हरपलेलें दिसतें. तुला आपलें पूर्ववृत्त कळून चुकलें. मीच तुला तें सांगितलें असतें, पण मला शंका आली कीं कदाचित् माझ्या सांगण्यावर तुझा विश्वास बसणार नाही. म्हणून राजनंदिनीच्या प्रत्यक्ष मुखाने मी तुला तें ऐकविलें. पूर्ववैभवाची दिव्य स्मृति जागृत झाल्यामुळे राजनंदिनीला अनिवार दुःख झालें. पण ती दुःखद घटना मी पत्करली. तुला आपलें पूर्ववैभव पराक्रमाने मिळविलें पाहिजे. विद्येचें महत्व तुला पटलें पाहिजे. तुझें थोर कुल—"

" निबाप्याचें थोर कुल ? शक राक्षसांच्या स्वैर व्यभिचारापासून माझा जन्म झाला. दुराचाराचें फळ म्हणजे उकीरड्यावर फेकलेलें बीज."

" पण उकीरड्यांतील खताने त्या बीजाचा मोठा वृक्ष होतो व त्याला भरदार फुलेंफळें लागतात. माळी कुशल मात्र असला पाहिजे. अग्नीने घराला आग लावतां येतें व यज्ञसिद्धताहि करतां येते. योजक दुर्लभ असला तरी शोध केला म्हणजे सापडतो. तुझें थोर कुल-"

"माझें ? या कर्णाचें ? या कानीन पुत्राचें ?"

"होय ! तुझेंच ! तूं श्रीमुख राजाचा पौत्र आहेस व महाराजाधिराज विक्रमादित्याचा प्रपौत्र आहेस ! ही तर गोष्ट खरी आहे ना ? तुझा पिता कोणीहि असेल ? आपल्याला त्याची खंती बाळगण्याचें कारण काय ? राजनंदिनी शक्तिमतीचा तूं पुत्र आहेस, श्रीमुखाचा पौत्र आहेस व विक्रमादित्याचा प्रपौत्र आहेस, हें एकवार नव्हे तर त्रिवार सत्य आहे. भारत वर्षांत पितृसावर्ण्यापेक्षा मातृसावर्ण्याचा प्रघात प्रबल आहे. अति दक्षिणेस तर पित्याला कोणी विचारीत नाही. तिकडे मातेवरून मुलाच्या कुलाची थोरवी ठरविली जाते. मातृवंशाकडून तिकडे वारसा वहात असतो."

"गुरुदेव, तुम्ही म्हणतां तें खरें असलें तरी माझ्या मातेच्या पूर्वचरित्रामुळे मला नेहमी लज्जेने खाली मान घालावी लागेल ! त्यांत माझ्या मातेचा काडीमात्र दोष नाही हें मी जाणतो. उलट त्या बिकट परिस्थितीला तिने ज्या विलक्षण मनोधैर्याने तोंड दिलें व माझें प्रेमाने लालनपालन पोषण केलें आणि आपलें हरपलेलें स्वातंत्र्य परत मिळविलें, त्यामुळे मला माझी अभागिनी माता अति पूज्य देवता वाटत आहे. परंतु जगाला तसें थोडेंच वाटणार ? तिच्यामुळे मला व माझ्यामुळे तिला समाजांत लज्जेने खाली मान घालावी लागणार ! यापेक्षा मृत्यु—"

"वत्सा, जग देखील तिला देवता म्हणूनच ओळखील. मनाला झालेला विटाळ देहाला लागतो. परंतु देह यदाकदाचित् भ्रष्ट झाला तरी जोंपर्यंत आत्मा शुद्ध व पवित्र आहे तोंपर्यंत देहाचें पाप मनाला लागत नाही. नदीच्या उगमापाशी घाण साचली तर ती मुखापर्यंत पसरते. परंतु नदीच्या मुखाजवळ एखाद्या मूर्खाने विष्टा फेकली तरी नदीचें पावित्र्य त्या योगें कलंकित होत नाही. देवी शक्तिमति ही शकांची कालिका नव्हे, ती हिंदूंची आदिमाता अंबिका सदैव गणली जाईल."

---

# १३

## महायात्रा-

शक्तिकर्ण आपल्या गुरुदेवा बरोबर यात्रेला निघाला. ज्या दिवशीं रात्रीं त्याला आपलें जन्मरहस्य मातेच्या मुखाने कळलें त्याच रात्रीं त्यांनी वाकण ग्राम सोडलें. शक्तीने आपल्या मातेचा निरोप घेतला व महाबाहूला वंदन केलें आणि त्याचा व मातामहीचा आशीर्वाद शिरीं धारण केला. त्या नंतर गुरुदेव वाकण ग्रामांत एक घटिकाहि थांबावयास तयार नव्हते व शक्तिकर्णाला सोडून जाण्याचीहि त्यांची इच्छा नव्हती. आणि शक्तिकर्णाने तर मनाशी अशी प्रतिज्ञा केली होती कीं गुरुच्या पुढे सदैव माझें पाऊल पडेल.

वाकणांत कांही काम नसतांना वर्षानुवर्ष तेथे रमणारे गुरुदेव त्या रात्रीं झालेल्या राजनंदिनीच्या भेटीनंतर एक घटिका देखील आपला

मुक्काम तेथे वादविण्यास तयार नव्हते. त्यांचा आंतला आवाज जशी स्फूर्ति देईल तसे ते वागत असत. इतरांना त्यांत विक्षीप्तपणा वाटला तरी संत महात्म्यांना त्याची काय पर्वा वाटणार? त्यांच्या बाबतींत 'मनःपूतं समाचरेत' हें वचन शब्दार्थाने लागूं पडतें, वाच्यार्थाचा दोष त्यांच्या वर्तनाला लागत नाही.

गुरु शिष्यांनी उत्तरेची वाट धरली. कारण गोदावरींत ते नित्य स्नान करत असल्यामुळे ती त्यांच्या पूर्ण परिचयाची झाली होती. स्नानाच्या आन्हिक मंत्रांतील—

गंगेच यमुने चैव गोदावरी सरस्वती ।
नर्मदा सिंधु कावेरी जलेस्मिन सन्निधं कुरु ॥

कावेरी सोडून बाकीच्या सर्व पवित्र सरिता उत्तरेलाच होत्या. मोक्षदायिका—

अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैते मोक्षदायिका ॥

अशा सात पवित्र नगरींपैकी कांची सोडून सर्व उत्तरेसच होत्या. आणि भारतवर्षाचें सदैव रक्षण करणारा हिमाच्छादित शुभ्र शिराचा हिमालय ऋषी तर उतरेलाचा अनादि कालापासून तपश्चर्या करीत बसला होता. त्या महर्षीला वंदन करून त्याचा आशीर्वाद घेतल्याशिवाय कोणतीहि मनकामना पूर्ण कशी व्हावी?

वाटेने जातां जातां वरदा नदीने 'मनोवांछित सफल होईल' असा त्यांना वर दिला. वहिणगंगेने आपल्या वडील बहीणीला त्यांच्या बरोबर संदेश पाठविला व त्यांचें कुशल चिंतिलें. तापी नदीच्या कांठावर शकांनीं केलेले अत्याचार ऐकून ते तप्त झाले. परंतु शकांच्या तापाने सातपुड्याच्या

गुहांत लपून बसलेल्या साध्या भोळ्या वराहपूजक गोंडांनी प्रेमाने त्यांचें स्वागत केलें. लांबलचक साध्या बांबूला लहानसें लोखंडी पातें लावून त्याच्या जोरावर क्रूर व्याघ्रसिंहाची शिकार करणाऱ्या शूर गोंडांचें त्यांना फार कौतुक वाटलें. नर्मदेकाठच्या विंध्याद्रीच्या वनप्रदेशीं राहणाऱ्या भिल्लांनाहि हें गोंडांचें कळकाचें हत्यार अवगत होतें. गुरुशिष्यांनी आपल्या हातांतील उंच कुबड्यांना तीं लोखंडी पातीं बसवून घेतलीं. भिल्लांच्या स्नेहस्मरणार्थ त्यांनी त्या नव्या हत्यारांचे भाले असें नामकरण केलें. किती सुलभ, स्वस्त, सहज व सबळ हत्यार होतें तें ! तलवारीपेक्षा व परशूपेक्षाहि त्याची पोंच दूरवर व मर्मग्राही होई. श्रीरामचंद्र प्रभूची धनुर्विद्या भाबड्या भिल्लांनी केवळ भारतवर्षांत जीवंत ठेवली हें पाहून त्यांच्या मनांत भिल्लाविषयीं आदरभाव उत्पन्न झाला. कंटकांना देखील अमरपद देणारें दुर्गम नर्मदेचें उगम स्थान त्यांना अत्यंत रमणीय वाटलें. तेथूनच शोणभद्रनदाचाहि उगम झालेला दिसत होता. त्यांत स्नान केल्याने त्यांच्या शरीरांतील शोण भद्र होऊन त्यांचें समाधान झालें. नर्मदा नदीची आनंदमय क्रीडा त्यांनी अवलोकन केली व तिच्यासह ते लंपडाव खेळले. हत्ती वयांत आला म्हणजे त्याला यौवनमद चढतो, त्याप्रमाणे नर्मदेंत स्नान केल्यावर त्या नर-नारायणांना पराक्रममद चढला. ओंकारेश्वराच्या दर्शनाने श्रुतींचें मूळरूप ॐ त्यांना प्रतीत झालें. क्षिप्रा नदीने त्यांना वेगाची महती पटविली. त्या वेगवान नदींत न डगमगतां संथपणें पोहणाऱ्या कासवांनी त्यांना निश्चल धैर्याची भूमिका समजावून दिली. काळावर विजय संपादन करण्याचा महान मंत्र महाकाळाने त्यांच्या कानांत सांगितला. अवंतीने स्वसंरक्षणाचें गुप्त तंत्र त्यांना शिकविलें. अयोध्येला रामचरित्राची व मथुरेस कृष्ण-चरित्राचीं पारायणें त्यांना अनायासे करतां आली. प्रयागास त्रिवेणी संगमाचें महात्म्य त्यांना कळून आलें. श्रद्धा, महत्वाकांक्षा व पराक्रम ज्योति यांची त्रिवेणी गुंफली तर ती काळाला अजिंक्य होईल असें त्यांना पटलें.

त्यांनी गंगा-यमुना-सरस्वतींच्या त्रिवेणी संगमांत प्रयाग क्षेत्रीं स्नान केलें. सरस्वती प्रमाणेच त्यांची पराक्रम ज्योतिहि तेव्हां गुप्त होती. गंगा-यमुना जला प्रमाणे श्रद्धा व महत्वाकांक्षा या भावना त्यांच्या रोमरोमांतून सळसळत होत्या. काशीच्या विश्वेश्वराने सूर्याचें तेज त्यांच्या ठायीं निर्माण केलें. ऋषीमुनी आपल्या तपस्येने ब्रम्हाभोवती असणाऱ्या मायेच्या कवचाचा कसा भेद करतात हें त्यांना मायावतीस अवगत झालें. पंच महानद्यांनी पवित्र झालेली वेदांची जन्मभूमि त्यांनी सानंद व सादर अवलोकन केली. त्या दर्शनाने त्यांच्या श्रुती पावन झाल्या व निद्रिस्त स्मृती जागृत झाल्या. अखेर त्यांनी सिंधुनदींत स्नान करून महायात्रेची सांगता केली. सिंधु नदीने भारताला व भारतीयांना पूर्वी कधीच अटक केली नाही. ती अटक कोत्या भेकड मनाला तेवढी वाटे व भित्यापाठी तर ब्रम्हराक्षस लागतो. सिंधु नदीच्या दोन्ही तीरावर भारताचा विस्तार झाला होता व वैदिक ऋचांचे घोष तेथे नित्य ऐकूं येत असत. बुद्धाचे विहार सिंधू नदीच्या अलीकडे व पलीकडेहि विस्तारून थाटले होते.

त्यांची तीर्थयात्रा संपली व भारताची वायव्य सीमा त्यांनी गाठली. प्राचीन काळापासून हेंच भारतप्रवेशाचें महाद्वार समजलें जातें. खर्वट घाटानेच परकीय भारतांत प्रवेश करीत असत.

# १४

## कंटकेनैव कंटकम्-

प्रवास हें पाठशालेपेक्षा ज्ञानाचें सुलभ व प्रभावी साधन आहे.

प्रखर पांडित्य तर्कशास्त्राध्ययनापेक्षा तीर्थाटणामुळे अंगीं येतें व बाणतें.

तीर्थयात्रेंत नाना प्रकारचे लोक भेटतात व नानातऱ्हेचे अनुभव येतात. माणसाची समयसूचकता अशा प्रसंगीं कसोटीस लागते.

संचाराने शक्तीची परीक्षा होते व संयमाची पारख होते.

प्रवास ही पांडिती व पुस्तकी ज्ञानाची प्रयोगाशाला होय. पाठशाळेंत मिळविलेलें ज्ञानरूपी शस्त्र प्रवासरूपी प्रस्तरावर घासून पुसून पाजळून तीक्ष्ण होतें.

शक्तिकर्णाचें तीर्थाटण तीन वर्षें चालूं होतें. त्याला देशकाल परिस्थितीचें सम्यक ज्ञान प्राप्त झालें, जिवास जीव देणारे मित्र व अनुयायी मिळाले आणि शत्रूंचें यथातथ्य रूप कळून आले.

शकांचा धांगडधिंगा नगरांत वाढत्या प्रमाणावर चालूं होता. मात्र त्यांची मूळची पशुवृत्ति हिंदु-धर्माच्या चौकटींत बसल्यामुळे मर्यादित झालेली दिसत होती. ग्रामीण जीवनांत मात्र कांहींच फरक पडला नव्हता. शहरांत शकांचें राज्य होतें पण खेड्यापाड्यांत पूर्वीप्रमाणेच जुनी हिंदु राजवट चालूं होती. खेडवळ भोळे, धर्मनिष्ठ, सरळ व उद्योगी होते. शहरी छक्केपंजे त्यांना कळत नव्हते व जरतारी दांभिक रीति त्यांना माहीत झाली नव्हती.

हिंदु, बुद्ध व जैन धर्म शेजारीं शेजारीं गुण्यागोविंदाने नांदत होते. हिंदुधर्मी राजा बुद्ध विहारांना देणग्या देई आणि बुद्धधर्मी नृप हिंदूंच्या देवळांचे सभामंडप बांधून देत असे. या तिन्ही धर्मांचा आपोआप समन्वय चालूं होता. जणूं हे तीन धर्म म्हणजे दत्ताची त्रिमुखी मूर्ति!

वायव्य सरहद्द प्रांतांत इराणांतर्गत शुद्ध पार्थीयन लोकांचें राज्य चालूं होते. शक, यवन, कुशान व पल्लव यांच्या भारतावर वायव्येकडून सारख्या स्वाऱ्या चालूं होत्या. त्यामुळे या सर्व परकीयांत आपापसांत स्पर्धा व असूया उत्पन्न झाली होती. यांपैकीं शक अत्यंत प्रबल, क्रूर व अनाचारी होते आणि म्हणून त्यांचेंच हिंदूंना विशेष भय वाटत होतें. मात्र एकीकडून यवन, कुशान व पल्लव आणि दुसरीकडून आंध्र, कलिंग व आंध्रभृत्य यांच्या कैचींत शक सापडले होते. या कर्तरी योगामुळे त्यांचें सामर्थ्य इरेस पडलें होतें. तें ऐन मोक्यावर वांझोटें ठरत असे. या दुहेरी विरोधामुळेच शकांना सर्व गोष्टी अनुकूल असूनहि त्यांचें भारतांत साम्राज्य स्थापन होऊं शकलें नाही. त्यांनी सरासरी तीनशें वर्षें पराक्रमाची पराकाष्टा करून पाहिली पण ती सर्व फुकट गेली.

पुरुषपूर येथे त्यावेळी गंडोफेरव हा पल्लव राजा राज्य करीत होता. शकांच्या समान शत्रुत्व भावामुळे शक्तिकर्णाचा तेथील दरबारांत सहज प्रवेश झाला. पुरुषपूरच्या सैन्यांत तो दाखल झाला.

वायव्य सरहद्द प्रांतांत लष्करी अनुभवांना काय तोटा! तेथे एकसारखी हाणमार चालूं असे. हिंदी व परदेशी यांचा लष्करी आट्या-पाट्याचा खेळ तेथे सतत चालूं असे. शक्तिकर्णाने त्याला आलेल्या लष्करी अनुभवाच्या जोरावर आपल्या मनाशी तीन सिद्धांत ठरवून ठाम केले.

१. शहरी सुधारलेल्या लोकांपेक्षा ग्रामीण लोक अधिक सशक्त असतात आणि ग्रामीण लोकांपेक्षाहि जंगली व पहाडी लोक अधिक शूर व काटक असतात.

२. ज्यांच्या हातीं लांब पल्लेदार शस्त्र असतें ते लोक आखूड शस्त्रधारी लोकांचा सहज पराभव करतात. त्यामुळे जांबियापेक्षा परशू, परशूपेक्षा तलवार, तलवारीपेक्षा भाला व भाल्यापेक्षाहि धनुर्बाण अधिक प्रभावी ठरतो.

३. वेगाच्या हालचालींनी विजय लवकर प्राप्त होतो. त्यामुळे पदाती फौजेपेक्षा घोडेस्वारांचें पथक लवकर विजय संपादन करतें. घोडेस्वारांच्या बळावर शत्रूंवर अवचित हल्ला करून त्यांची ते तयार नसताना भंबेरी उड-वून देतां येते आणि बाजू दुर्दैवाने अंगावर उलटते असें दिसल्यास युक्तीने रणांगणांतून तात्पुरती माघार घेतां येते व अनुकूल संधी सापडतांच शत्रूवर पुनश्च हल्ला करून त्यांची दाणादाण उडवून देतां येते.

या तीन प्रमुख सिद्धांताशिवाय अनेक उपसिद्धांतहि त्याने आपल्या मनाशीं ठरवून टाकले. (१) शिस्तवार संघटनेचें महत्व त्याला पटलें. शिस्तवार चढाई प्रभावी होऊन शत्रूचा धुवा उडवूं शकते आणि वेळप्रसंगीं शिस्तवार माघार घेतल्याने अडचणींत सापडलेल्या आपल्या सैन्याचें संरक्षण करतां येतें.

(२) उघड समोरासमोर लढाई देण्यापेक्षा शत्रूवर अचानक छापा घालणें आणि तोहि अनपेक्षित अशा रीतीने व दिशेने अधिक फायदेशीर ठरतें. आपल्या हालचाली जितक्या अनपेक्षित व चमत्कारिक तितक्या त्या यशस्वी होण्याचा अधिक संभव असतो. युद्धाची जागा आपण आपल्या मनाशीं प्रथम निश्चित करावी आणि शत्रू त्या अडचणीच्या अवघड प्रदेशीं येई-पर्यंत त्याला चकविण्यासाठी व त्याची दिशाभूल करण्यासाठी आपल्या सैन्याच्या खोट्या वरपांगीच्या हालचाली करून त्याला हुलकावण्या दाखवा-व्यात व त्याला अखेर खिंडींत गाठावें.

(३) आपण ठरविलेल्या रणक्षेत्राच्या विशिष्ट लहानशा भागावर आपलें सर्व सामर्थ्य त्वरेने केंद्रित करावें व तेथे सापडलेल्या शत्रूच्या विषम संख्याबलाचा समूळ नाश करावा व मग तेथे शत्रूंचीं नवीं पथकें येऊन थडकूं लागतांच वेगाने तेथून माघारा पाय घेऊन शत्रूच्या दुसऱ्या दुर्बळ कोपऱ्यावर निकराचा हल्ला करावा. रणक्षेत्राच्या भिन्न भिन्न कोपऱ्यांत आपल्या पथकांचें सवेग केंद्री-करण करणें अत्यंत फायदेशीर होतें. शत्रू जेथे संख्याधिक्यामुळे प्रबल असेल तेथे जरूर पडल्यास माघार घ्यावी, पण लढाई टाळावी. परंतु तो आपल्या मानाने जेथे निर्बल असेल तेथे त्याला गाठून खरपूस चोप द्यावा व त्याला माघार घेऊं देऊं नये.

(४) बगलेच्या बाजूने किंवा लपतछपत पिछाडी गाठून शत्रूची कोंडी प्रथम करावी मग त्यास समस्त बुडवावा. तो कोंडींत सापडला असतां त्याच्यावर दयामाया बुद्धि दाखविणें लष्करी दृष्ट्या घातक ठरतें. शत्रू बिनशर्त शरण आला पाहिजे किंवा ठार झाला पाहिजे. शत्रूला पूर्णपणें निःशस्त्र करून बंदींत टाकले पाहिजे. त्याशिवाय सेनापतीला मनस्वास्थ्य लाभणार नाहीं.

(५) शत्रूचा मुलुख जाळपोळ करून उध्वस्त करून टाकावा. इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या मुलखांतून दुर्दैवाने माघार घेण्याचा

प्रसंग ओढवला तरी देखील हेंच जाळपोळीचें धोरण अमलांत आणावें व घरेंदारें, कारखाने व उभी पिकें भस्म करावीं. म्हणजे शत्रूला पादाक्रांत केलेल्या प्रदेशाचा लवमात्र फायदा होत नाही.

सारांश युद्ध म्हणजे प्राण व वित्त यांचा सर्वनाश होय. तो ज्याला अधिक साधेल तो सेनापति विजयी होईल. आपली हानी टाळावयाची व शत्रू भरडून काढावयाचा आणि शिवाय नागवावयाचा !

शक्तिकर्ण सहा वर्षें गंडोफेरवाच्या पदरीं होता. तेवढ्या काळांत तो आपल्या गुणांनी चढत चढत पल्लव शिपायांचा सेनापति झाला. दरबारांत त्याचें वजन वाढलें. गंडोफेरवाचा तो उजवा हात समजला जाऊं लागला.

पल्लव शिपायांची त्याने नमुनेदार संघटना केली. गंडोफेरवाचें सैन्य सुसज्ज व शिस्तप्रिय बनलें. शक्तिकर्णासारखा नेता लाभल्यामुळे गंडोफेरवाच्या राज्याच्या मर्यादा विस्तार पावूं लागल्या. पंचनद्यांचा प्रांत त्याच्या ताब्यांत आला व गंगा–यमुनांकित प्रदेशापर्यंत त्यांच्या प्रसंगोपात स्वाऱ्या चालूं झाल्या. सैंधव व सिंधुक प्रांतांत पल्लवांचा अंमल चालूं झाला.

तक्षशीला येथील शकांचें राज्य सेनापति शक्तिकर्णाने बुडविलें व तें पल्लव राज्यांत सामील करून घेतलें. मथुरा येथील प्रबल शकराज्यावर शक्तिकर्णाने स्वारी करून शकांच्या सत्तेला मोठाच शह दिला. शकांच्याच युक्त्या योजून तो त्यांचा डाव त्यांच्यावर उलटवी. त्यांच्या शहास हा काटशह देई. घोड्याबरोबरच खेचरें व रथ यांचा समरभूमीवर शक्तिकर्ण उपयोग करूं लागल्यामुळे त्याच्या सैन्याची हालचाल जलद गतीने होऊं लागली व शकांचा ठिकठिकाणीं पराभव होऊं लागला. शकांचा डाव त्यांच्या आंगलट आला.

गुरुची विद्या गुरुलाच फळली ! फाशांचें दान उलटें पडलें !

---

(२) उघड समोरासमोर लढाई देण्यापेक्षा शत्रूवर अचानक छापा घालणें आणि तोहि अनपेक्षित अशा रीतीने व दिशेने अधिक फायदेशीर ठरतें. आपल्या हालचाली जितक्या अनपेक्षित व चमत्कारिक तितक्या त्या यशस्वी होण्याचा अधिक संभव असतो. युद्धाची जागा आपण आपल्या मनाशीं प्रथम निश्चित करावी आणि शत्रू त्या अडचणीच्या अवघड प्रदेशीं येई-पर्यंत त्याला चकविण्यासाठी व त्याची दिशाभूल करण्यासाठी आपल्या सैन्याच्या खोट्या वरपांगीच्या हालचाली करून त्याला हुलकावण्या दाखवा-व्यात व त्याला अखेर खिंडींत गाठावें.

(३) आपण ठरविलेल्या रणक्षेत्राच्या विशिष्ट लहानशा भागावर आपलें सर्व सामर्थ्य त्वरेने केंद्रित करावें व तेथे सापडलेल्या शत्रूच्या विषम संख्याबलाचा समूळ नाश करावा व मग तेथे शत्रूंचीं नवीं पथकें येऊन थडकूं लागतांच वेगाने तेथून माघारा पाय घेऊन शत्रूच्या दुसऱ्या दुर्बळ कोपऱ्यावर निकराचा हल्ला करावा. रणक्षेत्राच्या भिन्न भिन्न कोपऱ्यांत आपल्या पथकांचें सवेग केंद्री-करण करणें अत्यंत फायदेशीर होतें. शत्रू जेथे संख्याधिक्यामुळे प्रबळ असेल तेथे जरूर पडल्यास माघार घ्यावी, पण लढाई टाळावी. परंतु तो आपल्या मानाने जेथे निर्बळ असेल तेथे त्याला गाठून खरपूस चोप द्यावा व त्याला माघार घेऊं देऊं नये.

(४) बगलेच्या बाजूने किंवा लपतछपत पिछाडी गाठून शत्रूची कोंडी प्रथम करावी मग त्यास समस्त बुडवावा. तो कोंडींत सापडला असतां त्याच्यावर दयामाया बुद्धि दाखविणें लष्करी दृष्टीचा घातक ठरतें. शत्रू बिनशर्त शरण आला पाहिजे किंवा ठार झाला पाहिजे. शत्रूला पूर्णपणें निःशस्त्र करून बंदींत टाकले पाहिजे. त्याशिवाय सेनापतीला मनस्वास्थ्य लाभणार नाहीं.

(५) शत्रूचा मुलुख जाळपोळ करून उध्वस्त करून टाकावा. इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या मुलखांतून दुर्दैवाने माघार घेण्याचा

प्रसंग ओढवला तरी देखील हेंच जाळपोळीचें धोरण अमलांत आणावें व घरेंदारें, कारखाने व उभी पिकें भस्म करावीं. म्हणजे शत्रूला पादाक्रांत केलेल्या प्रदेशाचा लवमात्र फायदा होत नाही.

सारांश युद्ध म्हणजे प्राण व वित्त यांचा सर्वनाश होय. तो ज्याला अधिक साधेल तो सेनापति विजयी होईल. आपली हानी टाळावयाची व शत्रू भरडून काढावयाचा आणि शिवाय नागवावयाचा !

शक्तिकर्ण सहा वर्षें गंडोफेरवाच्या पदरीं होता. तेवढ्या काळांत तो आपल्या गुणांनी चढत चढत पल्लव शिपायांचा सेनापति झाला. दरबारांत त्याचें वजन वाढलें. गंडोफेरवाचा तो उजवा हात समजला जाऊं लागला.

पल्लव शिपायांची त्याने नमुनेदार संघटना केली. गंडोफेरवाचें सैन्य सुसज्ज व शिस्तप्रिय बनलें. शक्तिकर्णासारखा नेता लाभल्यामुळे गंडोफेरवाच्या राज्याच्या मर्यादा विस्तार पावूं लागल्या. पंचनद्यांचा प्रांत त्याच्या ताब्यांत आला व गंगा–यमुनांकित प्रदेशापर्यंत त्यांच्या प्रसंगोपात स्वाऱ्या चालूं झाल्या. सैंधव व सिंधुक प्रांतांत पल्लवांचा अंमल चालूं झाला.

तक्षशीला येथील शकांचें राज्य सेनापति शक्तिकर्णाने बुडविलें व तें पल्लव राज्यांत सामील करून घेतलें. मथुरा येथील प्रबल शकराज्यावर शक्तिकर्णाने स्वारी करून शकांच्या सत्तेला मोठाच शह दिला. शकांच्याच युक्त्या योजून तो त्यांचा डाव त्यांच्यावर उलटवी. त्यांच्या शहास हा काटशह देई. घोड्याबरोबरच खेचरें व रथ यांचा समरभूमीवर शक्तिकर्ण उपयोग करूं लागल्यामुळे त्याच्या सैन्याची हालचाल जलद गतीने होऊं लागली व शकांचा ठिकठिकाणीं पराभव होऊं लागला. शकांचा डाव त्यांच्या आंगलट आला.

गुरुची विद्या गुरुलाच फळली ! फाशांचें दान उलटें पडलें !

---

# १५

## संत तमसाचार्यांची भेट-

हिंदुस्थानापासून फार दूर असलेल्या जरूसलेम शहराहून तमसाचार्य नांवाच्या साधूने पुरुषपूरला भेट दिली. प्राचीन काळीं इराणी–तुराणी व मिसरी लोकांमार्फत हिंदु लोकांचा ग्रीक व रोमन लोकांशीं संबंध आला होता. अलिकसुंदराच्या स्वारीनंतर तो संबंध दृढ झाला. सेल्यूकसाच्या पराभवानंतर पूर्व–पश्चिमेंत ज्ञानाची व मालाची देवाण घेवाण चालूं झाली. ज्ञान भिक्षूंमार्फत व मालाची आवकजावक व्यापाऱ्यांतर्फे होई. धर्मप्रसारार्थ हिंदुस्थानांतून बौद्ध भिक्षू जसे परदेशांत जात असत त्याप्रमाणेच तमसाचार्यानें भारतवर्षास परत भेट दिली. गंडोफेरवाच्या दरबारांत तमसाचार्यांचा मोठा सन्मान करण्यांत आला. विद्वत्ता व साधुवृत्ति सर्वत्र पूज्य मानल्या जातात.

येशू नांवाचा अवतारी देवपुत्र जरूसलेम येथे एका नव्या धर्माचा उपदेश करूं लागला होता. त्या नव्या धर्माचें नांव ख्रिस्ती धर्म असें पडलें व येशूला सर्व जनता ख्रिस्त म्हणजे जगाला तारक असा देवदूत मानूं लागली. स्वस्तिकासमान क्रॉस हें त्या धर्माचें प्रतीक समजलें जाई. या धर्माची तत्त्वें बुद्ध व जैन धर्मांतून घेतल्यासारखी दिसत होतीं. अपकाराची फेड उपकाराने करावी. शत्रूने आपल्या एका गालावर थप्पड मारली तर आपण दुसरा गाल त्याच्या पुढे करावा. परद्रव्यास काष्टवत मानावें. परदारेला माता म्हणून लेखावें. सर्व भूतमात्राविषयीं समभाव धारण करावा. अशा उदात्त तत्वांची शिकवण हा नवा धर्म देत असे.

येशू ख्रिस्ताचे जे प्रमुख बारा शिष्य होते त्यांनी येशूच्या मृत्यूनंतर त्याच्या नव्या धर्माचा प्रसार करण्याचें कंकण हातीं बांधलें. तमसाचार्य हा त्या बारा शिष्यांतच मोडत असे. साधी राहणी व उच्च विचारसरणी या गुणांनी या शिष्यांचा सर्वांवर प्रभाव पडला. लोकांची सेवा करणें हा त्यांचा प्रमुख आचारधर्म मानला जाई. लोकांच्या पापनाशनार्थ स्वतः देहदंड भोगणें, त्यांच्या उद्धारार्थ परमेश्वरास प्रार्थना करणें, त्यांच्यावर सतत निरपेक्ष प्रेम करणें व त्यांची निर्वेतन सेवा करणे, हा येशूचा धर्मसांप्रदाय होता.

पुरुषपूर नगरींत तमसाचार्यांचीं प्रवचनें अत्यंत लोकप्रिय झालीं. परंतु फारच थोड्या लोकांनी त्यांच्या नव्या धर्माची जाहीर दीक्षा घेतली. वृद्ध गंडोफेरव महाराज मात्र तमसाचार्यांचे शिष्य झाले. लवकरच तें पल्लवांचे समग्र राजघराणें धर्माने ख्रिस्ती बनलें. तमसाचार्य राजगुरु झाले.

यानंतर शक्तिकर्णाचें व तमसाचार्यांचें संघटण वाढणें क्रमप्राप्तच होतें. एक राज्याचा सेनापति तर दुसरा धर्मगुरू. शक्तिकर्णाने तमसाचार्यांना स्वाभाविकच त्यांच्या थोर धर्मसंस्थापकाची माहिती विचारली. येशूचें अद्भुत चरित्र ऐकून शक्तिकर्णाच्या अंगावर रोमांच उभे राहिले !

तमसाचार्यांनी शक्तिकर्णास येशूची कथा सांगितलीः—

येशू हा कुमारी मेरीचा मुलगा. मेरीचा विवाह झाला नव्हता. त्या कुमारीपुत्राचें बाळपण नाजारेथ येथील जोसेफ सुताराच्या घरीं गेलें. जोसेफ सुताराने त्याचा व मेरीचा प्रतिपाळ केला.

येशूला उपजतच ईश्वरी ज्ञान प्राप्त झालें. बारावें वर्षी तो आपल्या घरच्या मंडळीसह जरूसलेम शहरीं गेला, तेव्हां त्याने तेथल्या देवळांतील मोठमोठ्या विद्वान पंडितांना वादांत जिंकले.

परंतु इतका विद्वान व धार्मिक असूनहि येशूचा साधेपणा सुटला नाही. तो सुतारकाम करून आपलें व आपल्या आईचें पोषण करी. जोसेफच्या मृत्यूनंतर सर्व संसाराचा भार त्याच्या शिरावर पडला. पण तो डगमगला नाही.

तो तीस वर्षांचा झाला तेव्हां अरण्यांत तपश्चर्या करण्याकरिता निघून गेला. त्याने चाळीस दिवस त्या एकांतवासांत अन्नावाचून काढले व सतत परमेश्वराची प्रार्थना केली. चाळीस दिवसानंतर त्याला आत्मप्रत्यय आला. ‘मी ईश्वराचा पुत्र आहे व ईश्वराचा संदेश मानवांना सांगण्यासाठी मी धरणीवर अवतरलो’ असें तो उघडपणें प्रतिपादन करूं लागला. त्याने अनेक चमत्कार करून आपलें देवपण लोकांना पटविलें. त्याने अनेक दृष्टांत, कथा, अन्योक्ती व उपमा यांच्या द्वारा धर्मोपदेश सुरू केला. पंडितांनी त्याला नाकें मुरडलीं पण सामान्य जनतेच्या हृदयांत त्याची शिकवण बिंबली. ते त्याच्या निशाणाखाली हजारोंनी गोळा होऊं लागलें तो कोणाचा आजार बरा करी तर कोणाच्या वैराण शेतास प्रफुल्ल करी !

सबंध पालेस्ताईन प्रांतांत तो व त्याचे बारा शिष्य लोकांना त्या नव्या धर्माचा उपदेश करीत फिरूं लागले. सर्वत्र धार्मिक क्रांतीची लाट उसळली. लोक त्याला अवतारी पुरुष मानूं लागले! अधिकारी वर्गाला आपली लोकांवरील सत्ता कमी झाली असें वाटूं लागलें. येशूला उपदेश करण्याची

मोकळीक दिली तर लोकांवरील आपलें वजन कमी होईल, अशी भीति त्यांना वाटली.

सत्ता व संपत्ती यांचा मद माणसाला राक्षस बनवितो. त्याचें देवपण हरवतें. पांटिअस पायलेट या न्यायाधिकाऱ्यापुढे येशूची चौकशी चालूं झाली. राजद्रोह व धर्मद्रोहाचा दुहेरी आरोप त्याच्यावर करण्यांत आला. येशूचें टेकडीवरील प्रवचन-लोकांना फारच आवडलें होतें. तेव्हां आपल्या उपदेशाने लोकांत अनाचार माजविण्याचा त्याने प्रयत्न केला, असा आरोप त्याच्यावर लादण्यांत आला. त्याच्याबरोबर दोघा सामान्य खुनी दरोडेखोरांचीहि पांटिअस पायलेट पुढे चौकशी झाली. त्या दरोडेखोरांना पांटिअसने देहान्ताची शिक्षा सुनावली. येशूचा गुन्हा मात्र त्याला फारच भयंकर वाटला. तेव्हां त्याला क्रुसावर खिळ्यांनी ठोकून ठार मारण्याची अघोरी शिक्षा त्या न्यायाधीशाने फर्माविली.

गांवाबाहेरच्या एक उजाड टेकडीवर वधस्तंभ उभारण्यांत आला. एका उभ्या खांबावर वरच्या टोकाजवळ एक आडवी पट्टी जोडण्यांत आली. येशूच्या पायांतून मोठमोठाले खिळे त्या खांबांत ठोकण्यांत आले. त्याच्या हातांतूनहि असेच भरभक्कम खिळे त्या आडव्या लाकडी पट्टींत मारण्यांत आले.

या यमयातना येशूला तीन दिवस सहन कराव्या लागल्या. शरीर खांबाशीं खिळ्यांनी जखडलें गेलेलें, हातापायांतून सारखा रक्तस्राव चालला आहे, वर उन्ह तळपत आहे, तहानेने कंठ कोरडा पडला आहे, प्राणांतिक वेदनांनी जीव कासावीस होत आहे, अशा स्थितींत त्याने तीन दिवस काढले. त्याच्या भक्तांना त्याच्याबद्दल उघड सहानुभूति देखील दाखवितां येईना. त्यांनीं येशूविषयीं किंचित सहानुभूति दर्शविली असती तर ते बिचारे राजद्रोही बंडखोर ठरून तसल्याच कठोर शिक्षेस पात्र झाले असते. त्या अघोरी न्यायाधीशाचाहि त्यांना उघड निषेध करतां येईना.

कारण त्यांनी त्या दुष्ट व नीच न्यायाधीशाविरूद्ध ब्र काढला असतां, तर न्यायाधीशाच्या व न्यायपीठाच्या पावित्र्यविडंबनाचा गुन्हा त्यांच्यावर सहज शाबीत होऊन त्यांना त्याबद्दल कठोर शिक्षा झाली असती. तोंड बांधून वर बुक्यांचा मार! मनांतल्या मनांत ते संतापले, जळफळले व रडले.

त्या थोर धर्मसंस्थापकाचें वर्तन मात्र अत्यंत धीरगंभीर व उदात्त होतें. न्यायालयांत जमलेल्या सर्व प्रेक्षकांना त्याची थोरवी पटली. त्याने शांतपणें त्या सर्व यमयातना सोसल्या. तीन दिवसानंतर त्याचा प्राण त्या नश्वर कुडीला सोडून गेला. लोकांच्या शाश्वत कल्याणासाठी त्याने आपलें बलिदान केलें! तो हुतात्मा अजरामर झाला. ख्रिस्ती लोक त्या हुतात्म्याच्या बलिदानदिनाला शुभ शुक्रवार मानतात.

त्याचा जन्मदिवस नाताळाचा सण म्हणून साजरा करतात.

त्या महात्म्याच्या नांवाने त्याच्या शिष्यांनी त्याच्या जन्म वर्षापासून नवी कालगणना सुरू केली.

ती रोमांचकारी कथा ऐकून सद्गदित स्वराने शक्तिकर्णाने विचारलें, "कुमारीपुत्र कर्ण म्हणून येशूची कोणी हेटाळणी केली नाही?"

तमसाचार्य म्हणाले, "सेनापति, येशू कुमारीपुत्र होता म्हणून जन्मत: पवित्र होता. त्याचें नांव थोर महात्मा म्हणून जगांत गाजत आहे."

"आणि त्याची आई कुमारी मेरी—तिच्याबद्दल लोक काय बोलतात?" अडखळत अडखळत मोठ्या संशयी स्वरांत शक्तिकर्णाने प्रश्न केला.

तमसाचार्य उद्गारले, "पवित्र मातृत्वाची साक्षात प्रेमदेवता म्हणून जग मेरीचीं स्तुतीस्तोत्रें आज गात आहे."

शक्तिकर्णाचें हृदय पुलकित झालें. त्याने प्रश्न केला, "आचार्य, त्या थोर महात्मा येशूचा मृत्यु कधी झाला? तेव्हां त्याचें वय केवढें होतें?"

संत तमसाचार्य म्हणाले, "महात्मा येशू एक तपापूर्वी सदेह स्वर्गास गेला. तो देवाचा पुत्र होता. त्याने मानवांना दैवी संदेश सांगून त्यांचा

निरोप घेतला व तो परत आपल्या पित्याकडे गेला. त्यावेळीं त्याचें इहलोकांतील वय तेहत्तीस चवतीस वर्षांचें असेल. प्रेम, अहिंसा, सत्य व सेवा हे ख्रिस्ती धर्मांचे चार स्तंभ आहेत व त्यावर प्रभूचे दीप सतत प्रकाशत आहेत. या दीपांच्या प्रकाशांत माणसाने आपलें कर्तव्य करीत रहावें, म्हणजे त्याचा उद्धार होईल. ”

शक्तिकर्णाला ती येशूची कथा ऐकून समाधान वाटलें. तो मनाशीं म्हणाला, “आम्ही दोघेहि कुमारीपुत्र ! तो थोरला भाऊ व मी धाकटा. आमच्या जन्मांत व वयांत फारच थोडें अंतर आहे. मग मला त्याच्याप्रमाणे थोर महात्मा होण्यास काय प्रत्यवाय आहे ? माझा जन्म माझ्या थोरवीच्या आड खास येणार नाही. माझ्या मातेची गणना गुरुदेवांनी देवतांत केली तें बरोबरच होतें म्हणावयाचें. त्यांचा निर्णय कधीच चुकीचा ठरणार नाही. येशू व विक्रमादित्याप्रमाणे माझा देखील संवत जगांत कां चालूं नये ? मी विक्रमादित्याचाच प्रपौत्र आहे. त्यांच्याप्रमाणेच शकांचा मी पराभव करीन व भारतावर आलेलें हें राक्षसी संकट दूर करीन. माझ्या पराक्रमाने हिंदु धर्माची पताका आकाशांत डौलाने फडकूं लागेल व हिंदुत्वाच्या नौबती जगभर दुमदुमतील. परंतु प्रथम पराक्रम व नंतर प्रकाश ! ”

---

# १६

## विवाहाची मागणी-

शकांच्या टोळया पराक्रमी असल्या तरी त्या तुटक होत्या. त्यामुळे त्यांच्या विजयांना स्थानिक महत्व तेवढें प्राप्त होई. त्यांचीं ठिकठिकाणीं लहानलहान गणराज्यें स्थापन झालीं. जेत्या टोळीचा नायक त्या चिमुकल्या गणराज्याचा राजा होई. परंतु त्यांच्यांत खरी संघटना नव्हती. त्यामुळे त्यांच्या पृथक पृथक विभागलेल्या विजयी टोळयांचें एकीकरण होऊं शकलें नाही व त्यामुळे शकांचें राष्ट्र बनलें नाही, मग साम्राज्य त्यांच्या हातून कसें स्थापन होणार ?

शिवाय भारतवर्षांतील अनेक राजांशीं त्यांना सतत युद्ध करावें लागलें. शकांच्या चालीरीतींनी हिंदु जनतेच्या मनांत त्यांच्याविषयीं अतो-

नात तिटकारा उत्पन्न झाला होता. आंध्र राजे भारताचे सम्राट झाल्यामुळे शकयुद्धाची जबाबदारी सर्वस्वी त्यांच्यावर पडली. आपल्या मांड-लिकांच्या व प्रजाजनांच्या सहाय्याने त्यांनी आलेल्या प्रसंगाला मोठ्या धैर्याने तोंड दिलें.

आंध्र सम्राटांची सत्ता उत्तरेस मगधांत व माळव्यांत होती खरी, पण ती निर्वेध नव्हती. मथुरा, अवंती, साकेत, भिलसा, उदयपूर अशीं शक सत्तेचीं केंद्रें आंध्र साम्राज्यांत उत्तरेस स्थापन झालीं होतीं. आंध्र साम्राज्य मोडेना व शकांच्या केंद्रांचाहि उच्छेद होईना. शकांची राजसत्ता या विविध नगरींच्या आवती भोवती पसरलेल्या दहापांच योजनांच्या टापूंतच चालत असे. पण हीं हिंदु शरीरांत घुसलेलीं शल्यें सारखी आंतल्याआंत सलत होतीं. त्यामुळे आंध्र-सम्राट पराक्रमी असूनहि हतबुद्ध झाले होते.

भरतखंडाच्या पूर्व भागांत मात्र शकांचा मुळीच प्रवेश होऊं शकला नाहीं. बंग, कलिंग, पांड्य, चेर, चोल हीं राज्यें आंध्र साम्राज्यांत मोडत असलीं तरी स्वयंपूर्ण व अंतर्गत दृष्ट्या स्वतंत्रच होतीं. आंध्र सम्राटांना प्रतिवार्षिक करभार तेवढा ठराविक प्रमाणांत तीं राष्ट्रें देत असत. पूर्व भारत हें हिंदु संस्कृतीचें माहेरघर बनलें होतें आणि त्यांतल्यात्यांत दक्षिणापथांत हिंदूंचें सामर्थ्य फार मोठें होतें. मात्र पश्चिम दक्षिणापथांत उत्तरेइतकीं संख्यापूर्ण नसलीं तरी दहापांच शकांचीं गणराज्यें स्थापन झालीं होतीं. सौराष्ट्रांत तर शकसत्ता फारच प्रबळ झाली होती. शकसत्तेचा नायनाट कसा करावा या विवंचनेंत आंध्र सम्राट पडले होते. आंध्रसत्तेचें केंद्र पुनश्च उत्तरेंतून दक्षिणेंत परत आलें असलें, तरी आंध्र सम्राटांनी उत्तरें-तून सपशेल माघार मात्र घेतली नव्हती. शक्य तेवढा उत्तरेचा प्रदेश त्यांनी आपल्या हातीं राखून परदेशी आक्रमकांशी सतत झुंज चालू ठेवली होती.

आंध्र सम्राटाच्या कानावर हळूहळू अशी वार्ता आली कीं महाराजाधिराज विक्रमादित्याचा मुलीकडून असलेला प्रपौत्र व राजा श्रीमुखाचा पौत्र पल्लवांचा सेनापति झाला आहे. शकांनी श्रीमुखाचें राज्य घेतलें व त्याच्या कुलाची वाताहत केली ही गोष्ट त्यांना ठाऊक होती. पण त्या विध्वंसनांतून वाचलेला श्रीमुखाचा नातू अत्यंत पराक्रमी निघाला आणि त्याच्यामुळे पल्लवांचें राज्य प्रबळ झालें असें त्यांनी ऐकलें. त्याचें सहाय्य लाभलें तर शकांचा सत्यानास करावयास आपणांस फारसे प्रयास पडणार नाहीत, अशी आशा त्यांना वाटूं लागली. मानवी स्वभावास अनुसरून राजा श्रीमुखाच्या पौत्राच्या मनांतहि शकांवर सूड उगवावा व आपलें गतवैभव परत मिळवावें, अशी तीव्र इच्छा असेल असा त्यांनी अंदाज केला. त्यामुळे आंध्र सम्राट त्या पराक्रमी पल्लवसेनापतीशी मैत्री जोडण्यास साहजिकच उत्सुक झाले.

गुरुदेवांची स्वारी याच सुमारास पुरुषपुराहून आंध्र सम्राटाच्या राजधानींत येऊन दाखल झाली. त्या तेजःपुंज साधूचा सम्राटांनी दरबारांत अतिशय सन्मान केला. गोब्राम्हण साधुसंतांना हिंदुस्थानांतील राजे नम्रतेने वंदन करीत असत. भारताच्या संस्कृतीची ती परंपराच आहे. राजवैभवापेक्षा विद्वत्तेला व त्यागाला या देशांत अधिक मानसन्मान लाभतो.

राजा श्रीमुखाच्या पौत्राचा तो साधु गुरु आहे, हें ऐकून तर आंध्र सम्राटांना तो एक शुभ शकुनच वाटला. शक्तिकर्ण हा अत्यंत प्रतापी तरुण असून स्वभावाने उमदा आहे व हिंदुधर्माचा तो कडवा अभिमानी आहे, या माहितीने आंध्र सम्राटांना आनंद झाला व शक्तिकर्ण अजून अविवाहित आहे ह्या वार्तेने तर त्यांच्या हृदयाला गुदगुल्या झाल्या. कारण आंध्र सम्राटाची कन्या नायनिका हिचाहि विवाह व्हावयाचा होता. सम्राटांच्या मनांत असा विचार आला कीं नागवंशाशीं पूर्वी झालेला आपल्या कुलाचा

स्नेहसंबंध जर आपण पुनः दृढ केला व नव्या बंधनाने त्याला तजेला दिला, तर आंध्रसतेला एक पराक्रमी आधारस्तंभ लाभेल व शकांच्या उपद्व्यापांनी डगमगूं लागलेली आंध्र सत्ता स्थीर होईल. सम्राटांनी गुरुदेवाला राजमहालांत राहण्याचा आग्रह केला व कुमारी नायनिकेला त्यांच्या सेवेस दिले. नायनिकेचें स्वरूप, शिक्षण व तिचें नम्र वर्तन पाहून गुरुदेव प्रसन्न झाले. आपल्या प्रिय राज-शिष्याला ही वधू उत्तम शोभेल असें त्यांच्या मनाने घेतलें.

या नाजुक बाबतींत सम्राटांचा व गुरुदेवांचा विचारविनिमय सुरू झाला. आपला शिष्य आपल्या आज्ञेबाहेर कदापि जाणार नाही ही त्यांची खात्री होती. पुरुषपूर सोडतांना गुरुदेवांनी शक्तिकर्णाला सूचक शब्दांत आपल्या प्रयाणाचा गुप्त हेतु कळविला होता. राजेलोकांचे विवाह प्रेमापेक्षा राजकारणाने अधिक लवकर जुळून येतात. सामान्य पतिपत्नींत प्रेमाचें बंधन असलें तरी राजाराणींत राजकारणाच्या बंधनावर प्रेमाचा मुलामा चढविण्यांत येतो.

शक्तिकर्णाचें मातृकुल प्रसिद्ध होतें, पितृकुलाचा मात्र पत्ता नव्हता. परंतु एवढ्या पराक्रमी पुरुषाचा पिता पराक्रमी असलाच पाहिजे हें अनुमान तर्कशास्त्राला धरूनच होतें. देवी शक्तिमतीच्या विवाहाची वार्ता कोणी ऐकली नव्हती हें खरे. परंतु दुष्यंताच्या शकुंतलेप्रमाणे तिचा गुप्तपणें गांधर्वविवाह झाला असल्यास ती वार्ता कोणाला न कळणें स्वाभाविक होतें. गांधर्वविवाह धर्मशास्त्राला मान्य असल्यामुळे तो प्रश्न सोयीस्कर रीतीने सोडविण्यांत आला. एखाद्या खटल्याचा न्यायनिवाडा प्रथम मनाशी न्यायाधीशाने निश्चित करावा व मग त्यास अनुकूल असा पुरावा शोधून काढावा, असाच प्रकार शक्तिकर्णाच्या पितृकुलाच्या निश्चिती बाबत घडून आला.

शक्तिकर्ण किंवा शाक्तकर्ण या नांवांत शकांच्या शाक्त सांप्रदायाचा वास येत असल्यामुळे त्याचें आंध्र दरबारांत शातकर्ण असें रुपांतर करण्यांत आलें. यावर गुरुदेवांनी सम्राटास सांगितलें "कीं पुरुषपूरचे लोक आपल्य

प्राकृत भाषेंत सेनापतींचा शातकर्ण किंबहुना सातकर्ण या नांवानेच उल्लेख करतात. एवढेंच नव्हें, तर त्यांच्या प्राकृत भाषेंत 'कर्णी' शब्दाचा घोडा असा अर्थ होत असल्यामुळे व सेनापतींनी घोडेस्वारांचें नवें पथक आपल्या सैन्यांत उभारल्यामुळे त्यांच्या नांवाचें सातवाहन असेंहि तिकडच्या प्रदेशांत रुपांतर झालें आहे. कारण सेनापतींचें अश्व हें ठराविक वाहन झालें आहे. त्यांना नित्य अश्वारुढ पाहण्याची पुरुषपूरच्या प्रजाजनांना सवय झाली आहे. कोणी त्यांना सातकर्णी तर दुसरे सातवाहन असें संबोधतात."

गुरुदेवांनी दिलेली माहिती ऐकून सम्राटासह सर्व दरबारी सरदारांनी माना डोलावल्या ! आपल्या शिष्योत्तमाचें अनेक प्रसंगीं त्यांनी राजकुमारी नायनिकेपाशीं गोड वर्णन केलें होतें. त्यांनी सातकर्णीचें अत्यंत प्रभावशाली शब्दचित्र राजकन्येपुढे उभे केलें. त्या वर्णनाने राजकन्या मोहित झाली. सातकर्णीच्या पराक्रमाच्या कथा तिने पित्याच्या व राजदूतांच्या मुखाने पूर्वीच श्रवण केल्या होत्या. विवाहाची मुख्य राजधानी गुरुदेवांनी या युक्तीने आधीच जिंकून घेतली होती. सम्राटांना त्याचा सुगावा मात्र लागला नव्हता.

गुरुदेवांनी ही पूर्वतयारी केल्यानंतर आपल्या शिष्यातर्फे राजकुमारी नायनिकेला मागणी घातली. आंध्र दरबारांतील प्रमुख व्यक्तींवर गुरुदेवांची चांगलीच छाप बसली होती. त्यांची भव्य देहयष्टि, करारी मुद्रा, निस्पृह वाणी व दीर्घ तपस्या यांचा प्रभाव सर्वांवर पडला होता. शातकर्ण सेनापतीच्या पराक्रमाच्या नवल कथा आंध्र दरबाराला परिचित होत्या. मथुरेवर स्वारी केल्यामुळे तो शकांचा कट्टा द्वेष्टा आहे, हें सर्वांना कळून चुकलें होतें. तेव्हां त्याचा स्नेह संपादन करण्याची उत्सुकता आंध्र सम्राटापासून शिपायापर्यंत सर्वांनाच लागली होती.

गुरुदेवांची मागणी सन्मानपूर्वक मान्य करण्यांत आली. वस्त्रालंकारासह पुरुषपूरला राजदूत पाठविण्यांत आले.

# १७

## दोघां मित्रांच्या दोन वाटा !

आंध्र सम्राटांच्या राजधानींत प्रवेश करण्यापूर्वी गुरुदेवांनी वाकण ग्रामाला भेट दिली. परंतु तें ग्राम बेचिराख झालेलें त्यांना दिसलें. त्या ग्रामांतील कुंभारवाडा हा दर्शनीय भाग होता. परंतु त्या जागीं फुटकीं ढोबरें सर्वत्र पसरलेलीं दिसत होतीं. तें भरभराटलेलें ग्राम नष्ट होऊन दहापांच जीर्ण झोपड्या त्या ठिय्यावर विखुरलेल्या दिसत होत्या. भरदार बत्तिशीच्या ऐवजीं महातार्‍याच्या बोळक्यांत चार दोन तुटके फुटके विरळ दांत दिसावेत, इतका फरक जुन्या व नव्या वाकणांत पडला होता. मोत्यांच्या हाराऐवजी गारगोटींचे चार दोन तुकडे डोकावतांना दिसत होते. त्या भीषण दृश्याने गुरुजींचें हृदय चरकलें. हळूहळू त्यांना वस्तुस्थिति कळून आली. शकांच्या अत्याचाराचें तें एक स्मारक होतें.

वृद्ध महाबाहू व त्याची सती पत्नी यांच्या बलिदानाची हकीगत त्यांना कळली. महाबाहू कुंभार खरा परंतु त्याला वीराचें मरण आलें. धारातीर्थी शयन करणाऱ्या क्षत्रियाला जो लोक प्राप्त होतो तोच निश्चित त्याला प्राप्त झाला असेल ! त्याची पत्नी तर पतीबरोबर अक्षरशः सती गेली. उच्च पतिभक्तीचा मक्ता काय समाजांतील वरच्या वर्गालाच देवाने दिला आहे ?

आणि राजनंदिनी ? तीहि सती गेली, पण पतीसाठी नव्हे पित्यासाठी ती सती गेली. तो तिचा पिता देखील जन्मदाता नव्हे केवळ मानलेला, संकट-समयीं रक्षणकर्ता झालेला ! तिचें जीवन त्यागमय झालें. आपण तिचा पुत्र आपल्याबरोबर घेऊन गेलो, त्यामुळे तर तिला शेष जीवन उजाड व भकास वाटलें नसेल, अशी दारुण शंका गुरुदेवांच्या हृदयाला दंश करून गेली. केवळ पुत्रासाठी ती जगली व पुत्राचा विरह होतांच तिने आपल्या प्राणांचें विसर्जन केलें. ज्या शकांनी तिच्यावर घोर अत्याचार केले त्यांच्याच होम कुंडांत तिने आपल्या भ्रष्ट देहाची स्वेच्छेने आहुती दिली व हातून अनिच्छापूर्वक घडलेल्या पापाचें प्रायश्चित घेतलें. तिच्या मृत्तिकादेहाचें सोनें झालें, पण तिच्या सोनुकल्याने बांधलेले सोन्याचे किल्ले तिला पहावयास मिळाले नाहीत. शक्तिकर्णाची प्रतिज्ञा पूर्ण झालेली तिने पाहिली नाही. परंतु ज्या मातेच्या चरणावर मस्तक ठेवून शकांचा नायनाट करण्याची शक्ति-कर्णाने प्रतिज्ञा केली, त्या मातेचाच शकांनी नायनाट केला.

त्या ग्रामांतील लोक भेदरले होते, हवालदील झाले होते. गुरु-देवांच्या साध्या हालहवालीच्या प्रश्नांचीं उत्तरे देखील ते भीत भीत चाचरत पुटपुटत देत असत. त्यांच्या ओठांच्या हालचालीवरूनच त्यांचें मनोगत जाणून घ्यावें लागे. एखाद्यास मोठ्याने बोलण्याची विनंती केली तर तो उत्तर करी, कीं भिंतीला कान असतात.

शेजाऱ्या पाजाऱ्यांत संशयाचें वातावरण निर्माण झालें होतें. प्रत्येकास आपला शेजारी शाक्तांचा गुप्त हेर असावा असें वाटत होतें. तो आपल्यावर केव्हां अवचित संकट आणील व आपल्या घरादाराची राखरांगोळी करील या भीतीने कोणीच कोणाशीं मोकळेपणाने बोलेना.

प्रतिष्ठानची परिस्थिति प्रत्यक्ष पाहण्यासाठी गुरुजींनी गुप्तपणें तिकडे प्रयाण केलें. त्यांनी थोडें बहुत वेषांतर केलें होतें.

वाकणग्रामांत जी परिस्थिति होती तिचा मागमूसहि त्यांना प्रतिष्ठानास पहावयास मिळाला नाही. शकांची सत्ता निष्कंटक झालेली दिसली. शाक्त पंथाचा बडेजाव वाढला होता. मानवी मनाचा विशेषतः नगरवासी जनांचा ओढा चैन करण्याकडे असतो. प्रत्येकाला मौज मारावीशी वाटतें. 'मौज करा' असा कोणी कोणाला उपदेश करण्याची गरज नसते. मनुष्य स्वभावतः चैन भोगतो. संयमाचें व्रत मात्र कठिण असतें. 'संयम करा' असा रोज मंत्र पठण केला व गुरुमुखाने श्रवण केला, तरी सहजगत्या संयम सुटून माणसाचें वाकडें पाऊल पडतें. विश्वामित्रासारखा ब्रम्हर्षी देखील मेनकेच्या प्रथम नादीं लागला व मागाहून प्रस्तावला. शकांचें उत्तेजक तीर्थपेय, त्यांचा चटकदार मांसान्नाचा मसालेदार नैवेद्य व त्यांच्या पंथांत शिरल्यानंतर नित्य भोगण्यास मिळणारी गोपीक्रीडा, यांनी प्रतिष्ठानचे नागरिक संमोहित झाले होते. शाक्त पंथाचा प्रसार झपाट्याने होत होता. शाक्त हे पुढारलेले व सुधारलेले गणले जाऊं लागले, त्यामुळे गरती स्त्रियांच्या उच्च शीलास शह लागला. पातिव्रत्याची टिंगल होऊं लागली. कुलवंत व शीलवंत पतिव्रता नारी बुरसटलेल्या ठरल्या ! स्वतंत्र भोगांगनांना विदुषींचा भाव आला.

कांही कट्टर सनातनी हिंदूंनी या अधःपाताचा निषेध चालविला पण तें त्यांचें अरण्यरुदन ठरलें. त्यामुळे शक राजकर्ते त्यांना आपले शत्रू

लखूं लागले. शक शिपाई संधि साधल्यास गुप्तपणें अशा राजशत्रूंस पकडून नेत व त्यांना शाक्त आचार्यांच्या स्वाधीन करत. त्यांची कालिका मातेला नरबली म्हणून योजना होत असे. शाक्त देवीला उघडपणें अनेक पशू बली देत असत, पण समाजांत कल्लोळ होईल या भीतीने नरबली मात्र चोरून देण्यांत येत असत. हे धार्मिक विधी मध्यरात्रीं होत असत. प्रसाद म्हणून शक शिपाई नरमांस देखील प्रसंगीं भक्षण करीत.

कालिका मातेच्या मंदिरांना एक प्रकारें कसाईखान्याचें रूप आलें असलें, तरी दुसऱ्या अर्थाने त्यांना विलासमंदिरांचें स्वरूप प्राप्त झालें होतें. शक हे देवीचे अव्वल दर्जाचे भक्त समजले जात. हिंदूपैकी शाक्त पंथाची जे दीक्षा घेत, त्यांचा दर्जा अर्थातच दुय्यम प्रतीचा असे. कालिका मंदिरांत शाक्त सांप्रदायिकाशिवाय इतरांचा प्रवेश होऊं शकत नसे. तेथील अंतरंग परक्यांच्या दृष्टीस पडूं न देण्याची खबरदारी घेतली जाई.

प्रतिष्ठान नगरीच्या कानाकोपऱ्यांतून फिरत असतां अवाचित गुरुदेवांच्या दृष्टीस सुधन्वा पडला. त्याला पाहून गुरुजी क्षणभर चकितच झाले. त्याचा रुबाब हरपला होता व डोळे खोल गेले होते. त्याच्या पोषाखांत गबाळेपणा आला होता. पूर्वी तो फारच नीटनेटका राहत असे.

गुरुदेवांना पाहून तो देखील चपापला. गुरुजींनी जुना साधूचा पोषाख टाकून एखाद्या भाबड्या शेतकऱ्याचा वेष त्यांनी धारण केला होता. पण त्यांचे तेजस्वी नेत्र, मुद्रेची धीर गंभीर ठेवण आणि चालण्याची वीर वृत्तीची लकब त्या वेषांतहि लपत नव्हती. त्यांच्या त्या बेदरकार ऐटीमुळे सुधन्व्याने त्यांना ताबडतोब ओळखलें. सुधन्व्याने त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें, तेव्हां गुरुजींनी त्याला वरच्यावर उचलून दृढ आलिंगन दिलें व आलिंगन देतांना त्याच्या कानांत ते पुटपुटले, "सुधन्वा, भिंतीला कान व रस्त्याला डोळे असतात ही गोष्ट तूं विसरलास वाटते.

तूं मला मामा म्हणून मोठ्याने हाक मार. आपण तुझ्या घरीं गेल्यावर मोकळेपणाने बोलूं. आपला कोणाला संशय यावयास नको."

मामाभाच्यांच्या गप्पा मोठ्याने चालूं झाल्या. मामा आपल्या खेड्यांतील पीकपाण्याची व गुराढोरांची हकीगत सांगत होते व भाचा आपण नोकरीसाठी शहरांत किती पायपीट केली याचें सविस्तर वर्णन करून सांगत होता. मामा म्हणाले, "तुम्हा मुलांना खेड्यांत राहून शेतीचे कष्ट करावयास नको. गांवीं भाजी-भाकरीची कधी अडचण तरी पडते कां? तुम्हाला शहरांतील नोकरीचा मोह नडतो. पण शहरांतील नोकरीचें उत्पन्न लंकेंतील सोन्याच्या विटासारखे आहे. मुंडन करणाऱ्या न्हावीदादाला सोन्याची वीट मिळते खरी, पण आठ सोन्याच्या विटा मोजाव्यात तेव्हां शेरभर तांदूळ पदरांत पडतात."

जाणारे येणारे पांथस्थ मोठ्या कौतुकाने गांवठी मामाचा व नागरी भाच्याचा संवाद ऐकत होते.

घरीं गेल्यावर सुधन्व्याने आपल्या दुर्दैवाची कहाणी गुरुजींना सांगितली. त्याची सुंदर तरुण पत्नी शकांनी पळविली होती. कोणत्या तरी कालिका विलासमंदिरांत देवदासी म्हणून तिचा अंतर्भाव करण्यांत आला होता. सुधन्वा तिच्या शोधांत होता पण त्याचा मंदिरांत प्रवेश कसा व्हावयाचा? एका शाक्तसांप्रदायी चांडाळाची तिच्या सौंदर्यावर जहरी नजर गेली व त्यामुळे पतिपत्नींची ताटातूट करण्यांत आली. एका काळरात्रीं आठ दांडग्या सशस्त्र शकांनी त्याच्या घरावर दरोडा घातला, त्याच्या तोंडांत बोळा खुपसून तो निजला असतांनाच त्याला पलंगाशी जखडून बांधण्यांत आलें व ते दुष्ट बळजबरीने कृष्णेला घेऊन गेले. ती ओरडली गागली, धडपडली. शेजारचे चार लोक धावत आले पण त्या शक शिपायांनी तंबी दिल्यामुळे तिची सुटका करण्याची कोणाला हिंमत झाली नाही. शकांचें प्राणांतिक वैर कोण पत्करणार? सर्वांच्या देखत कृष्णेचें हरण करण्यांत आलें. तिने करुण दृष्टीने सर्वांची याचना केली, पण

कृष्णेचा बंधुराया श्रीकृष्ण तिच्या धांव्याला पावला नाही. त्या दिवसापासून सुधन्वा सारखा तिच्या शोधांत होता. त्याने आपलें जुनें घर सोडून दिलें व आडवाटेवर नवें बिऱ्हाड केलें. कारण त्याला आपला थांग पत्ता शत्रूला लागूं नये अशी इच्छा होती. त्याशिवाय त्याच्या कार्याला यश येणें दुरापास्त होतें. कृष्णेच्या सुटकेबरोबरच त्याला आपल्या संसाराचा खेळखंडोबा करणाऱ्या शत्रूवर सूड उगवावयाचा होता.

त्या उदार मनस्क व डौलदार तरुणाच्या जीवनाचें रुक्ष वाळवंट झालेलें पाहून गुरुजींना अतोनात दुःख झालें. ते म्हणाले, " तुला तुझ्या जुन्या मित्रांपैकी कोणाचें सहाय्य मिळणार नाहीं कां ? तुझी प्रतिज्ञा एकाकी तडीस जाणें कठिणच दिसतें. तुझा बालसवंगडी पार्थ—"

सुधन्वा उसळून म्हणाला, " त्या चांडाळाचा खून करीन तेव्हांच माझें संतप्त हृदय शांत होईल. त्याच दुष्टाची पापी नजर कृष्णेवर पडली. तिचें हरण करण्यांत त्यानेच पुढाकार घेतला होता. "

" पण तूं तर म्हणालास कीं शक शिपायांनी—"

गुरुजींचें वाक्य पूर्ण होण्यापूर्वींच सुधन्वा हाताच्या मुठी वळून व दात करकरा चावून गर्जला,

" त्या चांडाळाने शाक्तपंथाची दीक्षा घेतली आहे. शक राजाचा तो मानकरी बनला आहे. तो शकांच्या जुलमी राजवटींतील एक मोठा अधिकारी आहे. त्याला ' शकदास ' ही बहुमानाची पदवी राज्यकर्त्यांकडून मिळाली आहे. लवकरच ' शकसेवक ' ही मोठी पदवी त्याला मिळेल अशी वार्ता आहे. किंबहुना ' शकमित्र ' हा अत्यंत मोठा किताब देखील त्याला मिळूं शकेल. जितका जास्त जुलूम अधिकारी करील तितका या दुष्ट शकांच्या राजवटींत त्याचा सन्मान वाढत जातो. त्याची पत्नी देखील स्वखुशीने शाक्तपंथांत दाखल झाली. तिला शकराजाने ' रौप्यकंचुकी ' हा मान दिला. तिचा वशीला मोठा जबरदस्त आहे. तिला लवकरच ' सुवर्णकंचुकी ' हा बहुमान लाभणार असें लोक बोलतात. "

गुरुजींनी ही एका हिंदूच्या अधःपाताची वार्ता ऐकून दीर्घ निःश्वास सोडला.

सुधन्व्याने शक्तिकर्णाची विचारपूस केली व त्याचें कुशल पुसलें. गुरुजींचे नेत्र प्रफुल्लित झाले. ते हर्षभराने म्हणाले, " शाक्तकर्ण आपल्या पराक्रमाने पुरुषपूरच्या पल्लव राजाचा सेनापति झाला आहे. हा त्र्यंबकगीर गोसावी असें निर्धाराने भविष्य सांगू शकतो कीं शाक्तकर्ण केव्हांना केव्हांतरी या दुष्ट, नीच व घातकी शकांचा नायनाट करून भारतवर्षाचा सम्राट होईल. तुझ्यासारख्या कट्टर सनातनी हिंदु मित्रांनी त्याला मनःपूर्वक सहाय्य मात्र केलें पाहिजे. "

सुधन्वा किंचित हसून म्हणाला, " गुरुदेव, तुम्ही गोसावी पंथां-तील त्र्यंबकगीर महंत ना ? आजपर्यंत तुम्ही कधीच आपलें नांवगांव आम्हांस कळूं दिलें नाही. आज अवचित तें मला उमगलें. "

गुरुजी चपापले पण शांत मुद्रा करून म्हणालें, " मला भविष्य-काळचीं मनोहर स्वप्नचित्रें पाहतां पाहतां अवधान राहिलें नाहीं. पण तुला माझें रहस्य कळलें, तरी तें गुपित राखलें जाईल ही माझी खात्री आहे. शाक्तकर्ण भारतसम्राट होणार हें जसें निश्चित आहे, त्याप्रमाणेच तूं त्याचा अमात्य होणार ही गोष्ट देखील तितकीच खरी. अमात्याला आपल्या हृदयाच्या चोरखणांत अशीं अनेक गुप्त रहस्यें जतन करून ठेवावी लागतात. आजपासूनच या भावि अमात्यांची कामगिरी चालूं झाली."

सुधन्व्याच्या मुद्रेवरील विषादाची छाया दूर झाली. भारताच्या भाग्यकल्पनाचित्राने त्याचें हृदय आनंदित झालें. तो आपलें तीव्र वैयक्तिक दुःख क्षणभर विसरला. शाक्तकर्णाच्या पराक्रमाचें वर्णन कर-ण्यांत व तें रोमांचकारी रसभरित वर्णन ऐकण्यांत गुरुशिष्यांना रात्र केव्हां संपली हें कळलें देखील नाही.

---

## १८

# संस्कृत-प्राकृत विनोद–

दोन स्त्रिया खेळीमेळीने एका घरांत नांदत नाहीत. उषेचें मुख पूर्वेस तर संध्येचें पाश्चिमेस असतें. लक्ष्मी सरस्वती या मानवी स्त्रिया नसून देवता आहेत. तरी त्यांचें वैर पुराणप्रसिद्ध आहे. लक्ष्मी कमलासनावर झोके घेतां घेतां कमलवेलीच्या देठाने सरस्वतीच्या मयुराला फटकारतें. मग सरस्वतीचा मोर देखील रागाने कमल कुरतडूं लागतो. त्यामुळे त्या दोन देवता फार दिवस एकत्र रहात नाहीत. लक्ष्मी श्रीमंताच्या उपवनांत विहार करावयास जाते तर सरस्वती विद्वानाच्या पर्णकुटींतील भूर्जपत्रांशी खेळत बसते.

देवी शक्तिमति कैलासवासिनी झाली परंतु देवी नायनिकेने हिंदु-कुशनिवास पत्करला. शाक्तकर्णाची माता हरपली पण मायेचा त्यास लाभ झाला.

शाक्तकर्णाचे शाक्त व कर्ण हे दोन्ही कलंक नाहीसे झालें. राजा श्रीमुखाचें कुल उज्वल ठरलें. शातवाहनाचा विवाह मोठ्या थाटामाटाने आंध्र सम्राटाची कन्या देवी नायनिका हिच्याशीं झाला. शातवाहन आंध्र सम्राटाचा त्याच्या मातामहाप्रमाणे जामात झाला. त्याचें वैभव मग काय वर्णावयाचें ! मातेच्या मृत्यूमुळे शातवाहनास भारी दुःख झालें. आपलें वैभव पाहण्यास आपली दुर्दैवी माता जगली नाही हें शल्य त्याला खुपलें. पण आपण आपली प्रतिज्ञा पार पाडली तर तिचा आत्मा परलोकांत संतुष्ट होईल अशी भावना त्याने आपल्या मनाशीं घट्ट बाळगली.

प्रेमाचा प्रवाह नदीप्रमाणे एकसारखा खाली वाहत असतो. तो चुकून देखील उलटा कदापि वाहत नाही. प्रत्येकाचें प्रेम आपल्या पत्नीवर व मुलांमुलीवर असते. नवी त्रिटी नवें राज्य सुरू झालें कीं जुनी त्रिटी जुनें राज्य विस्मृतीच्या गर्तेत लोपतात. नवी पिढी जन्मास आली कीं जुन्या पिढीचा विसर पडतो. आईबापांचें आपल्या पुत्रांवर प्रेम असतें पण त्या पुत्रांची दृष्टि आणखी पुढे म्हणजे आपल्या स्वतःच्या पुत्रांकडे असते. ती मागे वळतच नाही.

शातवाहन–नायनिकाचा संसार म्हणजे प्राकृत–संस्कृतचा गोड घर-गुती झगडा होता. तें प्रेमाचें भांडण होतें. शातवाहनचें बालपण कुंभारवाड्यांत गेल्यामुळे त्याला संस्कृत भाषा अवगत नव्हती. त्याच्या गुरुदेवानेहि त्याला संस्कृतचे धडे गिरविण्यास न देतां पैशाची भाषेचे धडे दिले. प्राकृत महाराष्ट्री भाषा तर त्याची जन्मभाषा होती. उलटपक्षी देवी

नायनिका ही उच्च पंडिती वातावरणांत वाढलेली ब्राम्हण सम्राटाची कन्या. ती संस्कृतज्ञ होती. ती प्राकृत समजूं शके परंतु संस्कृत बोलत असे.

तरुण पतिपत्नी वसंतागमनानिमित्त एकमेकांच्या अंगावर पिच-कारीने पाणी उडविण्याचा खेळ खेळत होती. शातवाहनाच्या जलपूर्ण पिचकाऱ्यांचा मारा तिला असह्य झाला. तेव्हां ती शरणार्थी तरुणी ' मोदकैः परिताडय माम् ' अशी त्यास विनंती करती झाली.

तिची श्रांत मुद्रा पाहून शातवाहनाने जलक्रीडा बंद केली व स्वयं-पाकगृहांत जाऊन तेथून त्वरेने तो मोदक घेऊन आला. त्याला वाटलें कीं तिला भूक लागली असावी व मोदक खाण्याची वांछा तिला झाली असावी.

हे गर्भवतीचे डोहाळे असावेत अशी मधुर शंका त्याच्या मनांत डोकावली. तिचे डोहाळे पुरवावे या हेतूने त्याने स्वयंपाकगृहांतून मोदक आणले व तिच्याकडे ते फेकून म्हटले, " झेला हा मोदक. नाही तर त्याचा मार लागेल. "

देवी नायनिका खदखदा हसूं लागली. ती चेष्टेने म्हणाली, " पुरुष-पूरचे सेनापति फारच विद्वान आहेत म्हणावयाचे ! मला पिचकारीतील जलाचा मारा सहन होईना म्हणून मी सहज विनोदाने वदलें, मोदकैः परिताडय माम्—म्हणजे मा उदकैः परिताडय माम्. मला उदकाचा मार देऊं नका. पण हे राव त्या ऐवजी मजकडे नैवेद्याचे मोदकच फेका-वयास लागले. शाबास ! आंध्र दरबारांत ही गोष्ट कळली तर तुमच्या विद्वत्तेचें भारी कौतुक होईल. "

शातवाहन ' ण ' च्या ऐवजी ' न ' असा प्राकृत उच्चार करी. तरुणी ' च्या ऐवजी तो ' तरुंनी ' म्हणे. देवी त्यावर त्याला विनोदाने म्हणाली, " समजलें, समजलें ! आलिंगन देणाऱ्या तरुणीच्या कंठिकेपेक्षा कंटकपूर्ण तरुंनी दिलेलें आलिंगन तुमचें शरीर अधिक रोमांचित करूं शकतें ! "

देवीने एकदा लाडिकपणें त्याच्याजवळ कंठा मागितला. शातवाहनाला त्या मागणीचें नवल वाटले. तरी बालहट्ट, राजहट्ट व स्त्रीहट्ट हे विलक्षण असतात असें त्याने ऐकलें होतें. तेव्हां त्याने तिचा हट्ट पुरविण्याच्या उद्देशाने तिच्या अंगावर एक शिपायाची गोधडी टाकली. कारण कंठा व कंथा यांतील भेद त्याला कळलाच नाही.

संसारांत विनोद निर्माण झाला तर रमणीचें मुखमंडल पूर्ण चंद्राप्रमाणे हास्यविकसित होतें आणि त्या पौर्णिमेच्या चंद्राच्या प्रभावाने शृंगारसागराला जोराची भरती येते. भरतीच्या वेळीं पोहण्याचें सौख्य पोहणाऱ्यालाच कळूं शकेल. जमिनीवर कंदुक क्रीडा करणाऱ्याला त्याची यथार्थ कल्पना होणें अशक्य आहे.

शुद्ध सात्विक विनोदाला निर्झराची उपमा साजते. तें मंद हास्य-तो मधुर अस्फुट गीतनाद अर्ध विकसित कमळाप्रमाणे मनाला आनंद देतो.

संस्कृत–प्राकृतच्या डावांत दोघेही रंगून गेले !

संस्कृत–प्राकृतचें बंधन म्हणजे तरुवेलीचें गाढ आलिंगन. प्रेमाच्या बंधनांत गुरफटलेल्या वेलीचा विस्तार होऊन ती फुलांनी डवरून गेली तर त्यांत नवल वाटावयास नको. तरुवेलीचा इतका एकजीव झाल्यावर फुलें कोणाचीं हा प्रश्नच उरत नाही.

---

## १९

# पुरुषपूरची क्रांति—

गंडोफेरवाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र दाराफेरव हा पुरुषपूरच्या सिंहासनावर बसला. परंतु संत तमसाचार्यांचा उपदेश ग्रहण करून ख्रिस्ती बनलेल्या या राजघराण्याचा तेथील प्रजेला तिटकारा वाटूं लागला. ख्रिस्ती धर्म हा पल्लवांचा राजधर्म झाला. परंतु प्रजेकडून त्या धर्माचें मुळीच स्वागत झालें नाहीं. पुरुषपूरच्या हिंदु लोकांना ख्रिस्ती धर्मांत मुळीच नावीन्य वाटेना. त्यांना तो बौद्ध धर्माचाच एक पाखंडी पंथ वाटला.

संत तमसाचार्यांचीं प्रवचनें फुकट गेलीं. उलट आचार्य त्र्यंबकगीर यांच्या प्रवचनांचा जनतेवर विलक्षण प्रभाव पडूं लागला. त्र्यंबकगीर महंताला पैशाची भाषा उत्तम अवगत असल्यामुळे लोकांच्या भाषेंतून ते त्यांना उपदेश करूं शकत. त्यामुळे तमसाचार्यांची परदेशी वाणी त्यांच्या तुलनेने बोबडी ठरली.

हिंदु धर्मानेहि यावेळीं कायापालट केला होता. हिंदुधर्माचें उपासनामय व चिंतनपर स्वरूप लुप्त होऊन कर्मकांडाचें महत्व वाढूं लागलें. धर्माने आपलें अमूर्त स्वरूप टाकून दिलें व यज्ञयाग, उत्सवपूजन, सणपर्वणी या विविध स्वरूपांत नटून तो लोकांच्यापुढे उभा ठाकला. आकाशांतील

इंद्र, मरुत, वरुण हे निसर्गाचे अमूर्त देव सगुण रुपाने ईश्वरी अवतार म्हणून देवळांत नांदावयास आले.

देवांची पंचामृतपूजा चालू झाली. चौघडे वाजूं लागले, सनईने सूर धरला, भक्त भक्तिणी देवा समोर गाऊं लागले व तीर्थप्रसादाची चंगळ उडाली.

हिंदुधर्माच्या या आकर्षक व गोड परिवर्तनामुळे बुद्ध व ख्रिस्ती धर्म सुतकी दिसूं लागले. सत्यनारायणाची छाप कथेपेक्षा प्रसादाच्या शिऱ्यानेच लोकांच्या मनावर अधिक पडली. देव भावाचा भुकेला असेल पण मनुष्य हा गोड नैवेद्यप्रसादाचा भुकेला असतो व प्रसादाला मुंगळ्या-प्रमाणे तो जाऊन चिकटतो. त्याला तेथून ओढून काढणें महा कठिण कर्म आहे. संत तमसाचार्यांना पुरुषपुराहून आपला गाशा गुंडाळावा लागला.

बौद्ध भिक्षूपेक्षा देवळाच्या महंत–पुजाऱ्यांची समाजांत प्रतिष्ठा वाढली. देवळांत अनेक उत्सव साजरे होऊं लागले. देवळा भोवती जत्रा भरूं लागली व त्यामुळे तेथे आनंदाचें वातावरण पसरलें. समाजाला तें मोठें प्रलोभन वाटलें.

आचार्य त्र्यंबकगीर यांचा पट्टशिष्य म्हणून सातवाहनाबद्दल लोकांना आत्मभाव वाटूं लागला. सातवाहनास पैशाची भाषा अवगत असल्यामुळे लोकांना तो आपल्यापैकीच एक वाटूं लागला. आधीच त्याच्या कर्तबगारीची व शौर्याची लोकांच्या मनावर अपूर्व मोहिनी पडली होती. त्यांत या आत्मीय-तेची भर पडली. शिवाय महान पराक्रमी आंध्र सम्राटाचा तो जावई आहे ही गोष्ट प्रजेला माहीत होती. आंध्र सम्राट हिंदु धर्माचे आधारस्तंभ गणले जात असत. सातवाहनाबद्दल लोकांचा आदरभाव जितक्या प्रमाणांत वाढला तितक्या प्रमाणांत परकीय पल्लव राजघराण्याचा त्यांना तिटकारा वाटूं लागला. जे दहा वीस लोक चुकून माकून ख्रिस्ती झाले होते, त्यांना उच्च सरकारी नोकऱ्यावर नेमण्याचा दाराफेरवाने उपक्रम केल्यामुळे तर लोकांचा संताप अनावर झाला.

राजाच्या हातून होणाऱ्या धार्मिक जुलुमाचें व पक्षपाताचें पर्यवसान राज्यक्रांतींतच होत असतें. लोकांनी बंडाची उठावणी केली व दाराफेरवाला पदच्युत केले. सैन्याचा अधिकार सातवाहनाकडे असल्यामुळे व त्याचें सैन्य सुसज्ज असल्यामुळे त्याच्याकडे क्रांतीचें नेतृत्व साहजिकच आलें. या क्रांतीचीं सर्व सूत्रें महंत त्र्यंबकगीर खेळवीत होते. तेव्हां त्यांच्या पट्ट-शिष्याचा या धार्मिक वावटळींत पलुत्र राजघराण्याला उपयोग कसा व्हावा?

सातवाहन पुरुषपूरच्या गादीवर बसला, नव्हे लोकांनी त्याला अत्याग्रहाने राज्यपद दिलें व गुरुजींनी राज्यपद स्वीकारण्याची त्याला आज्ञा केली. त्याच्या राज्यारोहणाला विरोध कोण करणार? स्वधर्मी प्रजेचा पाठिंबा, गुरुदेवाचा आशीर्वाद आणि हिंदुसार्वभौम सत्तेशीं निकटचें नातें! हे तीन प्रबल व खंबीर आधार त्याला गवसले होते.

परंतु त्याचें राज्यपद ही दुसऱ्या अर्थाने सुळावरची पोळी होती. कारण त्यामुळे देशावर येणाऱ्या कुशान लोकांच्या स्वाऱ्यांना तोंड देण्याची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. पुरुषपूर हें भारताचें प्रवेशद्वार होतें. त्याच्या रक्षणाचा भार सातवाहन राजाला उचलावा लागला.

सातवाहनाचें सैन्य नव्या घडणीचें होतें. घोडेस्वार व रथ यांचा त्याच्या सैन्यांत अंतर्भाव झाला होता. त्यामुळे त्याच्या सैन्याचा वेग वाढला. परशू व तलवारी यांच्या ऐवजीं त्याचे सैनिक लांब लचक भाले वापरूं लागले. त्यामुळे त्या सैनिकांचे हात लांब पोहोचूं लागले.

कुशान लोक शकांच्या तुलनेने पिंगट वर्णाचे होते. त्यांचे डोळे बारीक व नाकें बसकीं होतीं. शकासारखे ते धिप्पाड नसले तरी चिवट, चपळ व काटक होते. शक दैत्य भासत तर हे नागाप्रमाणे शोभत.

सातवाहनाचें शौर्य कुशानांच्या स्वाऱ्यांत कसाला लागलें. आक्रमक व संरक्षक अशा दोन्ही प्रकारच्या युद्धांत त्याने भीमासारखा विक्रम केला. पण समुद्राला भरती आली म्हणजे त्या लाटांना कोण थोपवूं

शकणार ? कुशानांच्या लाटावर लाटा भारतवर्षाच्या प्रवेश द्वारावर येऊन आदळूं लागल्या. कुशान परकीय असले तरी शकांप्रमाणे रानटी, अनाचारी व संस्कृतीहीन नव्हते. चिनी संस्कृतीचा त्यांच्यावर पगडा बसला होता. म्हणूनच भारतीयांचा व त्यांचा स्नेहसंबंध जुळूं शकला व अखेर ते भारतीयांशी संलग्न झाले. कुशानांचें व शकांचें पिढ्यानपिढ्या वैर चालूं होतें. त्यामुळे वायव्येकडून येणारे कुशान व मथुरा प्रांतांत स्थायिक झालेले शक यांच्या कात्रींत सापडून सातवाहनाची दामटी वळण्याची वेळ आली. पण आपल्या सैन्याच्या विद्युत्‌गतीने हालचाली करून तो कसे बसे आपलें संरक्षण करत असे. त्याच्या तीव्रगतीच्या वाहनामुळे लोक त्याला सादिवाहन म्हणूं लागले. सादिवाहनाचा बोलबोला शत्रुमित्रांत झाला खरा, पण त्यामुळे परचक्राचें कसें निवारण होणार ?

अखेरीस कुशानांचा रणशूर सेनापति कडारेश याच्याशीं सादिवाहनाने तह केला. वरपांगी तो तह मैत्रीचा दिसत असला तरी सादिवाहनाने कडारेशाला उत्तरेस मुक्तद्वार करून दिलें. मगध देशाच्या सीमेपर्यंत कुशानांनी उत्तर हिंदुस्थानांत आपले हातपाय पसरावेत, परंतु मगधावर मात्र आंध्र नृपांचें राज्य चालावें असें त्या तहनाम्यांत ठरलें. शकांना दोघांनीहि समान शत्रू लेखून त्यांची ससेहोलपट करावी आणि या कामीं दोघांनीहि एकमेकांना सहाय्य करावें. उत्तरेकडील शकांचा समाचार कडारेशाने घ्यावा व दक्षिणेंतील शकांना सादिवाहनाने प्रायश्चित द्यावें, असे करार मदार त्या दोन समबल व चतुर सेनापतींत मंजूर झाले.

शक व कुशान दोघेहि भारताचे शत्रू व वास्तविक भारताच्या दृष्टीने दोघेहि परके ! एक गोरा तर दुसरा पिवळा, एवढाच फरक ! परंतु राजनीति ही वेश्येप्रमाणे रंग पालटणारी फसवी असल्यामुळे कडारेश सादिवाहनाचा मित्र ठरला व क्षत्रप कन्हपान शत्रू गणला गेला.

२०

## शकांचें उच्चाटण—

शकांचें भारतावर पहिलें आक्रमण यापूर्वी दीडशें वर्षे अगोदर झालें होतें. तेव्हांपासून शक व भारतीय यांचा तुंबल संग्राम चालू होता. विजय कधी या पक्षास तर कधी त्या पक्षास मिळे. शक पराभूत झाले तरी ते ठिकाठिकाणीं भारतवर्षीत मिरासदार बनले होते. एक ठाणें सोडावें लागलें तर ते दुसऱ्या ठिकाणीं आपल्या सत्तेचा खेळ मांडीत असत. शतकानुशतकें हें महायुद्ध चाललें होतें.

कडारेशाशीं ठरलेल्या तहाप्रमाणे सादित्राहनाने आपले पुत्र कुमार हकश्री व भार्य पांचहजार शूर शिपायांसह कडारेशाच्या दिमतीस दिले. सादिवाहनाने मगधाची वाट धरली व आंध्र नृपातर्फे तेथे आपलें भक्कम ठाणें मांडलें.

कुमारवर वेदिश्री याला घेऊन आचार्य त्र्यंबकगीर यांनी दक्षिणेस प्रयाण केलें. शक सत्तेवर तीन दिशांनी आक्रमण चालू झालें.

आचार्य त्र्यंबकगीर हे शापादपि शरादपि म्हणून प्रसिद्ध असलेल्या द्रोणाचार्यांचे खरे खरे अनुयायी ! दक्षिणेंत गेल्यावर त्यांनी प्रवचनकाराचा पेशा सोडला व शिपायाचा नवा धंदा पत्करला. पूर्वी ते अतिथी म्हणून

लोकांच्या आश्रयास जात असत पण आतां ते महारथी म्हणून लोकांना आश्रय देऊं लागले. आपल्या शिष्याप्रमाणे त्यांनी घोडेस्वारांची भालाईत पथकें उभारली व रथांची त्यांना जोड दिली. त्यांच्या सैन्यांत धनुर्विद्या जाणणारे भिल्लहि सामील झाले. कुमारवर वेदिश्री याच्या नांवाने हा सारा कारभार चालूं झाला असला, तरी त्याच्यावर महारथी त्र्यंबकगीर यांचें साहजिकच नियंत्रण होतें. कारण कुमारवर वेदिश्री हा अननुभवी होता व त्र्यंबकगीर तर त्याच्या वडिलांचे गुरु होते. कुमारवर वेदिश्री स्वतःस सादिवाहनाचा दक्षिणेंतील कारभारी म्हणवूं लागला.

या त्रिशूलधारी व्यूह रचनेमुळे शक जेरीस आले. ते शूर व पराक्रमी असले तरी या तिहेरी पेंचप्रसंगांतून सुटण्याचा मार्ग त्यांना सापडेना. उत्तरेस कुशानांची सत्ता वायुवेगाने पूर्वेकडे विस्तारली. कडारेश व सादिवाहन यांच्या कचाट्यांत सापडलेली सर्व लहान मोठीं शकराज्यें नामशेष झालीं. शक परके असल्यामुळे त्यांच्या राज्यांतील प्रजाजन अशा विपत्कालीं त्यांच्या सहाय्यास धावत नसत; उलट ' भली लेकांची खोडकी जिरली, भारी उन्मत होऊन माजले होते,' अशी स्थानिक लोक शकांची हेटाळणी करून दांत विचाकित असत व पराभवाने पोळलेल्या त्यांच्या हृदयावर उपहासाच्या व अपमानाच्या डागण्या देत.

दक्षिणेंत तर गनिमी काव्याचें युद्ध चालूं झालें. महारथी त्र्यंबकगीर यांनी शकांची युद्धकला त्यांना सव्याज परत केली. शेरास सवाशेर भेटला! शकाप्रमाणेच त्र्यंबकगीर यांचे रथी व महारथी अनुयायी शकांच्या राज्यावर वेगाने छापे घालत व नासधूस करून शक सावध होण्यापूर्वीच आले तसे अदृश्य होत असत. महारथ्यांची ही वावटळ शकांना देखील आवरतां आवरेना. शक हतप्रभ झाले. त्यांची रग जिरली. महारथ्यांचा दक्षिणेंत सर्वत्र दरारा बसला.

दक्षिणेंतील मोहिमेंत सुधन्व्याची महारथ्यांना मोठीच मदत झाली. शकांच्या कौटिल्य यंत्रांत सापडलेल्या त्याच्या पत्नीने अधःपाताच्या मानसिक यातना शमविण्यासाठी आत्महत्या केली व या कटु आणि पापी जगाचा अखेरचा निरोप घेतला. सुधन्वा आपली त्या नर्कवासांतून सुटका करील या आशेवर प्रथम तिने बराच धीर धरला. पण आशेची निराशा झाली. सुधन्वा तिची मुक्तता करूं शकला नाही. तिला तें लाजीरवाणें जीवन असह्य झालें. शत्रूंचा सूड घेण्याच्या भावनेने फुललेला सुधन्वा उत्तम भेदी ठरला. त्यामुळे शकांचीं कारस्थानें, त्यांच्या सैन्याची व्यूहरचना, त्यांच्या बचावाच्या फळींत असलेलीं अप्रगट भगदाडें, यांचीं बिनचूक माहिती कुमारवर वेदिश्री व महारथी त्र्यंबकगीर यांना त्याच्या मार्फत कळली होती. तिचा त्यांनी पूर्ण फायदा करून घेतला.

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला प्रतिष्ठान नगरी पुनश्च सादिवाहनाच्या ताब्यांत आली. शकांनी पश्चिमेकडे पळ काढला व नाशकाची वाट धरली. त्या आनंदभरांत होळया पेटविण्यांत आल्या व शकांच्या नांवाने त्वंपुरा करण्यांत आला. जनतेचा उत्साह असाच अमर्याद असतो. कालिकेची शाक्त मंदिरें उध्वस्त करण्यांत आलीं. हजारो कुलकन्य-कांची मुक्तता करण्यांत आली. बिचाऱ्या दीन झालेल्या गाई आपापल्या घरीं नांदावयास गेल्या.

सर्वत्र आनंदीआनंद झाला. सादिवाहनास चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर राज्याभिषेक करण्यांत आला. घरोघरीं गुढ्या उभारण्यांत आल्या व दारोदारीं तोरणें झळकूं लागलीं. पहिली गुढी उभारण्याचा मान कुमारवर वेदिश्रीस देण्यांत आला. विवाहोत्सुक नव वधूप्रमाणे प्रतिष्ठान नगरीचें शुभ मंगल झालें. महाबाहू कुंभाराचा नातू कर्ण अखेरीस राजा झाला. पुरुषाच्या भाग्याचें भविष्य वर्तविणें कठिण आहे. सादिवाहनांचा जयजयकार झाला. हिंदु धर्माची पताका डौलाने उंचावर फडकूं लागली.

गोऱ्या शकांनीं आपलें मुख काळें केलें. हिंदु जेते ठरले. भारत ही त्यांची जन्मभूमि, कर्मभूमि, धर्मभूमि व म्हणूनच भाग्यभूमिहि आहे. ती हिंदूंची देवभूमि होय. अखंड भारताचें पावित्र्य मातेच्या पावित्र्याइतकेंच हिंदूंना प्रिय व वंद्य आहे.

युधिष्ठिर कालगणनेचा लोप होऊन विक्रम संवताची कालगणना त्यावेळीं चालूं होती. त्याला फार काळ लोटला नव्हता. विक्रम संवत् १३४ या वर्षीं सादिवाहनाला आपल्या मातामहाच्या राजधानींत राज्याभिषेक झाला. त्या आनंदाप्रीत्यर्थ नवी कालगणना जन्मास आली. सादिवाहनाचे महाराष्ट्रींत शालिवाहन असें सौम्य व उच्चारसुलभ रुपांतर झालें. शालिवाहन शकाचा प्रारंभ झाला. शालिवाहनाने शकांचा पराभव केल्यामुळे संवत्सरास शक म्हणून संबोधण्याचा लोकांनी नवा प्रघात पाडला.

शालिवाहन शक चालूं झाला म्हणून विक्रम संवत बंद पडला नाही. कारण जो पराक्रम शालिवाहनाने केला तोच तत्पूर्वी विक्रमादित्याने केला होता. दोघेहि समविक्रमी होते. दोघांनीहि परकीय शकांचें निर्दालन केलें. विक्रमादित्याने प्रारंभलेल्या यज्ञास शालिवाहनाने पूर्तता आणली. शालिवाहनास आपल्या मातृमातामहाविषयीं आदर वाटणें स्वाभाविक होतें. त्यामुळे शालिवाहन शकास दक्षिणेंत तरी विक्रम संवताची पुस्ती जोडण्यांत आली. उत्तरेस मात्र विक्रम संवताचें एकछत्री साम्राज्य चालूं होतें. त्याला शालिवाहनाच्या पराक्रमाने बाध आला नाहीं.

कारण तो केवळ दक्षिणेचा राजा झाला. त्याचा पराक्रम मुख्यतः तिकडेच गाजला. उत्तरेस तर त्यावेळीं कुशानांची सत्ता पसरली होती. चैत्र शुद्ध प्रतिपदेचा राज्यारोहण दिन हा शालिवाहनशकाचा प्रारंभ दिन होय.

# २१

## पुण्याहवाचन–

शालिवाहन सम्राट झाला तरी त्याला आपल्या मातेचा विसर पडला नाही. तो स्वतःचा मोठ्या अभिमानाने शक्तिकर्ण किंवा सातकर्णी असा उल्लेख करी. माणसाचा मोठेपणा जन्मावर नसून पराक्रमावर अवलंबून असतो हें तत्व त्याला अनुभवाने पटलें होतें. संत तमसाचार्यांच्या मुखाने ऐकलेली येशू व मेरी यांच्या कथेची त्याला कधीच विस्मृती झाली नाही.

सुधन्वा शालिवाहनाच्या नव्या राजवटींत एक मोठा सन्माननीय अधिकारी झाला. भिल्लांना धनुर्विद्या व शिवपूजा शिकविण्यांत त्याचा काळ व्यतीत होऊं लागला. त्याच्या उपदेशामुळे भिल्ल वन्य असूनहि कट्टर हिंदु-धर्माभिमानी बनले. सुधन्व्यास ते आपला आचार्य लेखीत.

पार्थाला वाटलें कीं आपला बाळमित्र शक्तिकर्ण हा सुधन्व्यापेक्षाहि बहुमानाची दरबारी जागा आपणास देईल, कारण त्याचें गुपित आपणास माहीत आहे. तो आता सम्राट शालिवाहन झाल्यामुळे, आपल्या जन्म रहस्याचा स्फोट होऊं नये या भीतीने सुवर्णाचा आपणावर वर्षाव करून आपणास संतुष्ट राखील.

तो मोठ्या आशेने शालिवाहनाच्या दरबारांत गेला व आपल्या कर्तबगारीचे पोवाडे गाऊं लागला. शक परकीय असून देखील त्यांना आपली योग्यता पटली व त्यांनी ‘ शकदास ’ आणि ‘ शकसेवक ’ या

दोन बहुमानाच्या पदव्या आपणास अर्पण केल्या आणि आपल्या पत्नी-लाहि रौप्य व सुवर्ण कंचुकीचीं महावस्त्रें प्रेमाने अर्पण केलीं, ही गोष्ट त्याने मोठ्या अभिमानाने दरबारांत कथन केली.

त्याची दर्पोक्ति ऐकून सर्व दरबारी हसूं लागले. तें पाहून पार्थ चिडला व म्हणाला:—

"तुम्हांला हें सारें खोटें वाटतें. पण माझ्या पत्नीला शकराज कन्हपान यांच्या अंत:पुरांत दिवसा रात्रीं केव्हांहि जावयाची सदर परवानगी असे, याची कोणीहि शाक्त साक्ष देईल. शकराज कन्हपान मला देखील कधीमधीं आपला जुना पोशाख वापरावयास देत व विनोदाने ओझ्याचा बैल म्हणत असत. कितिदां तरी त्यांनी सलगीने मला लाथा मारल्या व मीहि त्यांचे पाय चुरले. आमच्यांत असा जिव्हाळ्याचा सेव्यसेवक-भाव निर्माण झाला होता. मी परकीयांची जर अशी मनोभावाने सेवा करूं शकलो तर शक्तिकर्णासारख्या माझ्या बालपणाच्या सवंगड्याची मी उत्तम चाकरी करीन, हें काय निराळें सांगावयास पाहिजे?"

बिचारा पार्थ! सर्व दरबारी त्याची टवाळी करूं लागले! अखेरीस अमात्य सुधन्वा त्यास म्हणाला, "तुला शकराजाने दिलेली बैलाची उपमा आम्हाला पटली. यापुढे तुला सतत तेल्याच्या घरचा घाणा ओढावा लागेल. तें काम तुझ्या योग्यतेनुरूप नाही, अशी तुलाहि तक्रार करतां येणार नाहीं."

पार्थाला एका तेल्याच्या सुप्रत करण्यांत आले. तेल्याला नवा कष्टाळू बैल फुकटांत मिळाला.

आचार्य त्र्यंबकगीर यांची महामात्य म्हणून नेमणूक झाली. त्यांनीं दक्षिणदिग्विजयाची फारच मोठी कामगिरी पार पाडली होती. त्यांच्या सर्व महारथी अनुयायांची शालिवाहनाच्या सैन्यांत भरती करण्यांत आली. महारथ्यांचें एक पराक्रमी पथकच याप्रमाणे दक्षिणेंत निर्माण झालें.

या आनंदमय मंगल प्रसंगाला एकच गालबोट लागलें होतें. कडा-रेशाच्या दिमतीस असणारा कुमार हक्कश्री हा शालिवाहनाचा पुत्र एका शक युद्धांत हत्तीवरून पडून मारला गेला. हक्कश्री हा मोठा पराक्रमी

होता व त्याची हत्तीवर बसलेली विजयी मूर्ती शत्रूंचा थरकाप करी. त्याचा धाकटा भाऊ कुमार भार्य याने हक्कश्रीची शक्य तेवढी सेवासुश्रुषा केली परंतु ती निष्फळ ठरली. कुमार हक्कश्रीच्या मृत्यूनंतर कुमार भार्य प्रतिष्ठान नगरीस दाखल झाला. शालिवाहनाने त्याच्या पराक्रमाचा व बंधुप्रेमाचा मोठा गौरव केला. कुमारवर वेदिश्री हा शालिवाहनातर्फे अति दक्षिणेचा कारभार पाहूं लागला व कुमार भार्य हा प्रतिष्ठानासच राहून पित्यास सहाय्य करूं लागला. कडारेशाने शालिवाहनाच्या व त्याच्या पुत्रांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदतीने उत्तरेंत शकांचा पराभव केला व पुरुषपुरापासून तों काशीपर्यंतचा मुलुख कुशानांच्या सत्तेखालीं आणला.

यानंतर लवकरच युवराज वेदिश्री याचा कलिंगदेशची राजकन्या गौतमी हिच्याबरोबर मोठ्या थाटामाटाने विवाह झाला. आंध्र राजकन्या स्वाति हिच्याशी कुमार भार्यांचेंहि लग्न लागलें. आंध्र राजघराणें सात वाहनांचें हक्काचें सासुरवाड बनलें ! सातवाहन घराणें म्हणूनच आंध्र (कन्या) भृत्य स्वतांस म्हणवूं लागलें. शालिवाहनाच्या वंशसातत्याची योजना झाली.

हा महाभाग्यवान विक्रमशाली शककर्ता पुत्रपौत्रांसह प्रतिष्ठान नगरींत सुप्रतिष्ठित झाला. प्रतिष्ठान नगरीला दक्षिणेंतील काशी लेखूं लागले. हिंदुधर्माचें नवें भव्य मंदिर तेथे निर्माण झालें.

शालिवाहनाला आपल्या अज्ञात पितृकुळापेक्षां मातृकुळाचा साहजिकच अधिक अभिमान वाटे. त्याच्या पुत्रपौत्रांनीहि हीच प्रथा उचलली. अन् तेंहि बरोबरच आहे.

पुराणांत दिलेल्या आंध्र राजांच्या नाममालिकेंत शक्ति, स्वाति व श्री या तीन रमणींच्या नावांच्या साधित रूपांचा अनेकदां उल्लेख आलेला आहे. त्यांपैकी शक्ति व स्वाति हीं नावें कदाचित एकच असण्याचा संभव आहे. स्कंदस्वाति, चंडश्री, शिवश्री, शिवस्वाति, पांच सहा शातकर्णी वगैरे अनेक सारखीं नांवें त्या मालिकेंत आहेत.

न मातुः परदैवतम् ।

---

४

# प्रकृति-पर्व

( भविष्य काळ )

# २२

## अनाद्यंत काळ–

भूत व भविष्य हेच दोन खरे काळ होत. भूत काळ अनादि आहे व भविष्य अनंत आहे. म्हणूनच काळाला अनाद्यंत लेखतात.

वर्तमानकाळ म्हणजे भूत व भविष्य यांच्या मीलनाची क्षणभंगुर टिकणारी सीमारेषा होय. ही सीमारेषा विद्युल्लतेप्रमाणे चंचल असते. परंतु वर्तमानाचें तेज व जीवन क्षणिक असलें तरी तें नेत्रांना अंध करतें.

वर्तमानाला स्थैर्य नाही परंतु तो गतिमान आहे. म्हणून तो तुफानाप्रमाणे जाणवतो.

भूत व भविष्य या मानवी ज्ञानाच्या ज्ञात व अज्ञात मर्यादा होत. भविष्याचा प्रतिक्षणीं वर्तमानद्वारा भूतांत अंतर्भाव होत असतो.

ही परिवर्तनाची क्रिया सतत चालूं असते पण आपणास तिची सभोतालच्या शांत हवेप्रमाणे जाणीव होत नाही.

आज जें अज्ञात आहे तें उद्या ज्ञात या सदरांत मोडेल. आज जें ज्ञात आहे तें काल अज्ञात होतें.

म्हणूनच ज्ञेय व अज्ञेय या छायाप्रकाशाप्रमाणे सापेक्ष भावना होत.

वर्तमान हा भूत काळाचा कळस असला तरी भविष्याचा पाया होय.

ज्ञाताकडून अज्ञाताकडे प्रवास करणारा 'मी' हाच वर्तमान काळ होय.

भूत काळ पूर्वजांचा व भविष्य काळ वंशजांचा होय. कोणालाहि आपल्या पूर्वजांची व वंशजांची अचूक गणती करतां येणें शक्य नाही. म्हणूनच काळाला कोणी बंधन घालूं शकत नाही. तो मूर्तिमंत स्वातंत्र्य आहे. त्याला कोणी जिंकूं शकत नाही. तो महासागरापेक्षाहि अमर्याद पसरला आहे.

युधिष्ठिर, विक्रम किंवा शालिवाहन हे काळाचे सर्वमान्य टप्पे होत.

वाल्मिकी, व्यास, कालिदास हे काळाचे स्तुतीपाठक विहंग आहेत.

राम, कृष्ण, शिव, हे काळाचे लाडके पुत्र होत.

शंकर, रामदास, तुकाराम हे काळाचे भक्त होत.

बाळ, गोपाळ, मोहन हे काळाचे अलंकार होत.

परंतु ह्या सर्वांचें आयुष्यमान सर्वसामान्य जनापेक्षा मोठें असलें तरी त्यांना मृत्यु आहे. तनु त्यागितां कीर्तिरूपाने ते जगांत नांदतात हें खरें; परंतु कीर्तीलाहि मृत्यु आहे. काळ मात्र अमर आहे.

कालाय तस्मै नमः

# २३

## शकारंभानंतर–

शालिवाहनाचें सारें आयुष्य शकांशीं झुंजण्यांत खर्च झालें. त्याच्या पुत्रपौत्रांनाहि तें युद्ध पुढे शंभर वर्षें चालवावें लागलें.

प्रतिष्ठानच्या युद्धांत शकांचा मोड झाला पण त्यांचा निःपात झाला नाही. सौराष्ट्र, नाशीक व जुन्नर येथील शक राज्यें तग धरून राहिलीं होतीं. उत्तरेंतील मथुरा-साकेतादि राज्यांतील शक कुशानांच्या रेट्याने जेरीस येऊन पुनश्च माळव्यांत उतरले व तेथे स्थीरावले. शालिवाहनाचा नातू गौतमीपुत्र व प्रपौत्र वशिष्टीपुत्र पुलुमयी यांनी मात्र पुढे शकांचा पुरता निःपात केला. पुलुमयी हा दक्षिण देशाचा महासम्राट मानला जातो.

शालिवाहनाने दक्षिणेंत दिग्विजयी होऊन प्रतिष्ठानास आपली स्वतःची शक कालगणना सुरू केली. त्यानंतर दोन वर्षांनी कडफिस मृत्यु पावला. त्याचा पुत्र दुसरा कडफिस हा कुशान साम्राज्याचा अधिपति झाला. त्याने आपल्या पित्याचें व्रत पुढे चालविलें व शकांना दक्षिणेकडे पिटाळले.

ते नर्मदाकांठच्या प्रदेशांत मग स्थायिक झाले. कडारेश उत्तरेकडून व सातवाहन दक्षिणेकडून शकांना चेपूं लागल्यामुळे त्यांची लांडगेतोड झाली. पण त्यांनी आपला चिवटपणा सोडला नाही. दोघांच्या राज्यामधील माळव्याची पट्टी त्यांनी व्यापली. सातवाहन पुलुमयी दाक्षिणेचा सम्राट झाला त्या सुमारास उत्तरेंतील कुशानांच्या साम्राज्याचा वारसा कनिष्काकडे आला. हा देखील कुशानच होता. अशोकानंतर एवढा मोठा बुद्धधर्मी सम्राट दुसरा कोणी झाला नाहीं. हिंदुधर्मी पुलुमयी व बुद्धधर्मी कनिष्क हे दोघे उत्तर–दक्षिण भारताचे समकालीन सम्राट होऊन गेले. या दोघा सम्राटांच्या सरहद्दीजवळच्या माळवा प्रांतांत शकांनी पुनः एकदा जोर करून पाहिला. रुद्रदमन या महाप्रतापी शकराजाने अवंती नगरी व भोतालचा मोठा प्रदेश आपल्या सत्तेखाली आणला. त्याने आपली मुलगी दक्षमित्रा पुलुमयीला देऊन सातवाहनांची मैत्री जोडण्याचा प्रयत्न केला. पण विवाह बंधनाने राजकीय शत्रुत्व नष्ट होत नाही.

रुद्रदमनाने सर्वत्र विखुरलेल्या शकराज्यांची एकजूट घडवून आणली व एकवार पुलुमयीला नर्मदेपार खाली रेटले. परंतु अखेरीस सातवाहन पुलुमयीने त्याचा पराभव केला. शकांचा पुरता निःपात झाला. ख्रिस्तपूर्व १५० पासून ख्रिस्तोत्तर १५० पर्यंत म्हणजे सरासरी तीनशें वर्षे हे शकभारतीय युद्ध सारखें चाललें होतें. आंध्र राजे व त्यांचे नामधारी मांडलिक सातवाहन यांच्या विक्रमशाली चिकाटीच्या झुंजीमुळे शकांचे भारतांत साम्राज्य स्थापन होऊं शकलें नाही व अखेरीस त्यांचें भारतांतून उच्चाटण झालें.

शाक्त पंथ व छाकटे लोक हीं शकांचीं महाराष्ट्रांत उरलेलीं नाममात्र स्मारकें होत. शिमुकानंतर राजा झालेला कन्ह हा पुराणांत वर्णिल्याप्रमाणे शिमुकाचा भाऊ नसून भाऊबंदकी साधारणारा त्याचा शत्रु शक

कन्ह ( कनह ) पान असावा. म्हणूनच सात वाहनांच्या शिला लेखांत त्याला व त्याच्या पुत्रपौत्रांना स्थान मिळालें नाही.

सातवाहन हें भूषणास्पद कुलनाम झालें. शक्तिकर्ण हा खरोखरी त्या वंशाचा मूळ पुरुष होय. परंतु शक्तिकर्ण हा स्वतःला श्रीमुखाचा पौत्रिकेय म्हणवीत असल्यामुळे श्रीमुखाला सातवाहन वंशाच्या मूळ पुरुषाची भूमिका चिकटली. श्रीमुख हा खरोखरी दक्षिणेंतील नाग या प्राचीन राजघराण्यांतील पुरुष होता. शालिवाहनास त्यामुळे कोणी कोणी नागवंशी लेखतात.

श्रीमुखाप्रमाणेच शक्तिकर्णहि स्वतःस आंध्रभृत्य म्हणवीत असे. कारण तो आंध्रराजाचा प्रांताधिकारी मांडलिक होता व त्याच्या सैन्यांत आरंभीतरी स्वाभाविकच आंध्र सैनिकांचा भरणा असे. हें सातवाहन उर्फ आंध्रभृत्य घराणें मौर्योत्तर कालांतील आहे. आंध्र राजांची परंपरा मात्र फार प्राचीन आहे. अशोकपूर्व कालांतहि आंध्र राजांची दक्षिणापथावर दृढ सत्ता पसरली होती. शातवाहनाच्या काळापासून मात्र आंध्रापेक्षा आंध्रभृत्य अधिक पराक्रमी ठरले व म्हणून दक्षिण देशचे ते पुढारी बनले.

शक्तिकर्ण हा मध्य दाक्षिणापथाचा म्हणजे आजच्या बृहन्महाराष्ट्राचा सर्वाधिकारी होता. मात्र महाराष्ट्र हें नांव त्या वेळीं स्वतंत्र देश म्हणून जन्माला आलें नव्हतें. परंतु नानाघाटांतील शिलालेखांत सातवाहनांच्या जोडीने महारथी त्र्यंबकगीर यांचा उल्लेख आहे. प्राकृत गीर व संस्कृत गुरु हे दोन्ही शब्द ' गिर् 'या शब्दापासून निघाले असून दोघांचा अर्थ एकच आहे. याच प्राचीन गोसावी सांप्रदायी महारथ्यावरून व त्यांच्या अनुयायी असलेल्या रथ्यांवरून महाराष्ट्राचें पुढे नामकरण झालें असावें. ऋषीचें कुळ व नदीचें मूळ शोधून सहसा सापडत नसलें तरी महाराष्ट्र या नामाचें मूळ उगमस्थान सातवाहनांच्या इतिहासांत सापडतें.

# २४

## संशोधकांना प्रेमाचा नम्र अहेर-

आंध्र व आंध्रभृत्य हीं उघड भिन्न भिन्न दिसणारीं घराणीं एकच असावीत, असें महर्षी डा. भांडारकरांनी गृहीत धरल्यामुळे शककालावर अधिकच अंधार पडला

आंध्र मौर्यकालीन पराभवामुळे फार तर आपणास मौर्यभृत्य म्हणवून घेतील, परंतु स्वतःला ते स्वतःचे भृत्य म्हणवून घेतील, ही कल्पनाच हास्यास्पद आहे.

भविष्यपुराणाच्या प्राचीन आवृत्तीच्या कर्त्याला शातवाहन उर्फ आंध्रभृत्य व आंध्रवंशी हे भिन्नाभिन्न वाटत होते. कारण आंध्र सत्तेचा मोड होऊन त्याची अठरा शकलें झालीं व नंतर सातवाहनांचा उदय झाला असें त्यांत स्पष्ट म्हटलें आहे. परंतु डा. भांडारकरांचें तिकडे दुर्लक्ष झालें व त्यांनी इतर पुराणान्वयें त्या दोन्ही वंशांची एकता गृहीत धरली. त्यामुळे पुढे घोटाळा वाढत गेला व तत्कालिन इतिहास अधिकच अंधारांत गुरफटला. तीस आंध्रराजांची नाममालिका थोड्याफार फरकाने बऱ्याच पुराणांत दिली आहे.

परंतु ती सर्व शिमुकोत्तर आहे, कारण त्या सर्वांत शिमुक हा मूळ पुरुष दिला आहे. शिमुकाने कण्वांचा पराभव केला व मगधाचें राज्य त्यांच्या हातून हिसकून घेतलें. तेव्हां मौर्य व शुंगकालीन पराक्रमी आंध्रसम्राटांचीं नांवें त्या यादींत नाहींत हें उघड झालें. दक्षिणेचें पुढारीपण पूर्वी अनेक शतकें आंध्रवंशाकडे होते. परंतु सातवाहनांच्या उदयानंतर आंध्रांचें पुढारीपण लोपलें व सातवाहन दक्षिणेचे पुढारी बनले. परंतु आंध्राशी नात्याने निगडित झालेले सातवाहन पूर्वस्मरण कृतज्ञतेने जागृत ठेवून स्वतःस आंध्रभृत्य म्हणवून घेत. सातार्‍याचे छत्रपती व पुण्याचे पेशवे यांचा जो संबंध पुढे जडला तोच आंध्रराजे व आंध्रभृत्य सातवाहन यांच्यांत होता. पुराणांतील याद्यांत त्यामुळे आंध्रनृप व आंध्रभृत्य सातवाहनवंशी नृप यांची सरमिसळ झाली आहे. त्या नामावलीकडे नजर टाकतांच ही गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते. परंतु अनेक संशोधकांनी ती नामावली केवळ आंध्रवंशाची धरल्यामुळे अशी चूक झाली. कारण सातवाहन कुलांतील राजांचीं नांवें त्यांत स्पष्टपणें दिसतात. गौतमीपुत्र व पुलुमयी यांचा काळ इ.स.१०६ ते १५८ असा निश्चित आहे. पुलुमयीनंतर शंभर वर्षांत जे सातवाहन राजे झाले त्यांचीं नांवें या नामावलींत आलीं आहेत. त्यावरून पुराणांचा (ब्रम्हांड, मत्स्य, वायु,) रचना काल सरासरी इ. स. ३०० ठरतो. त्यामुळे ख्रिस्तोत्तर नांवें खरी असण्याचा संभव आहे. जुनीं नांवें मात्र अनमान धक्याने दिलीं आहेत. त्यांत आंध्र व सातवाहनांचा सावळा गोंधळ आहे. स्मरणशक्तीची धाव फार दूरवर जात नाही. कण्वांचा शिमुकाने ख्रिस्तपूर्व २७ सालीं नाश केला व गौतमीपुत्र ख्रिस्तोत्तर १०६ सालीं गादीवर बसला. परंतु पुराणांतील यादीप्रमाणे शिमुक व गौतमीपुत्र यांच्यांत ३०५ वर्षांचें अंतर असून त्या कालांत झालेले २२ राजे दिले आहेत. तेव्हां ती वंशमालिका अविश्वसनीय ठरते हें उघड आहे. परंतु आंध्र व आंध्रभृत्य हे एकच असले पाहिजेत असा निर्णय घेऊन संशोधक मोकळे झाले व तें कोडें तसेंच अनिर्णित राहिलें.

कोणी कोणी ठरविलें कीं विक्रमादित्य व शालिवाहन या काल्पनिक व्यक्तींवरूनच हिंदूंनी अनमानधक्याने नवी कालगणना चालूं केली. कारण

या दोन थोर राजर्षींचा निश्चित इतिहास त्यांना उकलेना. तर कोणी कोणी असें ठरविलें कीं परकीय असंस्कृत शकांनी आपली नवी कालगणना चालूं केली आणि पुढे आपली म्हणून स्वधर्मशून्य हिंदूंनी ती उचलली!

कोणी शालिवाहनास नागवंशी तर कोणी त्यास कुमारीपुत्र कर्ण लेखतात तर कोणी त्याचा विक्रमादित्याशीं संबंध लावून त्यास आंध्रवंशी गणतात तर इतर कोणी कोणी शालिवाहनास शकवंशी लेखतात. या प्रत्येक विधानांत किंचित तथ्यांश आहे, परंतु तो मात्र स्वतःस सातवाहन कुलसंस्थापक समजतो. तो स्वतःस आंध्र न गणतां आंध्रभृत्य असें म्हणवितो. कांहीं जनांच्या मतें विक्रमादित्य व शालिवाहन हीं दोन्हीं एकाच व्यक्तीचीं नांवें होत. त्या पैकी एक खरें नांव व एक पदवी. केवळ गंमत म्हणून त्या व्यक्तीने आपल्या नांवाने दोन कालगणना चालूं केल्या व जगाला चकविण्यासाठी दोन गणनामध्ये १३५ वर्षांचें अंतर मुद्दाम राखलें!

मुसलमानांची आठशें वर्षें भारतावर सत्ता होती व इंग्रजांची आज दोनशें वर्षें हिंदुस्थानावर पकड आहे. व्यवहारांत मुसलमानी व खिस्ती कालगणनेचा वरचष्मा असतांना देखील हिंदू जनता शालिवाहन शक व विक्रम संवत यांनाच चिकटून बसली. इतकें हिंदूंचें स्वधर्मप्रेम गुलामगिरींत देखील जागृत राहिलें. तेव्हां वरच्या सर्व कल्पना हास्यास्पद आहेत हें उघड आहे. विक्रम संवत व शालिवाहन शक प्रचारांत येण्यापूर्वी युधिष्ठिर संवत सर्वत्र भारतांत चालूं होता. काल्पनिक किंवा परधर्मी व परदेशी व्यक्तीसाठी कोणता हाडाचा प्राचीन हिंदु सुप्रसिद्ध धर्मराजाच्या नांवाने चालूं असणारी कालगणना लाथाडून धर्मद्रोह करील?

विक्रम व शालिवाहन हे दोन्ही थोर सम्राट भारतांत झाले व त्यांनी शकांचा पराभव केला. त्यांच्या रोमांचकारी जीवनाने हिंदु जनमनावर इतकी विलक्षण पकड बसली कीं युधिष्ठिर कालगणना बाजूस सारतांना त्यांना लवमात्र संकोच वाटला नाहीं.

कोणी असें तर्कट लढविलें कीं सातवाहन पुलुमयीने शालिवाहन शक आपल्या नांवाने चालूं केला असावा. कारण त्याने शकांचा पुरता

नायनाट केला परंतु पुलुमयीने इ. स. १३० ते १५८ पर्यंत राज्य केलें. त्याचा शकारंभ केव्हांतरी या मधल्या २८ वर्षांच्या काळांतच होणार. कारण हिंदु राजे दिग्विजयानंतर राज्यारोहणाचा महान उत्सव साजरा करीत व त्या दिवसापासून त्यांच्या नांवाचा नवा शक चालू होई. पाश्चात्याप्रमाणे जन्मकालापासून त्यांचा शक चालू होत नसे. अनेक हिंदु राजांनी आजपर्यंत आपल्या नांवाचे शक चालूं केले पण ते त्यांच्या मृत्यूनंतर कालगंगेंत लुप्त झाले. विक्रम व शालिवाहन यांच्या काळसागरावरील मुद्रा मात्र गेल्या दोन हजार वर्षांच्या क्रांतीनंतरहि पुसट झाल्या नाहीत. तेव्हां पुलुमयीनें कोणतें तरी आडमाप इ स. ७८ हें वर्ष घेऊन तेथून आपली कालगणना सुरू करावी, असा वेडगळपणाचा हुकूम केव्हांतरी १३० ते १५८ च्या दरम्यान काढला, असें कां या विद्वानांना सूचित करावयाचें आहे ? आणि विक्रमाबद्दल तर त्यांनी आळी मिळी गुपचिळीची जणूं शपथ घेतली आहे ! कारण तीनशें वर्षांनंतर पुढे गुप्तांचें सुवर्णयुग चालूं झालें, तेव्हां कोठे विक्रमादित्य प्रथम त्यांच्या दृष्टीस पडतो. वरच्या न्यायाने त्या गुप्तवंशी विक्रमादित्यानेहि पावणे चारशे वर्षांपूर्वीच्य एका आडवळणी (खिस्त पूर्व ५७) वर्षापासून माझा संवत सुरू करावा असें फर्माविलें असावें ! कारण गुप्तांचें साम्राज्य इ. स. ३२० ते ६४७ पर्यंत सुवर्णाप्रमाणे भारतांत लखाकत होतें.

तेव्हां या हास्यास्पद तर्कटांची बोळवण करणें बरें.

कांही पुराणांत शालिवाहन हा विक्रमादित्याचा पौत्र होता असें लिहिलें आहे. परंतु त्या दोघांच्या शक संवतारंभांत १३५ वर्षांचें अंतर असल्यामुळे शालिवाहन विक्रमादित्याचा जेमतेम प्रपौत्र ठरूं शकेल. शालिवाहनाने विक्रमादित्याच्या राज्यावर स्वारी केली म्हणजे त्यांचें दोघांचें शत्रुत्व होतें असें नव्हे, तर विक्रमादित्याच्या राज्याचा जो भाग शकांनी जिंकून घेतला होता तो परत त्यांच्या हातांतून सोडविण्यासाठी शालिवाहनाने त्या प्रदेशावर स्वारी केली व शकांचा पराभव केला; विक्रमादित्याचा किंवा त्याच्या वंशजांचा नव्हे. बृहत्कथा, पुराणें, शिलालेख व श्रुतीद्वारा परंपरेने चालत

आलेला इतिहास यांचा समन्वय करूनच या ऐतिहासिक घटनेकडे पाहिलें पाहिजे. एकांगी दृष्टि इतिहास-संशोधनाला वर्ज आहे.

ठिकठिकाणीं पुराव्यादाखल पुराणांतील किंवा बृहत्कथेंतील किंवा ऐतिहासिक शिलालेखांतील उतारे देऊन या पुस्तकाची लांबी सहज वाढवितां आली असती. पण सामान्य वाचकांचा त्यामुळे घोटाळाच अधिक उडतो. कारण त्या प्रत्येक उताऱ्यांतील कोणता भाग ग्राह्य व कोणता अग्राह्य व तो कां, याची विस्तृत चर्चा केल्याशिवाय ते मार्गदर्शक कसे व्हावेत? शिवाय पुराणग्रंथांतील मूळ भाग कोणता व क्षेपक भाग कोणता व तो कोणत्या काळांतला, याची चर्चा करणेंहि त्यामुळे भाग असतें. त्याशिवाय पुराव्याच्या महत्वाची छाननी पुरी देऊं शकत नाही. त्यामुळे ग्रंथाची पृष्ठमर्यादा वाढते व त्याचें लालित्य नष्ट होऊन रुक्षता निर्माण होते. सामान्य जनतेला ज्ञान हवे असतें व त्याबरोबर मनोरंजन साधल्यास तें उत्तमच! तेव्हां ही तर्कटी चर्चा त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी ठरते. विद्वानांना त्या उताऱ्यांची गरज भासत नाही, कारण ग्रंथ वाचतांना संदर्भ आपोआप त्यांच्या लक्षांत येतो व मूळ ते स्वतः ताडून पाहूं शकतात. उदाहरणार्थ, भविष्यपुराणांत येशू व शालिवाहन यांच्या भेटीचा प्रसंग वर्णन केला आहे. सिंधु नदीपर्यंत आर्यखंडांत शालिवाहनाचा शक चालावा व पलीकडे म्लेंच्छ राज्यांत येशूचा शक चालावा असा त्या भेटींत तहनामा ठरला. ऐतिहासिक दृष्ट्या हें शक्य नाही. परंतु येशूचा एक पट्टशिष्य संत तमसाचार्य शालिवाहनकालीं हिंदुस्थानास भेट देता झाला व पल्लव राजघराण्याने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला हें त्यांतील ऐतिहासिक सत्य आहे.

या पुस्तकांत इंग्रज ग्रंथकारांचें केवळ अंधानुकरण न करतां शक्य तेवढीं अर्थवाहक भारतीय नांवें उपयोगांत आणलीं आहेत. इंग्रजांना संस्कृत शब्दांचे नीट उच्चार करतां येत नसल्यामुळे भारतवर्षाच्या इतिहासांतील व्यक्तिस्थळांच्या उच्चारांतील त्यांचा बोबडेपणा क्षम्य असला तरी

तो अनुकरणीय खास नव्हे. कडारेश म्हणजे कडाफिसीस व गंढोफेरव हाच गोंडोफर्नेस किंवा संत तमसाचार्य म्हणजेच सेंट थामस हें तज्ज्ञांना सहज ओळखतां येईल.

आणखी एक महत्वाचा प्रश्न मांडावयाचा राहिला. स्थल, काल व वंश भेदानुसार भाषेच्या उच्चारांत जे भेद पडत जातात व ज्यामुळे प्रसंगविशेषीं एका भाषेंतून दुसरी भाषा हळूहळू अपभ्रंशादि विकृतीने उद्भवेत, त्याला वर्णप्रक्रिया हें नांव आहे. प्राचीन इतिहाससंशोघनांत वर्णप्राक्रियेचें महत्व फार मोठें आहे यांत शंका नाही.

परंतु लक्षणानुसार भिन्नार्थाचा आरोप होऊन जी कल्पनातीत शाब्दिक उलटापालट होते ती वर्णप्रक्रियेच्या सामान्य नियमापेक्षा अधिक तीव्र गतीने व क्रांतिकारक पद्धतीने होते. या दुसऱ्या घडा-मोडीच्या प्रकाराकडे संशोधकांचें जावें तितकें लक्ष जात नाही, ही दुर्दै-वाची गोष्ट होय.

' शाक्त ' या शब्दाचे सात किंवा शात या शब्दांत रुपांतर होणें हें वर्णप्रक्रियेचें पहिल्या प्रकारचें उदाहरण होय.

परंतु ' कर्णी' या शब्दावरून अश्वाची किंवा गाडीची कल्पना होणें व त्यामुळे ' कर्णी ' या शब्दाचें 'वाहन' या शब्दांत रुपांतर होणें हा वर्णप्रक्रियेचा दुसरा क्रांतिकारक प्रकार होय.

Rail या इंग्रजी शब्दापासून मराठी रूळ हा शब्द वर्णप्राक्रियेच्या पहिल्या पद्धतीने झाला.

परंतु Chair या इंग्रजी शब्दापासून खुर्ची हा मराठी शब्द दुसऱ्या पद्धतीने तयार झाला. कारण Chair या वस्तूच्या दर्शनाने त्या आस-नाला असणाऱ्या चार खुरांच्या लक्षणास प्रामुख्य येऊन नवा शब्द ' खुरचार ' निर्माण झाला.

एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत मोटार, सायकल, स्टेशन असे कांहीं शब्द जसेच्या तसेच येतात. Rail चा रूळ होतो, Rail-way ला

लोहमार्ग हें नांव मिळतें, परंतु Railway train मात्र आगगाडी या लक्षणात्मक नांवाने मराठींत वावरतें.

पूर्वी व्यवहारांत संस्कृतचें प्राकृतांत रुपांतर होई परंतु रुढ व्यवहार पुराणांतर्गत होतांना पुनश्च त्याचें संस्कृतांत रुपांतर होई; कारण विद्वज्जन-ग्रंथभाषा संस्कृत होती. या दुहेरी सव्यापसव्य रुपांतरामुळे कांही शब्दांचें स्वरूप इतकें पालटून जाई कीं त्यांचें मूळ-रूप अज्ञाताच्या उदरांत जाऊन लपून बसावें. ज्यावेळी भाषा लेखनबद्ध नसून केवळ श्रुतीप्रामाण्यावर अवलंबून होती त्या वेळीं असले चमत्कार सहाजिकच हजारो घडत असत.

संस्कृत-प्राकृत किंवा इंग्रजी-मराठी संबंधांची अशीं तिन्हीं प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील.

परंतु या पुस्तकांतील प्रमुख प्रतिपाद्य विषय हा नव्हे. म्हणून केवळ दिग्दर्शनापुरताच या प्रश्नाचा येथे उल्लेख केला आहे. शाक्तिकर्ण-शाक्तकर्णी-सातकर्णी-सातवाहन-शातवाहन-सादिवाहन-शालिवाहन, यांत वर्णप्रक्रियेचे उपरनिर्दिष्ट सर्व प्रकार समावले आहेत. हे सर्व शब्द रुढ आहेत परंतु ते एकाचेच अनेक प्रकार आहेत.

त्या हिंदुकुलभूषणी धर्मज्ञ व पराक्रमी शालिवाहनास व त्याच्या वैभवशाली विक्रमादित्य मातृमातामहास आमची सहस्रशः वंदनें असोत. दोघेहि दक्षिण भारताचे सुपुत्र होते. दक्षिण देशाने ऐन वेळीं हिंदु धर्म व संस्कृतीचे संरक्षण केलें व परकीयांचा निःपात केला. समग्र भारताचे डोळे म्हणून दक्षिणेवर आज देखील आशावादाने खिळले आहेत. वायव्य व पश्चिम या भारताच्या निराशा आणि दक्षिण व पूर्व या भारताच्या आशा होत. कारण वायव्य व पश्चिमेकडून भारतावर परकीयांचें आक्रमण झालें. परंतु भारतीय धर्म व संस्कृती यांचा पूर्वेस प्रसार झाला आणि दक्षिणेनें धर्म व संस्कृतीरक्षणार्थ परकीय शत्रूशीं सतत झुंज घेतली व स्वातंत्र्याचा ओनामा गिरविला. दाक्षिणात्यांचा विजय असो !

---